इ/308

॥ श्रीउद्योगदेवता प्रसन्न. ॥

ज्ञानमित्र पुस्तक–माला, पुष्प सत्ताविसावें.

महाराणा प्रतापसिंह

यांचें भरपूर चित्रांसह व टिपांसह बृहत् जीवन चरित्र.

लेखक,

लक्ष्मण नारायण जोशी,

चव्हाणी समशेर, रशियांतील बोल्शेविझम, रशियाचें सूर्यग्रहण !
अस्तोदय वगैरे पुस्तकांचे कर्ते.

प्रकाशक व मुद्रक,

नारायण बळवंत चव्हाण.

प्रथमावृत्ति.] सन १९२२. [किं. एक रुपया.

(All Rights reserved by the Publisher.)

ज्ञानमित्र पुस्तकमालेचें पुढील औद्योगिक पुष्प.

सुगन्धी शिक्षक.

—म्हणजेच—

पर्फ्यूमरी इन्स्ट्रक्टर.

यांत धंदा कसा करावा व गिऱ्हाईकी कशी वाढवावी
याचें विस्तृत विवेचन केलें असून
—शिवाय—
नानातऱ्हेचीं अत्तरें, सुगंधीं तेलें, अर्गजा, उदबत्त्या,
अगरबत्त्या, हेअर ऑइल्स, अर्क वगैरे अनेक
उपयुक्त वस्तू घरच्याघरीं ५-१० रुपये
भांडवलांत तयार करून
रोज २-५ रुपये मिळवतां येण्याजोगी निघडक,
सप्रमाण व गुप्त माहिती मागवून उद्योगी व्हा!

किंमत एक रुपया. व्ही. पी, १॥६

प्रो. ज्ञानमित्र, शनवार, पुणें-सिटी.

हें पुस्तक पुणें पेठ शनवार, घर नंबर ४८३ येथें, रा. नारायण बळवंत चव्हाण यांनीं आपल्या 'हरिहर' नामक छापखान्यांत छापून ज्ञानमित्र कचेरी, शनिवार पेठ, पुणें शहर येथें प्रसिद्ध केलें.

प्रस्तावना.

पुराणमितिहासाश्च तथाख्यानानि यानि च
महात्मानां च चरितं श्रोतव्यं नित्यमेव च ॥

—महाभारत

Thete is not a petty state in Rajasthan that has not had it's Thermopyloe and scarcely a oity that not produced it's Leonidas.

--*Tod's Rajasathan.*

एका सहृदय बंगाली लेखकानें राजपुतान्याला 'भारतवर्षाचें हृदय' अशी जी उपमा दिली आहे ती अगदीं खरी आहे. मनुष्याचें बल जसें हृदयांत राहतें व त्या हृदयबलानेंच जसें प्राकृतिक बल सूचित होतें, तद्वत भारतवर्षाची खरी शक्ति राजपुतान्यांतच आहे. अशा त्या महाशक्तिमुळेंच एकेकाळीं भारतवर्षाचा गौरव अखिल भूमंडळावर सुप्रतिष्ठीत झालेला होता. साम्प्रतकालीं ती शक्ति राजपुतान्यांत असो वा नसो, परंतु खरें बोलायचें तर सध्यांच्या काळांतहि, मेवाड हें राजपुतान्याचेंच काय, तर अखिल भारतवर्षाचें शिरोरत्न आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. चितोडचा किल्ला—राजपुतान्याची व अखिल भारतवर्षाची हताश झालेली स्थिति अवलोकन करून भग्न हृदय होत्साता, धळ धळ अश्रु ढाळीत उभा आहे. अशी कोणची सहृदय व्यक्ति अथवा असें कोणचें हिंदुस्तानचें संतान असेल, कीं चितोडचा किल्ला पाहून त्याची

छाती फाटून जाणार नाहीं ? दगडापेक्षांहि कठीण काळजाचा जरी कोणी असेल तरी त्याच्याहि हृदयाला—चितोडचा किल्ला पाहून पाझर फुटेल. आम्हांला जर कोणी विचारलें कीं, हिंदूंचें खरें तीर्थस्थल कोठें आहे, तर कोण्याहि प्रकारचा संकोच न करतां, निर्भयपणानें असें उत्तर देऊं कीं, हिंदूंचें खरें तीर्थ चितोडगड हेंच असून, या दोन्ही स्थलां-पेक्षां उच्चतम अशीं दुसरी स्थळें इतरत्र असणें अशक्य आहे. इति-हास लेखकांनीं ग्रीसचे लिओनेडाज् व मिलटाईडीज् यांच्या प्रशंसांचे मोठाले उत्तुंग असे मनोरे रचलेले आहेत, पण खरें म्हटलें तर ह्या आर्यभूच्या उदरांतून-असे कित्येक लिओनेडाज् व मीलटाईडीज् आजप-र्यंत बाहेर पडून अजरामर कीर्ति मिळवून गेलेले आहेत.

अहो, प्राचीन सनतान धर्माभिमानी आणि तीर्थयात्रांचें अनु-रागी लोकहो, पाहा, एकवार तरी डोळे उघडून पाहा—म्हणजे तुम्हांला चितोगड तुमच्या प्राचीन सनातन धर्माची ग्वाही देत कसा उभा आहे तो तुम्हांला स्पष्ट दिसेल. तुमच्या प्राचीन वैभवाचीं निशाणें त्या गडाच्या प्रत्येक भिंतीवर फडकत आहेत. त्यागडाचा प्रत्येक कानाकोपराच नव्हे तर प्रत्येक वीट तुमच्या प्राचीन वैभवाची साक्ष पटवीत आहेत. हे तीर्थयात्रेचे प्रेमी जनहो, एकवार तरी खऱ्या धर्माचें स्वरूप पाहण्यासाठीं चितोडगडावर जा म्हणजे तें त्याच्या तटावर तुमच्या दृष्टीस पडेल. शान्ती मिळण्यासाठीं जर तुम्ही उतावळे झालां असाल, तर ती तुम्हांला चितोगडांतच प्राप्त होईल. अशा

कोणाचा देश सांपडेल कीं, जेथल्या आबलांनीं प्रबल शत्रूच्या भीतीनें दांताखिळी बसवून, भडकलेल्या अग्निकुंडांत उड्या मारून, आपल्या आत्मबलाचा जगताला परिचय करून दिला आहे व जेथील कोमल सुकुमार बालवीरांनींहि स्वदेशरक्षणासाठीं आपल्या प्राणांच्या आहुती दिल्या आहेत? असें जर अखिल जगतांत कोणचें पवित्र स्थल असेल, तर तें भारतवर्षाचें मुकुटमणी जें मेवाडच तें एक आहे. स्वतंत्र्य देवतेच्या प्रसन्नतेसाठीं तेथींल निवासीजनांनीं आपल्या रक्ताच्या नद्या वाहविल्या नाहींत असा कोणचा इतिहास प्रगट करणार नाहीं? 'हतोवा प्राप्स्यासि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्' हा जो भगवान् कृष्णचंद्राचा उपदेश तोंच ज्यांच्या जीवनाचा मूल मंत्र होऊन राहिला होता, अशा त्या मेवाडस्थ वीरांचा जो प्रासिद्ध नायक महाराणा प्रतापसिंह त्याचा इतिहास प्रत्येक हिंदुमात्रानें वाचणें हें त्याचें आद्यकर्तव्य नाहीं असें कोण म्हणेल? असलें तें पवित्र कर्म करून, आपलीं हृदयें पवित्र करून घ्यावीं हेंच श्रेष्ठतर होय.

मेवाडचा इतिहास प्रारंभापासून अखेरीपर्यंत आत्मोत्सर्गाचा आहे. मेवाडच्या इतिहासांत आत्मोत्सर्गाचे जसे उज्ज्वल आणि दृष्टांत-पूर्ण आदर्श बघायला सांपतात, तसे इतर देशांच्या इतिहासांत बघायला सांपडणें जरी असंभवनीय नसले, तरी खचीत दुस्तरच होत. मेवाडच्या आत्मोत्सर्गाचा इतिहास असा तसा लेंचापेंचा नाहीं. तो मृताला सजीव करणारा आहे. कोरड्या हाडांच्या नळ्यांतून तप्त रक्त उत्पन्न करून, त्याला सळसळवून सोडणारा तो आहे. निराशारूप सागरांत गोते

जाणाऱ्यांना—चितोडचा इतिहास, अशारूपीं नौका आहे. तो बुडत असलेल्या नौकेला तीराला पोंचविणारा सुकर्णधार आहे. फार काय सांगावें ? मृत्युशय्येवर पडलेल्या राष्ट्राची ती संजीवनी मात्रा आहे. पण; दुर्दैवाची गोष्ट इतकीच आहे कीं—मराठी भाषेंत—महाराणा प्रतापसिंहासारख्याचा इतिहास राष्ट्रीय दृष्टीनें आजपर्यंत कोणाहि थोराच्या हातून अद्यापि लिहिला जाऊं नये! भारतमातेच्या प्रत्येक आत्मगौरवप्रिय स्वाभिमानी पुत्राचें हेंच श्रेष्ठ व पवित्र कर्तव्य आहे कीं, त्यानें मेवाडचा इतिहास आणि त्या इतिहासांतील ध्रुवतारा जो महाराणा प्रतापसिंह, त्याचा इतिहास वाचावा, ऐकावा व ऐकवावा.

महाराणा प्रतापसिंहाचें हें जीवनचरित्र—राजस्थानच्या इतिहासाच्या आधारानें जरी लिहिलें आहे, तरी या बाबतींत महान् विद्वानांचा जेथें कर्नल टॉडशीं मतभेद झालेला आहे त्या ठिकाणीं खुणा करून यांत जागोजागीं पादटिप्पण्या दिल्या आहेत. असें असूनहि चूक भूल झाली असल्यास प्रिय वाचकांकडून सूचना आल्यास त्यांचा योग्य परामर्ष घेतला जाईल.

अखेरीस अशा तऱ्हेचें नव्यानेच—मराठींत . यापूर्वी एक दोन छोटेक चरित्रें प्रसिद्ध झालीं असतांहि-पुन्हा त्याच विषयावर पुस्तक लिहिण्यास सांगण्याचेंआमचे मित्र रा. नानासाहेब चव्हाण यांनीं धाष्टर्य केलें व आमच्या मनाजोगें हें ऐतिहासिक पवित्र चरित्र आमच्याकडून लिहून घेतलें याबद्दल त्यांचे आभार मानून ही प्रस्तावना पुरी करतों.

मुंबई, इ. सन १९२१. }

इतिहासभक्त,
ह. ना. जोशी.

६/३०८

विषय विवरण.

परिच्छेद.	विषय.	पृष्ठसंख्या.

चित्रांचें विवरण.

महाराष्ट्र वाङ्मयामधील तेजोमय दिव्यरत्न !

सती परीक्षा !

आर्य रमणींना वाचवावयास देण्यासारखी कादंबरी हीच आहे. दुष्टलोक साध्वींचा कसा छळ करतात व त्याचा परिणाम कसा होतो याचें मनोरंजक बोधपूर्ण चित्र दिसून, साध्वीचें हांकेस परमेश्वर कसा धांवून येऊन तिचें सतीत्व रक्षण करतो हें पहावयास सांपडेल.

किं. १२ व्ही. पी. १८६] मो. ज्ञानमित्र, पुणें—सिटी.

ज्ञानमित्र पुस्तकमाला.

ज्ञानमित्र पुस्तकमाला:—महाराष्ट्रांतील सुशिक्षित, अल्प-शिक्षित व पुढारी बंधुभगिनींना रुचेल, पचेल आणि परिणामी हितकारक होईल असें '**ज्ञानामृत**' पाजून वाचकांना आपल्या खऱ्या खऱ्या कर्तव्याची ओळख पटवून देणारीं शास्त्रीय, औद्योगिक विषयावर छोटीं छोटीं पण सप्रयोग व सचित्र पुस्तकें आणि प्रगमनशील व प्रगतिकारक विचारांच्या रहस्यपूर्ण ऐतिहासिक व सामाजिक चटकदार कादंबऱ्या व जगांतील थोर विभूतींचीं चरित्रें प्रकाशित करण्याची सदर मालेची प्रतिज्ञा आहे.

ज्ञानमित्र पुस्तकमालेंतलि
संग्राह्य पुस्तकांची
नवी खास यादी.
-१९२१-

मालेचे नियम:— (१) फक्त **आठ** आणे प्रवेश-फी भरणाऱ्यास ग्राहक समजलें जातें. कायमच्या आश्रयदात्यांस केव्हांही नांव दाखल करतां येतें. (२) ग्राहक झाल्यानंतर पुढें प्रसिद्ध होणारें प्रत्येक पुस्तक घेतलेंच पाहिजे. मागील पुस्तकें वाटल्यास घ्यावींत. (३) प्रत्येक अडीच तीन महिन्यांनीं एक किंवा दोन पुस्तकें ग्राहकांकडे १८१२ आणेपर्यंतच्या व्ही. पी. नें रवाना होतात. (४) कायमच्या ग्राहकास टपाल व्ही. पी. व प्याकिंग खर्च आकारून पुस्तकें **पाऊणपट** किंमतींत देऊं. प्रो. **ज्ञानमित्र**, शनवार पेठ, पुणें शहर.

फायद्याची सूचना.

हल्लीं पोष्टानें अ. र. व्ही. पी. बंद केल्यामुळें अगदीं लहान र. व्ही. पीला सुद्धां सहा आणें खर्च येतो व मनिआर्डरींचे दर वाढविल्यामुळें एक रुपायाचे आंत व्ही. पी. करणें बंद केलें आहे तरी एक रुपयाचे आंतील मागणी करणारांनीं पुस्तकाच्या किंमतीची अर्धा आणा दरांचीं पोष्टांचीं तिकिटें पाठवावीत ह्मणजे पुस्तक नाटपेट बुक पोष्टानेंच पाठवूं म्हणजे गहाळ होण्याची भीति नाहीं. तसेंच पांच रुपयांचें वरील मागणी करणारांनीं एक रुपाया अडव्हान्स पाठवावा; म्हणजे बाकीच्या रकमेची व्ही. पी. करूं.] प्रो. **ज्ञानमित्र** पुणें सिटी.

मनोरंजक कादंबऱ्या—

१ युद्धांतील अघोर कर्मकथाः—लेखक, ' महाराष्ट्रभाषा-चित्रमयुर ' कृष्णाजी नारायण आठल्ये—मूर्तिमंत देशभिमान व उज्वल स्वार्थत्याग जागृत करून खऱ्या क्षात्रतेजाची ओळख पटवून हृदयाला पाझर फोडणाऱ्या विलक्षण व करुणाजनक कर्मकथा जर कोठें असतील तर त्या ह्याच पुस्तकांत आहेत आणि त्या सुद्धां कल्पित नव्हेत तर ऐतिहासिक ! आपल्या पोटच्या गोळ्याचें स्वहस्तें पारिमार्जन करून समरगणावर जाणाऱ्या देशभक्तवीरांचें अश्रुतपूर्व प्रसंग ह्यांतच पहावयास मिळतील ! पाश्चात्त्ययुद्धांतील वीरांच्या रहस्यपूर्ण अश्रुतपूर्ण अशा वीररस परिपोषक निवडक कथा दिल्या असून शिवाय गेल्या महायुद्धांतील आश्चर्यानें थक्ककरून सोडणारे अद्वितीय निवडक ' समर–चमत्कार ! ' यांतच आढळतील. किं. ८१२

औंध सरकारानें बक्षिसासाठीं मंजूर केलेलीं दोन पुस्तकें

२ शूर शिपाई (सचित्र)—लेखक, श्रीमंत बाळासाहेब पंत-प्रतिनिधि, बी. ए. यांच्या रसभरित लेखणींतून उतरलेली क्षात्रतेजाची ज्योत प्रदीप्त करणारी ही अत्यंत चटकदार पण सुबोध छोटी सचित्र कादंबरी जरूर वाचाच ! कथानक अत्यंत चित्ताकर्षक. किं. ८४

३ वंगसूर्यास्त म्हणजेच **अघोर राज्यतृष्णा**—लेखक, श्री. बाळकृष्ण जिवाजी हडकर. फंदफितुरीच्या निंद्य कृत्यानें वंगालचें ' स्वराज्य ' कसें धुळीस मिळालें, याचें करुणाजनक व हृदयंगम शब्द-चित्र या ऐतिहासिक कादंबरींत रेखाटण्याचा प्रयत्न केला असून, तो मनोरम भाषाशैली, हृदयंगम विचार सरणी व बहारीच्या संविधानकामुळें विशेषच परिणामकारक झाला आहे. किं. १ रु.

४ परमेश्वरी संकेतः—लेखक, श्रीयुत, रामचंद्र नारायण दाते. द्रव्यलोभी व परदाराभिलाषी माणसांच्या दुर्वर्तनामुळें एका सच्छील जहागिरदाराचे कुटुंबावर कसा प्राणांत प्रसंग गुदरला व त्यांतून तें कसें मुक्त झालें, याचें करुण व अद्भुत रसानें ओथंबलेलें हृदयंगम चित्र यांतच पहावयास मिळेल ! खऱ्या व उदात्त पतिपत्नीप्रेमाची ओळख हीच कादंबरी करून देईल ! ! भाषासौष्ठव, कल्पनारम्यत्व व विचार-वैचित्र्य ह्यामुळें ही नवलकथा इतकी चित्ताकर्षक झाली आहे कीं, वाचकांची जिज्ञासा शेवटपर्यंत कायम रहाते. (प्रकरणें ११) किं. ८५

५ राष्ट्रोन्नति केव्हां होईल (सचित्र)-लेखक श्रीयुत, ' सरस्वतीनंदन '—भारतीय तरुणांना जागृत करून हिंदमातेची सेवा करण्यास प्रवृत्त करणारी, देशोद्धार आणि राष्ट्रसेवा कशी करावी याचें दिग्दर्शन करणारी, लोकसेवेचें बीजारोपण करणारी, अत्यंत चटकदार पण मराठी वाङ्मयावर प्रभुत्व गाजविणारी ही दैदीप्यमान सचित्र कादंबरी किंकर्तव्यमूढ झालेल्या पण देशहिताकरितां तळमळणाऱ्या प्रत्येक तरुणानें एकवार तरी अवश्य वाचावी अशी आमची शिफारस आहे. किं. ०८

६ विनोद लहरीः—लेखक, श्रीयुत, नारायण बळवंत चव्हाण. हें जीवन संग्रामांतील अनेक आघातांनी हताश झालेल्या व तुमच्या दुःखी व श्रमलेल्या मनाला गुदगुल्या करून पोट धरधरून हंसविणाऱ्या, हजारों हास्य-रसभरित विनोदपर निवडक चुटक्यांचें पुस्तक आजच मागवून बहुश्रुत व्हा ! आनंदसागरांत लोळा ! व्यवहारचतुर आणि विनोदी व्हा ! एकदां वाचा. किं. ०१२

७ चितोडची वीर अरुणः—लेखक-श्रीयुत, ' सरस्वतीनंदन ' असा कोणता हिन्दु आहे कीं, ज्याच्या अंतःकरणाला चितोडच्या वीर स्त्रीपुरुषांबद्दल आदर उत्पन्न होणार नाहीं ! असा कोणता इतिहास प्रेमी आहे कीं, ज्यानें चितोडच्या वीरांगनाची मुक्तकंठानें स्तुति केली नाहीं ? असा कोणता वाचक आहे कीं, चितोडच्या रणसंग्रामाची हकीगत वाचीत असतां त्याचें हृदय द्रवणार नाहीं ? ह्या ऐतिहासिक कादंबरींत चितोडच्या स्त्रीयांच्या शौर्याचें इतक्या बहारीचें वर्णन केलें आहे कीं, पुरुषांचेच काय पण स्त्रियांचेहीं बाहू स्फुरण पावूं लागतील ! पातिव्रत्याच्या उज्वल कीर्तीची जाणीव उत्पन्न होईल !! किं. ०१२

८ **हतभागी इंदू**:—लेखक, श्रीयुत, ' यशोदातनय ' कथानकाच्या हृदयंगमपणामुळें प्रत्येक तरुण बंधुभगिनींच्या मनाला चटका लाऊन सोडणारी व समाजांत खळबळ उडविणारी ही सामाजिक स्वतंत्र कादंबरी आधुनिक कादंबरीकारांस मार्गदर्शकच झाली आहे. किं. ८५

९ **एकरूपी सौंदर्यकळस**:--लेखक—श्रीनिवास गणेश ताम्हने. यांत कमल-कमलिनीची संकट परंपरा, कमलिनीचें चंद्रकेतुवरील अढळ प्रेम, सुशीलता, धीरता आणि लीलावतीचा विलक्षण करारीपणा, अनुपम पतिपत्नीप्रेम इत्यादि गुणांचें फारच सुंदर शब्दचित्र ह्या कथानकांत रेखाटलें असल्यामुळें ही रोम्यांटिक कादंबरी अत्यंत मनोरंजक व शिक्षाप्रद झाली आहे. शेंवटचीं प्रकरणें वाचतां वाचतां वाचकांची वृत्ति तन्मय होऊन जाते. कथानक सुबोध. किं. ८६

१० **मधुर-मीलन**:—लेखक श्रीयुत, कृष्णानुज—कालेकर. एका चित्तवेधक बंगाली कथानकाच्या आधारें लिहिलेल्या रम्य—काव्यमय Romantic—रोमॅंटिक—कादंबरींत संसारतापांनीं खिन्न झालेल्या मनाला प्रफुल्लीत करून व चटका लावून सोडणारें हें मधुर—मीलन आहे. पहिल्यापासून तो शेवटपर्यंत वाचनाची उत्कंठा सारखी कायम रहातें, अंतीं झालेल्या नायकनायिकेच्या मधुर—मीलनाचा चटकदार व आनंदपूर्ण प्रसंग वाचतांच वाचकांच्या मनांत सहवेदना उत्पन्न होऊन त्यांचें मन प्रफुल्लीत होईल. (अवृत्ति दुसरी) किं. ८८

११ प्रणय-भंगः—लेखक, श्री. शारदासुत. मनानें वरलेल्या पत्नीची प्राप्ती न झाल्यामुळें पुरुष कसा वेडा होऊन जातो व मनानें वरलेला पती न मिळाल्यामुळें स्त्रियांचें आयुष्य कसें विरह दुःखित जातें याचें अत्यंत हृदयविदारक चित्र ही चटकदार कादंबरी वाचित असतां डोळ्यापुढें उभे राहून वाचकांना तन्मय करून सोडील ! किं. ०४

१२ सुवर्णयुगः—लेखक-श्रीयुत, अनंत नारायण पारसनीस. ह्या नवरसप्रधान कादंबरींतलि आदर्श-नायिका उत्पलसुंदरी हिच्यावर आलेले विलक्षण व हृदयद्रावक प्रसंग, तिचें निर्मल प्रेम, लोकोत्तर दृढ निश्चय, भयंकर हृदययातना, तिचा झालेला छळ, तसेंच नायक पुष्पमित्र याचें असामान्य मनोधैर्य, कर्तव्यजागृति, चेंड्याचें चातुर्य व प्रसंगावधान असे अनेक बहारीचे व चित्ताकर्षक प्रसंग वाचकांचें हृदय खळबळून सोडतील ! हे अनुकरणीय व अलौकिक गुण अवलोकन करून हा काल "कलियुगांतील" नसून सुवर्णयुगांतलि आहे असें वाचकांस वाटेल ! अशी सुबोध व मनोवेधक कादंबरी वाचकांनीं एकवार अवश्य वाचावी, अशी आमची शिफारस आहे. किं. ०१२

चरित्रात्मक पुस्तकें—

१३ महात्मा गांधीः—लेखक-सरस्वतीनंदन. प्रत्येक भारतीय तरुणाच्या अंतःकरणावर सत्याग्रहाचा नवा प्रकाश पाडून उज्ज्वल देशभक्ति, अनुपम स्वार्थत्याग, विलक्षण करारीपणा व विश्वप्रेम जागृत करणारें आदरणीय, त्याहून विशेष अनुकरणीय असें जोरदार भाषेंत लिहिलेलें हें दिव्य पण सचित्र चरित्र वाचून सत्याग्रहाचें हृद्गत समजून घेण्याची हीच वेळ आहे. अभिप्राय उत्तम. आवृत्ति दुसरी. किं. ०८

१४ महाराणा प्रतापसिंह (सचित्र)—ले. लक्ष्मण नारायण जोशी. स्वदेशसेवा हेच ज्याचें व्रत, स्वराज्यपालन हेंच ज्याचे ध्येय, परकीय सत्तेला भ्याडपणानें नम्र न होणें हाच ज्याचा मनोधर्म, शत्रूलाही चकित करून सोडणारी ज्याची रणकुशलता व नीतिधैर्य अशा दिव्य गुणांची उज्ज्वल ज्योत वाचकांचे अंतःकरणांत प्रज्वलित करणारें हिंदु कुल–सूर्य, मेवाडचा केसरी महान् तेजस्वी वीर महाराणा प्रतापचें हे बृहत् राष्ट्रीय जीवन चरित्र. किं. १ रु.

१५ विवेकानंदजीवन अर्थात् **बंगालचे रामदास**–(सचित्र) लेखक–श्रीयुत, कृष्णाजी नारायण आठल्ये, एडिटर केरळकोकिळ. पौर्वात्य व पाश्चिमात्य लोकांवर ज्यांनीं आपल्या सुविचारांची छाप बसवून सारें जग दुमदुमून सोडलें व साता समुद्रांपलीकडे वैदिकधर्माचा झेंडा उभारला, त्या श्रीमद्विवेकानंद स्वामींचें भावोद्दीपक, सुपरिणामकारक असें हें दिव्य चरित्र असून त्यांच्या भक्ति–राज–ज्ञानयोग व इतर व्याख्यानें ह्यांतील निवडक उपदेशामृताचाही समावेश केला असल्यामुळें हें पुस्तक अत्यंत सुबोध व संग्राह्य झालें आहे. (आवृत्ति २री) किं. १ रु.

१६ माझें गुरुस्थानः—लेखक–श्रीयुत, कृष्णाजी नारायण आठल्ये. श्रीमद्विवेकानंदांच्या खास अमृतमय लेखणींतून उतरलेल्या व निस्सीम गुरुभक्तीनें ओथंबलेल्या एका इंग्रजी सर्वोत्कृष्ट ग्रंथाचा हा मधुर कोमल व प्रसादयुक्त वाणीनें रंगविलेला श्रीरामकृष्णपरमहंसांचें सुंदर फोटो-सह रहस्यपूर्ण व तेजस्वी अनुवाद वाचून परमार्थाची गुरुकिल्ली झटपट हस्तगत करून घ्या !! किं. ८६

१७ रशियाचें सूर्यग्रहण—(सचित्र) लेखक—श्रीयुत, लक्ष्मण नारायण जोशी—ज्या अनुमेय अशा सैतानीं धर्माच्या जोरावर रासपुतीनसारख्या यःकश्चित् दारुड्यानें उपवासव्रतानें रशियाच्या निरंकुश सत्तेला आपल्या धार्मिक व तत्काळ मोक्षप्राप्ति करून देणाऱ्या नव्याच व अद्वितीय मंत्राच्या मोहांत बद्ध करून कांहीं कालपर्यंत, जनतेला तुच्छ मानून, जे धर्मावडंबराच्या छद्मी पांघरुणाखालीं झार व झरीना यांच्या सहानुभूतीनें अनेक अत्याचार केले व शेवटीं आपल्या अत्यंत घोर मरणानें झारशाहीच्या शोकपर्यवसायी नाटकाची नान्दी रशियाच्या राजकीय रंगभूमीवर गाऊन, भावी झारशाहीच्या उच्चाटनाची प्रस्तावना केली त्याचें चरित्र प्रकृत पुस्तकांत मोठ्या मार्मिक तऱ्हेनें दिलें असून भाषा फारच जोरदार वठली आहे. किं. ८१२

मानसशास्त्राचीं पुस्तकें—

१८ टेलिपॅथीइंस्ट्रक्टर मानसिक-संदेश शिक्षक (सचित्र)—लेखक डॉ. लक्ष्मण नारायण जोशी. ह्या गुप्त विधिच्या सहाय्यानें दुसऱ्याच्या मनांत चाललेलें विचार आपल्याला कसें समजून घेतां येतात व आपल्या मनांतील गुप्त विचार मौनव्रतानें तिसऱ्यास समजू न देतां दुसऱ्यास कसें समजावून देतां येतात, दुर्बिणीच्या मार्फत परस्परसंदेश पाठवितां येतात, मेंटल फोटोग्राफी म्हणजे स्मरणांतर्गत छायाचित्र कसें डोळ्यांपुढें उभें करतां येईल. वाक्सिद्धीच्या सामर्थ्यानें म्हणाल तें करूं शकाल ! मागाल ते मिळवूं शकाल ! मानसिक सामर्थ्याचें अनेक चमत्कारिक व तत्संबंधांची प्रयोग करण्यास योग्य अशी सचित्र, व सप्रमाण व सविस्तरपणें माहिती मागवून मनोबल वाढवा. किं. ८१२

१९ पर्सनल म्याग्नेटिझम्—वैयक्तिक आकर्षणः— लेखक–प्रो. बाळकृष्ण गोविंद सावर्डेकर. ज्या अद्वितीय मानसिक शक्तीच्या जोरावर जर्मनीचे कैसर लढले ! ज्या अदृश्य शक्तीमुळें कामवेल इंग्लंडचा राजा झाला ती अद्भुत शक्ति अंगीं आणून आत्मोन्नति करून घेणें असल्यास ह्या पुस्तकाचें अध्ययन करा ! जगावर आपलें प्रभुत्व गाजवा ! ! किं. ८८

२० मानसशास्त्रः—लेखक–श्री. पांडुरंग रामचंद्र नंदुरबारकर, प्रिंसिपाल मूकविद्यालय. यांत मनाचे धर्म, त्याची व्याप्ति, त्याच्यापासून घडणारीं महत्कार्यें, मनाची अद्भुत शक्ति इ. गोष्टींचें सुलभ, मुद्देसूद व अनुभवपूर्ण विवेचन केलें आहे. खास सुधारून वाढविलेली आवृत्ति दुसरी. किं.

२१ मेस्मेरिझम इंस्ट्रक्ट[illegible]ची विद्या शिक्षक सचित्र ह्या अमूल्य पुस्तकाचें सहाय्याने वर बसल्या मेस्मेरिझमचे, हिप्नाटिझमचे, थाटरीडिंगचे प्रयोग, कृति, उपपत्ति, चमत्कार करतां येतील, अशीच सप्रमाण व विस्तृत माहिती यांत दिली आहे. ह्या विद्येच्या प्राप्तीनें मनुष्यालाच काय, पण हिंस्र पशुपक्ष्यालाहि वश करून आश्चर्यानें थक्क करून सोडणारीं कार्यें सहज करून घेतां येतील ! औषधांवांचून केवळ मानसिक शक्तीच्या प्रयोगानें असाध्य रोग सहज बरें करितां येतील, मनोवांछित कार्यें, धन दौलत व किर्ती मिळविण्याजोगी गुप्त पण खरी माहिती यांत दिली असल्यामुळें अल्पावधींत भांडवलाशिवाय धंदा करून मुबलक पैसा मिळवितां येतो. किं. १॥ रु.

२३ सचित्र ब्रह्म—योग—विद्या—शिक्षक—अर्थात्–Yeog Philosophy Instructor—**योग फिलासफी इंस्ट्रक्टर**—लेखक श्रीयुत, लक्ष्मण नारायण जोशी–ज्या योगसामर्थ्याच्या जोरावर प्राचीन ऋषिवर्यांनीं त्रिकालज्ञान, दीर्घायुष्य, निरामयत्वें इ. गुणांचा विकास करून ही आर्यभूमी म्हणजे योगशास्त्राचें माहेरघर करून स्वधर्माची दिव्यज्योत प्रज्वालित केली, त्या योगशास्त्राचा अभ्यास हल्लींच्या परिस्थितींतही घरचेघरीं कोणी, केव्हां व कसा करावा, आणि त्याचे नियम, साधनें, फायदे तसेंच त्यापासून आत्मोन्नति व राष्ट्रोन्नति कशी कोणी व कोणत्या मंत्रसाधनानें करून घ्यावी याची बालबोध पद्धतीनें दिलेली अत्यंत सुलभ व स्पष्ट माहिती या पुस्तकांत पौर्वात्य व पाश्चिमात्य ग्रंथाधारानें सचित्र दिली आहे. किं. १ रुपया.

औद्योगिक पुस्तकें—

२४ सचित्र गिल्टि इंस्ट्रक्टर अर्थात **गिल्टि चढविण्याच्या माहितीचा शिक्षक**—लेखक, श्रीयुत, नारायण बळवंत चव्हाण. बॅटरी तयार करणें, बॅटरीनें व इतर अनेक सोप्या पद्धतीनें चांदी सोन्याचेच काय पण वाटेल त्या धातूचें वाटेल त्या वस्तूवर गिलीट चढविणेची माहिती व गिल्टिाच्या इलेक्ट्रोप्लेटिंग पावडर्स इ. घरचेघरीं तयार करून धंदा करता येण्याजोगी सप्रमाण, सप्रयोग, सचित्र, निवडक गुप्त माहिती यांतच दिली आहे. (खास सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्ति)

किं. ८१२

२५ **धंदे-शिक्षक—म्हणजे इंडस्ट्रियल इंस्ट्रक्टरः**—लेखक श्रीयुत, स्वरस्वतीनंदन. श्रीमंतापासून गरिबापर्यंत नित्य व्यवहारांत लाग णारे अनेक सर्वोपयोगी जिन्नस घरच्यावरीं तयार करून अल्प श्रमांत व थोडक्या भांडवलांत ५–१० रुपये रोज प्राप्ति करून घेतां येण्याजोगी कलाहुन्नराची गुप्त व खरी माहिती देणारा व धंदा कसा करावा. याची सप्रमाण माहिती देणारा "धंदे शिक्षक" आज मागवून पैसा मिळवा ! उद्योगी व्हा ! धंदे शिका ! ! सुधारून वाढविलेली आवृत्ति दुसरी संपत आली. किं. ८८.

२६ **बुट पॉलिश इंस्ट्रक्टर**—लेखक डॉ. लक्ष्मण नारायण जोशी. बुट, पट्टे, ब्यागज, पाबा वगैरे कातड्यांच्या वस्तूंला लावण्याचे घट्ट व पातळ, काळी, निळी, हिरवी, पिंवळी, पांढरी, अनेक रंगाचीं व अनेक तऱ्हेची पॉलिशेस घरच्यावरीं १२ रुपयांच्या भांडवलांत व अल्प श्रमांत तयार करण्याची सप्रमाण व सप्रयोग चरितार्थ चालविण्याजोगी गुप्त माहिती मिळवा ! धंदा करा ! ! भरपूर पैसा मिळवा !! किं. ८८

निबंधात्मक पुस्तकें—

श्री गायकवाड सरकारांकडून बक्षिसासाठीं मंजूर झालेले.

२७ **ब्रह्मचर्याश्रम**—लेखक श्री. कृष्णाजी नारायण आठल्ये, एडिटर नवमन्वंतर. यांत ब्रह्मचर्याश्रम म्हणचे काय ? तें कसें पाळावें, त्यापासून फायदे व परिणाम इ. अनेक गोष्टींचें विद्यार्थी त्यांचें पालक व शिक्षक ह्यांचे हृत्पटलावर प्रकाश पाडून पुढील आयुष्यक्रम सुखावह करण्याविषयीं सुपरिणाम घडविणारें दिव्य शब्दचित्र स्पष्ट व मधुर रेखाटलें आहे. विद्यार्थ्यांनीं जरूर वाचावें. किं. ८४

२८ आत्मरहस्य:—लेखक श्री. कृष्णाजी नारायण आठल्ये. सुप्रसिद्ध पाश्चात्य पंडित मि. जेम्स एलनच्या (From Passion Peace) या लोकमान्य पुस्तकाच्या आधारें हें पुस्तक लिहिलें असून ह्याच्या वाचनानें विषयवासनारूपी नरककुंडांत गटांगळ्या खाणारा मनुष्यहि मोक्षमार्गाला लागेल. जगावर आपलें प्रभुत्व गाजवील ! पतिताहून पतित मनुष्यालाहि शांतिसुखाचा लाभ व नवजीवन प्राप्त होईल ! मूर्खाहून मूर्ख मनुष्य बुद्धिमान होईल. निर्बल मनुष्य बलवान् होईल ! इतकेंच काय पण निर्धनाहून निर्धन मनुष्यंहि धनवान् होईल ! किं. ८६

२९ प्राकृत हंसगीता:—भगवान् श्रीकृष्णांनी हंसरूपानें आत्मोन्नतीसाठी जो उत्कृष्ट उपदेश केला तो ह्या चिमुकल्या पुस्तकांत चालोद्यानपद्धतीनें व सुलभ भाषेंत निवेदन केला आहे. किं. ८१॥

(८२ चीं तिकिटें पाठवा.)

आरोग्य-चिकित्सक पुस्तकें—

३० लंघन चिकित्सा-शिक्षक म्हणजेच **फास्टिंग इंस्ट्रक्टर** (सचित्र):—लेखक-डॉ. लक्ष्मण नारायण जोशी. ज्या लंघन शास्त्रावर अमेरिकेसारख्या सुधारलेल्या देशांत अनेक रुग्णालयें निघून लाखों लोक प्रत्यहीं औषधाशिवाय फक्त उपवासानें रोगमुक्त होत आहेत, त्या लंघनशास्त्राची ही सविस्तर व गुप्त माहिती यांत दिली आहे. याचे सहाय्यानें सांथीसारखे भयंकर रोग सहज बरे करतां येतील ! तरुणांना निरामयत्व दीर्घायुष्य व नवजीवन प्राप्त होईल! पैसा व कीर्ति मिळेल ! आरोग्याचें स्वर्गसुख भोगा !! किं. एक रुपया

३१ क्रीमोपॅथी इंस्ट्रक्टर—वर्णजल चिकित्सा **शिक्षकः**– (सचित्र) लेखक श्रीयुत सरस्वतीनंदन. ज्या सूर्यपुटी जलाच्या प्रभावानें आज अमेरिकेसारख्या सुधारलेल्या देशांतसुद्धां नानातऱ्हेचीं औषधें घेऊन कंटाळलेले हजारों असाध्य रोगी रोगमुक्त होत आहेत. त्या अपूर्व विद्येची सचित्र व सप्रयोग माहिती ह्यांत दिली असून ही गुप्त पण अगदीं सोपी विद्या प्रत्येक स्त्रीपुरुषानें अवश्य शिकून कधीं न संपणारा व हटकून गुण देणारा दिव्यौषधींचा दवाखाना उघडा ! रोगग्रस्तांना नवजीवन प्राप्त करून द्या ! ! पैसा व कीर्ति मिळवा ! ! ! सुधारून वाढविलेली तिसरी आवृत्ति. किं. ०१२

३२ जलतत्त्व–चिकित्सा–शिक्षक अथवा **वॉटर–मेरिट इंस्ट्रक्टर** (सचित्र) लेखक–डॉ. लक्ष्मण नारायण जोशी. औषधा-शिवाय केवळ थंड पाणी, कोल्डबाथ–थंड स्नानें, हॉटबाथ–उष्णस्नानें, एनिमा–बस्ति, जलपान, आर्द्रवसनवेष्टनें इ. सुलभ व बिनखर्ची उपचा-रांनीं अनेक दुर्धर व असाध्य रोग डॉक्टर वैद्यांच्या मदती शिवाय घरच्याघरीं बरे करण्याची पौर्वात्य व पाश्चात्य अनेक ग्रंथाधारें दिलेली सप्रमाण, सप्रयोग व गुप्त माहिती शिकून रोगमुक्त व्हा ! जलौषधींचें दवाखानें उघडून परोपकार करा ! नैसर्गिक उपचारानें आरोग्याचे स्वार्गियसुख संपादन करा ! ! अल्प श्रमांत धनदौलत व कीर्ति मिळवा ! औषधासाठीं व्यर्थ पैसा खर्च करूं नका ! ! किं. १०८

स्त्रियांकरितां निवडक पुस्तकें—

बापानें आपल्या लाडक्या **कन्येला**, सासऱ्यानें आपल्या **सुनेला** भावानें आपल्या **बहिणीला** व पतीनें **प्रिय पत्नीला भेट** देण्याजोगी **बोधपर** पुस्तकें.

३३ भाऊबिजेची ओवाळणी:—बंधुप्रेमानें चितवृत्ति उंचबळविणाऱ्या व खऱ्या बंधुप्रेमाची ओळख पटवून देणाऱ्या बोधपर गोष्टी, रसाळ कविता, अंतःस्फूर्तीनें ओतप्रोत भरलेले निबंध इ० महाराष्ट्रांतील प्रमुख विद्वान् व पदवीधरांनी लिहिलेलें सतरा सूत्रमय व तेजस्वी निवडक लेख, आर्यभगिनींच्या हृत्पटलावर उच्च नीतितत्त्वांचा दिव्य प्रकाश पाडतील ! म्हणून आपल्या लाडक्या भगिनीला भेट पाठवा. किं. ०८

३४ सासुरवासाचा पश्चात्ताप:—द्वाड सासूच्या सासुरवासाचें हृदयद्रावक व अत्यंत चटकदार काव्यमय असें हें शब्दचित्र प्रत्येक आर्यभगिनीनें एकवार तरी जरूर वाचावें. अभिप्राय उत्तम. किं. ०१

३५ माहेरची देणगी:—सुशिक्षित बालिकांना पाठ करण्यायोग्य निरनिराळ्या चालींवर म्हणतां येण्याजोगीं अत्यंत चटकदार व बोधप्रद अशीं निवडक आठ पद्यें. (०१॥ चीं तिकीटें पाठवा.) किं. ०१

३६ स्कूल-ड्रिल (व्यायामपद्धती):—हल्लीं प्रत्येक शाळेंत चालू असलेल्या ड्रिलसंबंधानें क्रमवार व सविस्तर माहिती ह्या पुस्तकांत दिली असल्यामुळें, प्रत्येक शाळा–मास्तरांस ह्या पुस्तकाचा विशेष उपयोग होणार आहे. [०२॥ चीं तिकिटें पाठवा.] किं.०२

पाश्चिमात्य इतिहास—

३७ रशियांतील बोल्शेव्हिझम खण्ड-पहिला–(सचित्र) लेखक–श्री. लक्ष्मण नारायण जोशी. (ब्युरोक्रसी) नोकरशाहीच्या जुलमी कारभाराला त्रासून रशियाच्या बलाढ्य झारशाहीचें जोखंड एकदम झुगारून देऊन, लोकछंदानुवर्ती राज्यसत्तेच्या तत्वाचा–बोल्शेव्हिझमचा कसा उदय झाला, ह्याचा सांगोपांग इतिहास बोल्शेव्हिकांच्या पुढाऱ्यांच्या वीस चित्रांसह प्रकृत पुस्तकांत दिला असून, स्वच्छंदी राज्यचालकांच्या जुलमानें संत्रस्त झालेली प्रजा अवघ्या एका आठवड्यांत कशीं राज्यक्रांती घडवून आणूं शकतें हें स्पष्टपणें स्वकृतीनें तिनें दाखविलें आहे. किं. ८१८

३८ रशियांतील बोल्शेव्हिझम खण्ड दुसरा (सचित्र) लेखक, ल. ना. जोशी. रशिया देशांतील बोल्शेव्हिक––प्रजाजनांनीं स्वमतानुसार राज्यक्रांन्ती घडवून आणिल्यावर, नव्या अशा स्वमततत्वांवर स्वराज्याची उभारणी कशी करितां येतें याचें उत्कृष्ट चित्र सोव्हिएट सरकारनें जें जगापुढें मांडिलें आहे तें व त्याच सरकारनें रशियाची राज्यसूत्रें आपल्या हातीं घेऊन बिडालवृत्तीच्या स्वार्थी व परकीय राज्यसत्तांना कशा तऱ्हेनें आपल्या तत्वांची दहशत बसवून, सोव्हिएट सत्तेचा सर्व जगभर प्रसार करण्याचा कसा प्रयत्न करीत आहे व हताश स्थितींतही स्वतःच्या पायांवर उभे राहून स्वराज्यनौका उत्तम वल्हवतां येण्याच्या शक्यतेची नौबत कशी वाजवितां येतें ह्याचे विस्तृत शद्बचित्र ह्या खण्डांत रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. अनेक चित्रें व भरपूर नकाशेही दिलें आहेत. (छापत आहे.) किं. १८८

लौकरच छापून प्रसिद्ध होणारीं पुस्तकें.

१ सचित्र प्राणायाम-शिक्षक. (डॉ. लक्ष्मण नारायण जोशी)
२ स्पिरिच्युयालिझम इंस्ट्रक्टर. ,,
३ फलाहार–चिकित्सा–शिक्षक. ,,
४ चित्राङ्गदा (नाटक) ,,
५ चव्हाणी समशेर. ,,
६ गृहिणी–कर्तव्य. ,,
७ सती परिक्षा. (श्रीयुत. भ. ऊ श्रीधर कुलकर्णी)
८ सती चंद्रावती. (श्री. सौभद्र)
९ केवळ विश्रांतिसाठीं. (संपादक ना. व. चव्हाण)
१० नेचर–क्युअर–इंस्ट्रक्टर. (श्री. कृष्णाजी नारायण आठल्ये)
११ सगुण भक्तिमार्ग.
१२ तीन कृष्णकृत्यें. (दुसरी आवृत्ति)
१३ जर्मनीचे महात्त्वाकांक्षी कैसर. ! ,,

फुकट—मराठी भाषेचे अभिमानी व वाचनप्रिय अशा तीस गृहस्थांचीं पूर्ण पत्त्यासह नांवें कळविणारांस प्राकृत हंसगीता नव्या खास यादीसह फुकट पाठवूं.

किंमतीशिवाय टपाल व प्याकिंग खर्च वेगळा पडेल.

प्रो. ज्ञानमित्र, शनवार पेठ ४८३, पुणें–सिटी.

Harihar Press Poona.

DECCAN VERNACULAR TRANSLATION SOCIETY, POONA. 1894



महाराणा प्रतापसिंह

सचित्र

महाराणा प्रतापसिंह

परिच्छेद पहिला.

मेवाडचा पूर्ववृत्तान्त.

जयजयजय चितौर दुर्ग, जय गड सिररत्न, जगतविख्यात।
जिसने धर्मप्रेमकेकारण, सहे शत्रुओं के आघात॥
जिसके पत्थर कङ्कड तक पर, लिखा हिंदुओं का इतिहास।
जिस्को देख हमे हो सक्ता, अपनी दृढता का आभास॥

—श्रीधर.

वाचकहो, ज्याप्रमाणें नुसतें बोट दाखवून भुवनभास्कराचा कोणासही परिचय करून देतां येणार नाहीं, त्याचप्रमाणें आपल्याला मेवाड आणि त्याची राजधानी चितोड यांचा कसा काय परिचय करून द्यावा या विचारांत मन घुटमळतें आहे. मेवाडसारख्या प्रचंड ऐतिहासिक कार्यांच्या या अल्पसंख्यांक पृष्ठांच्या पुस्तकांत ग्रथित करणें

म्हणजे हत्तीचें चित्र मुंगीहूनहि लहानग्या कीटकासारखें तयार करण्या-इतकेंच अवघड आहे. मेवाडचा लौकिक कोणच्याही एखाद्या काना-कोपऱ्यांत दडून राहिलेला नसून, तो चितोडच्या किल्यांतही लपून बसलेला नाहीं. मेवाडचा अतुल गौरव विश्वविदित आहे. अशा त्या विश्वविदित गौरवाचें थोडक्यांत वर्णन करण्यास आमची साधी लेखणी असमर्थ असल्याकारणानें, तो इतिहास थोडक्यांत लिहिण्याची बुद्धि सिध्यांत उतरत व्हावी म्हणून, आम्ही प्रथम, मेवाडचा वीरनायक जो महान् प्रतापशाली महाराणा प्रतापसिंह, त्याला वंदन करतों. भारत-वर्षाचे अतुल देव आणि हृदयेश्वर प्रतापराज, आपल्यासारख्या अलौकिक विभूतीचें गुणगायन करण्यास आमची लेखणी असमर्थ आहे. प्रतापराज, आपल्या अनन्त प्रतापाचा महिमा वर्णन करायला—शेंकडों तर काय पण हजारों—लाखो—कवि, लेखक आणि चित्रकार, झटून मेहनत घेऊं लागले, तरी जेथें पुरे पडायचे नाहींत, तेथें माझ्या सारख्या लघुमति लेखकाची ती किंमत काय? असें जरी आहे, तरी धारिष्ट करतोंच! आपली कृपा असावी.

भारतवर्षात ज्यावेळीं अशान्तीची ज्वाला भडकली होती, ज्या वेळीं भारतवर्षात धर्मभूमीला कर्मभूमीचें स्वरुप प्राप्त होऊन आत्म-गौरव आणि स्वजातीयांचा अपमान केला जात होता, अशा वेळीं राणपुतांनीं—विशेषतः मेवाडच्या क्षत्रिय वीरांनीं—स्वदेश, स्वधर्म आणि स्वराज्य यांची उपासना चालविली होती. मेवाडच्या स्वातंत्र्यासाठीं,

स्वधर्माकरितां आणि स्वबांधवानां अक्षुण्ण राखण्याकरितां मेवाडच्या क्षत्रिय वीरांनीं आपल्या सर्वस्वाचें विसर्जन केलें होतें. ही मेवाडची गादी, रघुकुलमुगुटमणि श्रीरामचंद्राचा मुलगा जो लहु त्याच्या वंशजांची आहे असा लौकिक आहे. कविकुल-गुरु वसिष्ठांनीं आपल्या कथानकांत असें म्हटलें आहे कीं, रामचन्द्रांनीं निजधामास जातांना लव्हाला उत्तर कोसलाचें व कुशाला दक्षिण कोसलाचें—अशीं राज्यें दिलीं. उत्तर कोसलाची राजधानीं श्रावस्ती नावांचीं नगरी गोंड जिल्ह्यांत आहे. तेथें लव्हाच्या किती वंशधरांनीं राज्य केलें याबद्दलची माहिती अनुपलब्ध आहे. कर्नल टॉडच्या मताप्रमाणें मेवाडच्या सांप्रतच्या राजवंशाचा पूर्वज जो कनकसेन, त्यानें प्रथमतः त्या आपल्या जन्मभूमीचा त्याग केला. त्याच्या कांहीं वंशधरांनीं सौराष्ट्र येथें व कांहींनीं वल्लभपुर येथें राज्यें स्थापन केलीं. शिलादित्य नांवाचा राजा ज्यावेळीं वल्लभपुरांत राज्य करीत होता, त्या वेळीं हूणांनीं वल्लभपुरावर स्वारी केली व त्या राज्याचा धुव्वा उड-विला. त्यावेळीं राजा युद्धांत मारला जाऊन त्याची राणी जी [1]पुष्पवती ती गर्भवति होती. ती तशा त्या भयंकर प्रसंगीं जंगलांत पळून जाऊन, एका गुहेंत दडून राहिली होती. तेथेंच ती प्रसूत होऊन, तिला एक

---

[1] कांहीं इतिहासकारांनीं या राणीचें नांव कमलावती व तिच्या पुत्राचें नांव केशवादित्य होतें असें म्हटलें आहे.

पुत्र झाला. त्या मुलाचा जन्म गुहेंत झाला म्हणून त्याचें नांव गूह असें पडलें. मेवाडचे रजपूतगण गूहाचे वंशधर असल्याकारणानें ते [1]गोलिहट अथवा गिलेहत या नांवानें प्रसिद्धीस आले. पुढें बराच काळ लोटल्यावर याच गूहवंशांत एक नागादित्य नांवाचा जो राजा झाला होता त्याच्या पोटीं प्रसिद्ध बाप्पारावळाचा जन्म झाला.

बाप्पा [2]रावळ मोठा प्रतापी होता. तो स्वतांचें वडिलार्जित प्राप्त झालेलें राज्य रक्षण करूनच नुसता तृप्त न राहतां, त्यानें मी मी म्ह...

---

[1]कांहीं इतिहासकारांचे असें मत आहे कीं, बाप्पारावळाच्या गूह नामक मुलावरूनच गुलीहत असें म्हटलें जातें. राहमजीच्या वेळेपर्यंत बाप्पारावळाच्या वंशजांना गुहीलत असें म्हणत असत; परंतु राहमजीच्यानंतर त्याच्या वंशधरांना सिसोदिया म्हणूं लागले. शिसोदिया किंवा शिसोदे असें नांव पडण्याचें कारण राहमजी हा शिसोदें गांवीं राहात असे म्हणून त्याच्या वंशाला तें नांव पडलें असें जरी म्हणातात, तरी कांहींचें म्हणणें असें आहे कीं, राहमजीनें चुकून मदिरापान केलें होतें व त्या चुकीचें प्रायश्चित्त म्हणून त्यानें शिसें पातळ करून प्राशन करून परलोकगमन केल्यामुळें, त्याच्या वंशजांना शिसोदे असें म्हणूं लागले. ही आख्यायिका बरी दिसते.

[2]केशवसेनही मोठा पराक्रमी होता. ईडरच्या राण्यानें त्याला आपला उत्तराधिकारी केलें होतें. ईडर व त्याच्या आसमंताद्भागांवर त्याच्या नागादित्य वंशजापर्यंतचे राणे राज्य करीत होते. नागादित्याच्या मृत्युसमेयीं

विणाऱ्या वीराग्रणींचे पराजय केले होते. लोकप्रियता विजयांतच निवास करीत असते. जे आपल्या बाहुबलानें यशःसौरभाच्या शिखरावर चढण्याची इच्छा करतात, त्यांच्या गळ्यांत विजयादेवी जयमाळा घातल्याचांचून राहात नाहीं. याच न्यायानें विजया देवी हळू हळू बाप्पारावळावर प्रसन्न होत होती. त्यानें आपल्या अनन्त पराक्रमाच्या बळावर चितोडावरहि आपलें निशाण फडकावलें असें नव्हे, तर त्यानें—इस्पहान, कंदाहार, काश्मीर, इराक, इराण, तुराण[१] वगैरे पाश्चिमात्त्य बादशाह्याहि पराजित केल्या होत्या.

बाप्पा जेव्हां चितोडच्या सिंहासनावर विराजमान झाला, तेव्हां त्याचें वय अवघें चौदा वर्षांचें होतें. त्यानें इ. स. ७२८ मध्यें चितोडचा राजदंड हातीं धरून पश्चिमेस इराणापर्यंत आपल्या राज्याची मर्यादा वाढविली. त्याच बाप्परावळाच्या वंशज्याच्या हातीं अद्यापी चितोडची गादी कायम आहे. चितोडचे रजपूत वीर अद्यापी त्यालाच आपला आदिपुरुष मानून त्याची देवतुल्य पूजा करितात.

बाप्पारावळाचें वय अवघें तीन वर्षांचें होतें. ज्या लक्ष्मणावतीनें केशवादित्याचें रक्षण केलें होतें, तिच्याच वंशधरांनीं बाप्पारावळाचें रक्षण केलें. बाप्पाचें खरें नांव कालभोज असें होतें; परंतु तो प्रजेचा लाडका असल्याकारणानें त्याचें नांव बाप्पा असें पडलें.

[१]कर्नल टॉडकृत ऍनल्स व ऍन्टीकेरीज ऑफ राजस्तान हें पुस्तक वाचावें.

बाप्पारावळाला पुष्कळ मुलगे होते व ते आपल्या पित्याप्रमाणेंच पराक्रमी असल्यामुळें, त्यानींही दूरवर प्रदेश काबीज करून आपल्या वैभवांत अलोट भर टाकली. त्यावेळीं बाप्पाच्या वंशधरांच्या हातीं—उदेपूर, डुंगरपूर, प्रतापगड व बासवाडा—या चार संस्थानांची अधिकारसूत्रें होतीं. नेपाळचें स्वतंत्र राज्यही अद्यापी शिसोदे कुळांतील रजपुतांचेंच आहे. औरंगजेबाला तोंडांत बोट घालायला लावणारे प्रातःस्मरणीय पुण्यश्लोक असे जे महाराष्ट्राधिपती शिवाजी महाराज तेही शिसोदे कुळांतीलच होते. असो. हा प्रसंग मेवाडचा स्वतंत्र इतिहास लिहिण्याचा नसल्यामुळें, कालक्रमाची घटना सोडून देऊन, फक्त एवढेंच येथें सांगायचें आहे कीं, बाप्पारावळाच्या वंशजांच्या नवव्या पिढींत जो रावळ खुमान म्हणून प्रसिद्ध पुरुष होऊन गेला, त्यानें मोठ्या भीषण युद्धांत खुरासानच्या[१] एका प्रसिद्ध वीराची ज्यावेळीं हंबलंडी उडवून दिली होती, त्यावेळीं भारतवर्षाचें सद्यःकालाप्रमाणें अधःपतन झालेलें नव्हतें. सध्यांच्या आम्हां हिंदुस्तानवासीयांप्रमाणें त्यांनीं आत्मसन्मानाला तिलांजुली दिलेली नव्हती. त्यावेळीं हिंदुराजांनीं स्वातंत्र्य व ऐक्य यांच्या शुभ अशा उपासनेपासून आपलीं मनें पराङ्मुख केलेलीं नव्हतीं. एका हिंदुराजावर संकट कोसळलें असतां, बाकीचे सर्व हिंदुराजे, एकजुटीनें त्याच्या मदतीला धांवून जात असत.

[१] कांहीं प्राचीन पुस्तकांत महमूद खुरासानी असें लिहिलें आढळतें; पण कर्नल टॉडचें असें अनुमान आहे कीं, तो खलिपा मामू होता.

यालाच अनुसरून, खुमानसिंह रावळाच्या मदतीला—दूरदूरचे हिंदुराजे एकजुटीनें आल्या कारणानेंच, खुरास्सानी स्वारींत त्याची फत्तेमंदी झाली. खुमानसिंहापासून पुढें समरसिंहापर्यंत जितके राजे राज्यासनावर अधिष्ठित झाले, त्या सर्वांत समरसिंहाइतका शूर राजा दुसरा कोणीच झाला नाहीं. परस्परांत फूट पाडून आपल्या भारतभूला पारतंत्र्याच्या शृंखलेनें जखडबंद करणारा क्षत्रिय कुलकलंक कनौजचा राजा जो जयचंद्र, त्याच्याकडून इशारा पोंचतांच, दिल्लीच्या पृथ्वीराजावर जेव्हां शहाबुद्दीन घोरीनें स्वारी केली, त्यावेळीं [1]समरसिंहानें आपल्या अतुल पराक्रमानें बेहद्द युद्ध केलें व अखेरीस वीरगतीची वाट धरली.

समरसिंहाप्रमाणेंच मेवाडच्या अनेक वीररत्नांनीं वेळोवेळीं अद्भुत पराक्रम करून जगताला चकित आणि स्तंभित करून सोडलेलें आहे. समरसिंहानंतर बरेच राणे मेवाडच्या गादीवर बसले, परंतु संवत १३३१ (सन १२७४) [2]मध्यें जे लखमसी अथवा लक्ष्मणसिंह

---

[1]समरसिंहजींनीं फारच मोठें शौर्य गाजविलें. त्याचा पुत्र कल्याणसिंह मुसलमानाशीं लढत होता. तो जरी मारला गेला, तरी समरसिंहानें यत्किंचितही शोक केला नाहीं.

[2]हें युद्ध ज्यावेळीं चाललें होतें, त्यावेळीं पृथ्वीराजाच्या पतनाचें वृत्त त्यांस जरी समजलें होतें, तरी ते आपल्या कर्तव्यापासून च्युत न होतां, ती दुःखद वार्ता ऐकूनही त्यांनीं घनघोर युद्ध चालविलेंच होतें. कांहीं इतिहासकारांनीं असें लिहिलें आहे कीं, पृथ्वीराज शत्रू-

गादीवर बसले होते, ते अज्ञान असल्याकारणानें, ते वयांत येईपर्यंत त्यांचे चुलते भीमसिंह राज्यकारभार करीत होते. भीमसिंहाच्या महाराणी पद्मावतीला हरण करून नेण्यासाठीं, दिल्लीश्वर अल्लाउद्दीन खिलजीनें मेवाडवर स्वारी केली. त्या प्रसंगीं रजपूत रणगाजींनीं अल्लाउद्दीनाच्या तोंडचें पाणी जरी प्रथम पळविलें होतें, तरी त्याच्या सेना-

---

कडून मारला न जातां शत्रूकडून जिवंत पकडला गेला होता. परलोकवासी कविराज श्यामलदासजींचें असें मत आहे कीं, समरसिंह हे पृथ्वीराजाचे समकालीन नव्हते; परंतु मथुरानिवासी पंडित मोहनलाल विष्णुदास त्यांच्या म्हणण्याचें खण्डन करून असें म्हणतात कीं, " जो शिलालेख उपलब्ध झाला आहे त्यावरून तो समकालीन होता असेंच सिद्ध होतें. " कविराज शामलदासजींचें असेंही म्हणणें आहे कीं, " चंद्रकवीकृत–पृथ्वीराजरासा–नांवाचा जो ग्रंथ उपलब्ध आहे तो अस्सल नाहीं. हेंही त्यांचे म्हणणें स्वर्गस्थ मोहनलाल पंडितांनीं खोडून काढलें आहे. मेवाडचे स्वर्गस्थ महाराणा सर फत्तेसिंह यांच्या कारकीर्दींत कविराज श्यामलदास यांनीं मेवाडचा ' वीरा–विनोद ' नांवाचा जो बृहत् इतिहास लिहिला होता त्याचा कांहीं अंश सुधारक यंत्रालयांत छापलाही होता; पण पुढें तो छापणें बंद कां झालें तें समजत नाहीं. तो पूर्ण छापून काढवण्याची जर सांप्रतच्या राणाजींनीं व्यवस्था केली, तर आर्यावर्तांतील नरपुंगवांची वीरलीला जगापुढें सहजीं येणार आहे. राणाजींना ही गोष्ट अशक्य नाहीं.

सागरापुढें त्यांच्यानें फार वेळ टिकाव धरवला नाहीं. त्यामुळें चितोडचा भाग्यभंग झाला व पद्मावतीसह अनेक वीरपत्नींनीं आपल्या कोमल देहाच्या आहुती, अग्निदेवाला देऊन, धर्मरक्षण केलें. त्या प्रसंगीं रजपूत वीर शत्रूशीं एकसारखे सहा महिने झुंजत होते.

मेवाडचें स्वातंत्र्य नष्ट झाल्यावरहि मेवाड मुसलमानांच्या ताब्यांत फार दिवस टिकला नाहीं. आपल्या मातृभूमीची झालेली दुर्दशा पाहून, मेवाडच्या स्वातंत्र्याभिलाषी क्षत्रियवीरश्रेष्ठांच्या अंगांतलें रक्त, स्वातंत्र्यप्राप्तिसाठीं उसळूं लागलें. त्यांनीं थोड्याच अवधींत मातृभूमीच्या स्वातंत्र्याचें निशाण ऊभारलें. लक्ष्मणसिंहाच्या मागून कांहीं पिढ्यांनीं जे हम्मीरसिंह म्हणून गादीवर आले, त्यांच्या कारकीर्दींत व त्यांच्या पुढें जे अनेक राणाजी मेवाडच्या गादीवर बसले, त्यांनीं चितोडगडाच्या स्वातंत्र्याचें उत्तम रक्षण केलें. त्यांच्यावर अनेक संकटें आलीं, तरी ते आपल्या निश्चयापासून परांङ्मुख झाले नाहींत. महावीर हम्मीरसिंहानंतर शंभर वर्षांनीं राणा कुंभाजीनें मेवाडची बरीच उन्नति केली. पराजित होऊन शरण आलेल्या वीराला पददलित करण्यानें अथवा मृताला मारण्यानें खऱ्या वीराला शोभा येत नाहीं. शरणागताचें रक्षण करून, त्याच्याशीं दयापूर्ण व्यवहार करणें हेंच खऱ्या वीराचें कर्तव्य असतें. राणा कुंभाजीचें चरित्र अशाच देवभावानें भरलेलें आहे. त्यानें कित्येक वेळां शरणागत शत्रूंवर दया करून त्यांची मुक्तता केल्याचीं उदाहरणें इतिहासांत आहेत. त्यानें गुजराथ आणि माळवा

यांतलि रणक्षेत्रांतून मुसलमानांना अनेक प्रसंगीं पिटाळून लावलें होतें. कोणच्याही शरणागत शत्रूशीं कपटाचें वर्तन त्यानें कधींच केलें नाहीं. त्याच्या चरित्रासारखी खऱ्या मर्दाला शोभणारीं चरित्रें फारच विरळा ऐकूं येतात व वाचायला सांपडतात.

भारतवर्षांतील इतर प्रान्त आणि जगांतील इतर देश यांत उत्पन्न झालेल्या कुलकलंक्यांप्रमाणें मेवाडांत कोणीच उत्पन्न झाले नाहींत असें नाहीं. चितोडांतही मधून मधून असे कुलांगार उत्पन्न झाल्याचीं उदाहरणें सांपडतात. त्यांनीं केलेल्या निंद्य व नीच गोष्टी राष्ट्राच्या घातास बऱ्याच कारणीभूत झालेल्या आहेत. तरी पण परमेश्वरी सत्तेनें आजपर्यंत चितोडचें उत्तम रक्षण झालेलें आहे. मेवाडच्या इतिहासाची मननपूर्वक छाननी करतांना असें आढळून येतें कीं, चितोडांत जरी, कुलकलंकी, देशद्रोही व परावलंबी पुरुष उत्पन्न झालेले दिसतात, तरी चितोडच्या वीर क्षात्रियांतले बहुसंख्यांक वीर, आपल्या देशरक्षणाच्या कामींच उपयोगी पडलेले दिसतात. एखाददुसऱ्या कुलकलंक्याच्या नादीं लागून, द्रव्याच्या लालसेनें, सर्व लोक चितोडला पारतंत्र्यांत ढकलण्यास तयार झाल्याचें एकही उदाहरण इतिहासांत सांपडायचें नाहीं. महाराणा कुंभाजीचाच प्रत्यक्ष कुलकलंक पुत्र उदयसिंह त्या इतिहासांत होऊन गेलेला दृष्टीस पडतो. कुलकलंकी उदयसिंहानेंच प्रत्यक्ष आपल्या पित्याला विष पाजलें व त्यायोगेंच त्याचा देहांत झाला.

पितृघातकी उदयसिंहानें कांहीं काल आपल्या पित्याच्या म्हणजे थोर पूर्वज बाप्पारावळाच्या पवित्र सिंहासनाचा उपभोग घेतला. राणा कुंभाजीनें आपल्या पावित्र्यानें, बुद्धिबलानें, शौर्यानें व परिश्रमानें चितोडचें जें वैभव वाढविलें होतें, त्या सर्वांचा उदयसिंहाच्या कारकीर्दींत जरी बराच ऱ्हास झाला, तरी आपल्या भावांचे खून करून, पित्याला कैदेंत टाकणाऱ्या औरंगजेबाला जशी मुसलमानांनीं मदत केली, त्याचें अनुकरण मात्र रजपुतांनीं केलें नाहीं. उदयसिंह हा एकटाच स्वतांच्या पातकांचा जबाबदार होता. आपल्या स्वदेशाची—आपल्या मातृभूमीची—दुर्दशा पाहून रजपूत लोकांचीं अंतःकरणें विव्हल झालीं. राणा कुंभाजीच्या रायमल नामक ज्येष्ठ पुत्रानें, उदयसिंहाला सिंहासनावरून पदच्युत केल्यावर, गुप्तपणें पळून जाऊन, त्यानें दिल्लीश्वराची साहाय्यता मागण्यास, दिल्लीस प्रयाण केलें व आपली मुलगी बादशहाच्या गोशांत घुसवून त्याचें साहाय्य मिळविण्याचा त्यानें उपक्रम केला; पण राजांचा राजा, महाराजांचा महाराज व सम्राटांचा सम्राट जो जगदीश्वर, त्याला ती गोष्ट मंजूर झाली नाहीं. शिसोदे वंशाला असा कलंक लागूं देण्याची त्याची इच्छा नव्हती. बाप्पा रावळाचा पवित्र रविवंश अपवित्र करून, चितोडची मानमर्यादा नष्ट करण्याची भगवंताची मनीषा नव्हती. उदयसिंह दिल्लीकडे जात असतां, त्याच्यावर मार्गांतच एकदम वीज पडून तो ठार झाला. “ **आम्हीं आपली बेटी कधींही मुसलमानांच्या गोशांत घुसूं देणार नाहीं** ” ही जी मेवाडच्या राण्यांची प्रतीज्ञा,

तिचें पालन करण्यासाठीं, प्रभूनें वरील गोष्ट घडवून आणली असावी असें मानल्यावांचून गत्यंतरच नाहीं. यावरून असें सिद्ध होतें कीं, जो स्वधर्माचें श्रद्धेनें रक्षण करतो, त्याची साहाय्यता करण्यास भगवानहि तत्पर असतोच असतो.

राणा रायमलच्या कारकीर्दींत मेवाड जरी पूर्णपणें आपल्या ओजांत होतें, तरी भारतवर्षाच्या आदर्शांत त्यावेळीं, बराच फेरबदल झालेला होता. महाभारताच्या महासंग्रामानंतर, ज्या दुष्ट राक्षसी भाऊबंदकीनें भावांभावांत फूट पाडली होती, त्याच चांडालिनी भाऊबंदकीनें राणा रायमलाच्या[१] तिघां पुत्रांच्या हृदयांत प्रवेश केला आणि त्यामुळेंच मेवाडची त्यावेळीं विशेष उन्नति झाली नाहीं.

---

[१] राणा रायमलला तीन पुत्र होते. संग्रामसिंह, पृथ्वीराज आणि जयमल. संग्रामसिंह हा शूर, शान्त आणि गंभीर वृत्तीचा होता. पृथ्वीराज हा मोठा पराक्रमी, साहसी, उत्साही व रणशूर होता. संग्रामसिंह हा ज्येष्ट पुत्र असल्यामुळें राणा रायमलच्या गादीवर बसला. पृथ्वीराज आणि संग्रामसिंह यांच्यांत गादीबद्दल तंटा होऊन, संग्रामसिंहानें पलायन केलें व त्यामुळें रायमलानें क्रुद्ध होऊन पृथ्वीराजाला राज्यांतून हांकून लाविलें. या पृथ्वीराजासंबंधानें इतिहासांत फारच चमत्कारिक गोष्टी वाचण्यास सांपडतात. असें सांगतात, कीं एकदां चितोडच्या दरबारीं माळवी बादशहाचा एक सेवक आला असतां, राणा रायमल त्याच्याशीं मोठ्या अदबीनें बोलूं लागला. ती गोष्ट पृथ्वीराजाला अस-

आजपर्यंत कित्येक इतिहासकारांनीं ग्रीस देशाच्या महत्वपूर्ण इतिहासांतील अघटित व आश्चर्यजनक गोष्टी जरी लिहून आकाशपाताळ एक केलें आहे, तरी विचारपूर्ण आणि शोधपूर्ण दृष्टीनें भारत-

---

हनीय होऊन, पृथ्वीराज राण्याला भर दरबारांत असें व्यंगोक्तीनें बोलला कीं, " पिताजी, जिन आपने पिता राणा कुंभाजीनें मालवाके बादशहाको छे महिनेतक कैदमे रखकर छोड दियाथा, उन्हीके पुत्र राणा रायमल बादशहाके सेवकसे इसतरह नम्रतासे बाते कर रहे है! " इतकें बोलून त्यानें आपल्या पित्याला बादशहाच्या सेवकाशीं भाषण करण्याची मनाई केली. त्यामुळें राणाजी रागावून त्याला बोलले " पृथ्वीराज, तूं बडे बादशहाको कैद करनेवाला होगा, पर मुझे तो राज्य बचाना है ! " हे ऐकून पृथ्वीराज संतापानें दरबारांतून निघून गेला व त्यानें आपलें सैन्य एकत्र करून माळव्यावर स्वारी केली आणि बादशहाला कैद करून आणून आपल्या पित्याच्या चरणांपुढें नम्रदासाप्रमाणें हजर केलें. नंतर त्यानें आपल्या पित्यास विचारलें कीं, " यह कौन है ? " याप्रमाणें आपल्या पित्याला प्रश्न करून त्या कैदी बादशहाला तेथून नेऊन आपल्या कैदखान्यांत एक महिनाभर ठेविलें आणि नंतर त्याला मोठ्या सन्मानानें आदरपूर्वक सोडून दिलें. त्यावेळीं भारतवर्ष आपल्या प्राचीन आदर्शांपासून जरी बरेंच अवनतींत उतरलेलें होतें, तरी रजपूत आपसांत झगडे करीत असतांही, भारतवर्ष सुवर्णयुगांत होतें असेंच म्हणावें लागतें.

वर्षांच्या इतिहासाचें संशोधन केलें, तर त्या ग्रीसच्या इतिहासापेक्षांही महत्त्वपूर्ण आणि आश्चर्यजनक अशा प्रसंगांनीं भारतवर्षाचा इतिहास ओथंबलेला आहे असेंच आढळून येईल. रोमला ब्रूटसाचा जरी किती अभिमान असला, तरी भारतमातेचें मुखकमल, राणा रायमलच्या अभिमानानें बरेंच उन्नत झालेलें आहे. ब्रूटसानें[1] न्यायरक्षणासाठीं जरी आपल्या पुत्राला देहदंड दिला, तरी न्याय आणि धर्म यांच्या रक्षणासाठीं, आपल्या पुत्राचा प्राणघात करणाऱ्याला रायमल यानें—सोन्याचीं कडीं आणि बरनोरचें राज्यही पारितोषिक म्हणून अर्पण केलीं. [2]इंग्लंडच्या एका राजकुमाराला इंग्लंडच्या मुख्य न्यायाधीशानें तुरुंगाची शिक्षा दिली

---

[1] रोममध्यें जेव्हां प्रजासत्ताक राज्यपद्धति स्थापन झाली तेव्हां कलोनियसचा भाचा आणि ब्रूटसचा मुलगा यानें प्रजासत्ताक राष्ट्राचा नाश करण्याचे प्रयत्न केले होते. कलोनियसनें आपल्या भाचाला योग्य शिक्षेपेक्षां बरीच कमी शिक्षा देण्याबद्दल जरी आग्रह धरला होता, तरी ब्रूटसनें आपल्या पुत्राला देहदंडाचीच शिक्षा फर्माविली.

[2] लीला नामक एका पठाणानें राव सुरतानचें राज्य संपूर्णपणें हस्तगत केलें होतें. सुरतानची मुलगी तारावती मोठी लावण्यवति आणि वीरांगना होती. तिनें आपल्या बापाचें राज्य सोडविण्याची मोठी कठोर प्रतिज्ञा केली. राणा रायमल याच्या जयमल पुत्रानें तारावतीचे गुण आणि रूप यांची प्रशंसा ऐकून तिच्याशीं विवाह करण्याचा बेत केला. राव सुरतान यानें जयमलच्या प्रस्तावाचा स्वीकार केला आणि म्हटलें “ प्रथम

होती, म्हणून इंग्लंचा इतिहास कंठरवानें इंग्लंच्या न्यायीपणाची जरी प्रशंसा करीत असला, तरी [1]राणा रायमल यानें आपल्या पुत्राचा वध करणाऱ्या संबंधानें आपलें हृदय दगडापेक्षांहीं कठोर न करतां, पुत्रघातक्यावर जी सहृदयतेनें दया प्रकट केली, त्याबद्दल इतिहासांत लेशमात्रही चर्चा झालेली आढळत नाहीं.

माझें राज्य मुसलमानांकडून मुक्त करा म्हणजे मग मी आपली मुलगी तुम्हांला तुमच्या मागणीप्रमाणें देईन ! " यावर जयमलनेंही राज्य सोडवण्याची प्रतिज्ञा केली; परंतु प्रथम तारेशीं लग्न लावून देण्याचा आग्रह धरल्यामुळें सुरतान यानें क्रुद्ध होऊन जयमलला ठार मारलें. त्यावेळीं जयमलच्या संग्रामसिंह भावाचा जरी कोठें पत्ता नव्हता, तरी दुसरा भाऊ पृथ्वीराज याला राज्यांतून हांकून दिलेला असल्यामुळें त्याचा जरी पत्ता होता, तरी फक्त एकटा जयमलच जवळ असतां आणि त्याचा सुरतान यानें घात केलेला असतांही आपल्या पुत्राचा घात करणाऱ्याचा रायमलनें सूड घेतला नाहीं. जयमलच्या मरणसमयीं त्यानें मोठ्या गंभीरपणानें म्हटलें कीं, " ज्यानें मुलीच्या बापाची इज्जत घेण्याचा प्रयत्न केला त्याच माझ्या पुत्राला सुरताननें जो प्राणदंड दिला तोच त्याच्या आपत्तींतही त्याला भूषणभूतच होता. "

[1]इंग्लंचा राजा पांचवा हेन्री याचा पुत्र मोठा उत्पाती होता. त्याच्या एका सोबत्याला गोसाहन नांवाच्या न्यायाधीशानें कांहीं अपराधावरून तुरुंगांत घातलें होतें. तें युवराजाला सहन न होऊन, त्यानें

राणा रायमल याच्या पश्चात् संग्रामसिंहानें राजदंडाचा स्वीकार केला. ' यथानामस्तथा गुणाः ' या न्यायाचाच तो अलौकिक पुरुष होऊन गेला. तो खराच संग्रामसिंह होता. त्यानें अनेक प्रसंगीं रणांगणांवर आपल्या अलौकिक शौर्याची ओळख पटवून, राजस्थानाला तोंडांत बोट घालायला लाविलें. त्याच्या कारकीर्दींत समस्त रजपूत सामन्त, एकाच विजयवैजयन्तीच्या पदकमलीं ऐक्यानें जमलेले असत. भारतवर्षातली ती विलक्षण वेळ होती. ' हथिनीसी लक्ष्मी विचल इत उत झोंका खाय ! ' या कव्युक्ती प्रमाणेंच दिल्लीच्या राजसिंहासनासाठीं मुसलमानांच्या कित्येक वंशांत झगडे झाले होते व होत होते. तवलघ, सय्यद, लोदी आणि इतर अनेक मुसलमानांनीं जरी झगडे केले तरी, — महाराज युधिष्ठिरापासून, [1]पृथ्वीराजापर्यंत दिल्लीचें तख्त अबाधितपणें,

---

न्यायाधीशाच्या तोंडांत मारली व त्यामुळें त्यालाही न्यायाधीशानें तुरुंगांत खेंचलें. ही गोष्ट राजाला समजल्यावर त्यानें न्यायाधीश आणि युवराज या दोघांचीही प्रशंसा केली. तोच युवराज जेव्हां आपल्या बापाच्या मागून सिंहासनाधीश झाला, तेव्हां त्यानें त्या न्यायाधीशासंबंधानें गैरमर्जी दाखवली नाहीं, तर उलट त्याची न्यायशीलताच ग्रहण केली.

[1]पृथ्वीराजासंबंधानें मागें सांगितल्याप्रमाणें आणखी जी एक मोठी बहारीची गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे ती येणें प्रमाणें :—पृथ्वीराज आणि त्याचा चुलता सुरजमल यांच्यांत जें युद्ध झालें त्याचा इतिहास ऐकून मन स्तंभित आणि चकित होतें. सुरजमल आणि पृथ्वीराज यांच्यांत

आर्यक्षत्रियांच्याच हातीं होतें. त्यावेळपर्यंत रजपुतांनीं राष्ट्रविप्लवाची साथ न करतां, मुसलमानी बादशाहाचें स्वामित्व स्वीकारलें नव्हतें. त्या वेळेपर्यंत स्वार्थी द्रव्याशेच्या लालसेनें रजपूत लोकांनीं आपल्या प्राणप्रिय

ओव्ह। चितोडच्या गादीबद्दल युद्ध झालें, त्यावेळीं दोवांनीं सर्व दिवसभर घुमुल युद्ध करून रक्ताचे पाट वाहवले. रात्र पडल्यावर युद्ध तहकूब करून पृथ्वीराज आपल्या चुलत्याच्या भेटीस गेला. त्यावेळीं त्या चुलत्या-पुतण्यांत जो भाषणचमत्कार झाला तो कोणच्याहि देशाच्या इतिहासांत सांपडणें शक्य नाहीं. पृथ्वीराज आपल्या चुलत्याला म्हणाला, " काकाजी, अब आपके घाव कैसे है ? " त्यावेळीं सुरजमल जखमा बांधीत होता. तो म्हणाला, " बेटा, तुमको देखकर मुझे बडी खुशी हुई, इसलिये घाव भुल गये ! " त्यानंतर ते दोघे एकत्र जेवले व जातांनां चुलत्यानें दिलेला विडा पृथ्वीराजानें खुशाल खाल्ला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं पृथ्वीराजानें आपल्या चुलत्याला युद्धार्थ आव्हान करून, त्याच दिवशीं युद्ध समाप्त करण्याची प्रतिज्ञा केली. युद्ध घनघोर झालें व आदल्या दिवसाप्रमाणेंच पुन्हां पुतण्यानें चुलत्याची गांठ घेतली; जणूं काय त्या दोघांत युद्ध झालेंच नाहीं. कर्नल टॉड म्हणतो " It will shew- the manners and customs so perteculiar to the Rajaputs, to descride the meeting between the rival uncle and nephew--unique in the details of strife, perhaps, since the origin of man.

प्रियवाचकहो, या भारतवर्षाचें भाग्य कोणत्या कारणानें फुटलें गेलें आहे तें आपण जाणतां का ? या देशांत अनेक वीररत्नें असतांही, आमच्या भरतमातेच्या पायांत पारतंत्र्याची शृंखला कशी पडली ? या देशाच्या अनेक कुलकलंक आणि देशद्रोही लेंकरांनींच ती विधि आपल्या मातेच्या पायांत, स्वार्थाला बळी पडून, परकीयांकडून घालवली ना ? ज्यावेळीं राणा सांग बाबराशीं युद्ध देण्याकरितां पुढें सरसावला, त्यावेळीं बाबरानें संधी करण्याचा उपक्रम सुरू केला. राणा सांगजीच्या मार्फत, रायसेनेचा राजा सलहदी तोंवर—हा बाबराशीं बोलणें करण्यास गेला. या विश्वासघातकी देशद्रोह्यानें, बाबराकडून लांचलुचपत खाऊन, सैन्यांत फितूर केला आणि त्यामुळें राणा सांगजीचा त्या वेळीं पराजय झाला. हे कुलकलंकी नराधमा सलहदी तोंवरा, तुझ्यासारखा गळेकापू जर या वेळीं या भारतमातेच्या उदरीं जन्माला आला नसता, तर या देशाचा इतिहास पार बदलला! गेला असता पण विधिलेख कोण बदलूं शकणार ? या युद्धानंतर थोड्याच दिवसांनीं महाराणा संग्रामसिंह ऊर्फ राणा सांगजी स्वर्गवासी झाल्यामुळें, मेवाडच्याच नव्हे, तर सर्व रजपुत वीरांच्या आशा मातींत गाडल्या गेल्या व रजपुताना अनाथ झाला.

संग्रामसिंहाच्या मृत्यूनंतर मेवाडच्या राज्यांत बरीच उलटापालट झाली. त्याबद्दल ऊहापोह करण्याचें जरी हें स्थळ नसलें, तरी येथें इतकें

पहाडांत निघून गेला होता; परंतु या प्रतिज्ञेनंतर थोड्याच अवकाशांत त्याचा तेथेंच देहान्त झाला व त्यामुळेंच त्याची मनःकामना पुरी झाली नाहीं.

म्हणणे अथवा सांगणें प्राप्त आहे कीं, सांगाजीच्या पश्चात् त्याचे दोन मुलगे--रत्नसिंह आणि विक्रमादित्य--यांनीं आळीपाळीनें काहीं वर्षे राज्य केलें. रत्नसिंह वीरानें आपल्या वडिलार्जित राज्यांतली एक वीटभर जमीनही बाबराला अथवा मालवेशाला खाऊं दिली नाहीं; परंतु तो जसा शूर होता तसाच त्याच्या अंगीं क्रोध आणि वीराला अयोग्य असा उतावळेपणा असल्यामुळें, त्यानें अंतस्थ असा [1]बुंदीच्या राजाशीं आपसांत झगडा करून, बुंदीच्या राजाला ठार मारला व स्वतांही कापला गेला.

---

१ बुंदीचा राजा सुरजमल्ल याच्याशीं रत्नसिंहाचा तंटा होण्याचें कारण असें होतें कीं, श्रीनगरचा प्रधान राजा सारंगदेव याच्या दोन कन्यांपैकीं एक रत्नसिंहास दिलेली होती व दुसरी सुरजमल्लाला दिलेली होती आणि म्हणूनच त्या दोघांत प्रथम अत्यंत प्रेम वसत होतें; परंतु पुढें त्या प्रेमांत--स्त्रीविषयक प्रेमाविष कालवलें गेलें. असें सांगतात कीं, एके समयीं सुरजमल चितोडास आला असतां, त्याच्या निद्रावस्थेंत एका पुरविया सरदारानें त्याच्या कानांत पाणी टाकलें, त्या बरोबर तो चवताळून उठला व लगेच त्यानें त्या पुरवियाला तेथच्या तेथेंच आपल्या खांड्यानें कापून टाकला. पुरवियाचा मुलगा पूरणमल-त्यामुळें क्रोधायमान होऊन आपल्या पित्याला ठार करणाऱ्याचा सूड घेण्याची संधी बघूं लागला व त्यानें रत्नसिंहाचे कान सुरजमल्लाच्या विरुद्ध फुंकण्यास सुरवात केली. एके समयीं सुरजमल्ल आपल्या श्वशुरा-

वीरोचित अशा गुणांचा लवलेशहि विक्रमादित्याच्या अंगीं नव्हता. गुजराथच्या बादशहानें दुसऱ्यांदा जेव्हां चितोडचा विध्वंस केला,

---

लयीं गेला असतां, तेथे रत्नसिंहाची बायकोही गेलेली होती. तिच्या बरोबरच्या एका पालतूसिंह नांवाच्या इसमास तेथें तिच्या वहिणीच्या आज्ञेने तीरानें मारण्यांत आलें. त्यामुळें रत्नसिंहाच्या स्त्रीस मोठा चमत्कार वाटला. ती चितोडला परत आल्यावर तिनें ती गोष्ट आपल्या नवऱ्यास सांगितली. ती गोष्ट त्यानें आपल्या पूरणमल्ल नामक पुरविया सरदारास सांगितली. त्यानें रत्नसिंहाला असें सांगितलें कीं, आपल्या साडूची आपल्या कुटुंबावर वाईट नजर असल्याचा मला पक्का संशय आहे. झालें—उतावळा रत्नसिंह वीर बुंदीच्या राजाचा प्राण घेण्यासाठीं लगेच निघाला. तो बुंदीस जाऊन पोंचला व सुरजमल्लास शिकारीस चलण्याबद्दल त्यानें सांगितलें. दुसरे दिवशीं ते दोघे शिकार खेळण्यास गेले. त्या ठिकाणीं रत्नसिंह व त्याचे सांथीदार यांनीं सूरजमल्लावर एकदम हल्ला केला. त्यावेळीं सुरजमल्ल जरी मारला गेला, तरी त्यानें मरतां मरतां रत्नसिंह व त्याचे पांच सांथीदार ह्यांना कांपून काढलें. असें सांगतात कीं, सूरजमल्लाच्या एका नौकरानें जेव्हां त्याच्या मृत्यूची हकीकत त्याच्या मातेस कळवली, तेव्हां ती संतापाच्या भरांत असें मोठ्यानें ओरडून म्हणाली कीं, " काय ? माझा मुलगा एकटाच मारला गेला ? जो पुत्र माझें दूध प्यायला तो एकटाच कसा मारला जाईल ? " तिनें हे शब्द उच्चारतांच, तिच्या स्तनांतून दुधाची धार

त्यावेळीं रजपूत वीरवृंद भोगविलासी व भित्र्या राजाच्या स्वाधीन नव्हते. कारण विक्रमादित्य आपल्या वीरांचा परिपोष मुळींच करीत नसे. त्यांनां प्रसन्नतेंत ठेवण्याचें तर बाजूसच राहून उलट त्यानें त्यांच्याकडून त्याच्या दुर्दैवानें त्यांचें शत्रूत्व मात्र संपादन केलें होतें. त्यामुळें मेवाडच्या सरदारांत फाटाफूट झालेली होती. घरांतली फूट जगतांत मोठी हानीकारक होऊन वैऱ्यांनां त्याचा फायदा घेण्याची आयतीच संधि प्राप्त होते. हीच संधी गुजराथच्या मुसलमान बादशाहाला फायदेशीर झाली. त्या फुटीचा त्यानें चांगलाच फायदा घेतला. माळवा आणि गुजराथ येथील दोघां मुसलमान राजांनीं एकत्र होऊन, आपसांत मेवाडची वांटणी करून घेण्याचें ठरविलें; परंतु विक्रमादित्याचे लोक त्याच्यावर जरी अप्रसन्न होते, तरी त्यांनीं चितोडचें संरक्षण करण्यासाठीं आपल्या प्राणाहुती देण्यास मागें पाय घेतला नाहीं. हा चितोडचा दुसरा [1]शाका होय! याला जोहार असेंही म्हणतात.

अशा जोरानें बाहेर आली, कीं ती ज्या समोरच्या शिलेवर आपटली ती तत्काळ दुभंगली गेली. इतक्यांत त्या सुरजमल्लाच्या मातेला अशी बातमी समजली, कीं सूरजमल्लानें मरतां मरतां रत्नसिंहास त्याच्या पांच सांथीदारांसह ठार केलें व मग स्वतांचे प्राण सोडले.

१ **शाका** म्हणजे:—रजपूत लोक ज्यावेळीं निराश होऊन केसरी करून शत्रूशीं लढण्यास निघतात, त्यावेळीं त्यांच्या स्त्रिया अड-

या युद्धांत चितोडगड यवनांच्या हातीं गेला; परंतु तो त्यांच्या ताब्यांत फार काळ राहिला नाहीं. रजपूत वीरांनीं अल्पावधींतच त्याचा उद्धार केला. राणा विक्रमादित्याला गादीवरून काढून टाकून, बनवीराला त्यांनीं गादीवर बसविलें व उदयसिंह वयांत येईपर्यंतच फक्त त्यानें

केलेल्या अग्निकुंडांत स्वतःचें प्राणदान करतात. अशा प्रकारचा पाहिला शाका अल्लाउद्दीन खिलजीच्यावेळीं करण्यांत आला होता व दुसरा या वेळीं करण्यांत आला. या शाक्यांत बारा हजार रजपूत स्त्रियांनीं अग्नि-देवाला आपल्या देहाहुती देऊन धर्मरक्षण केलें होतें. या युद्धांत राज-माता जव्हेरीबाई (जवाहरबाई) नें मोठें शौर्य गाजविलें होतें. तिनें अंगांत चिलखत घालून हातीं सांग घेतली आणि ती प्रत्यक्ष समरांग-णावर जाऊन मुसलमानांशीं बेहद्द लढली. ती लढत असतां, रजपूत वीरांना एकसारखी उत्साहित करीत होती. ती लढत असतां तिच्यावर शत्रूपक्षाकडील तोफेचा गोळा येऊन पडला व त्यायोगें तिचा देहान्त झाला. हा शाका इ. सन १५३० मध्यें झाला. उदयसिंहाची माता कर्णवती हिनें जेव्हां पाहिलें कीं, युद्धांत जवाहिरबाई मारली गेली, तेव्हां तिनें असा विचार केला कीं, रजपूत ललनांना यवनांचा स्पर्श होऊं नये म्हणून अग्निकुंडांत देहार्पण करणेंच आतां इष्ट आहे. तिनें सर्व रजपूत स्त्रियांनां या विचारानें उत्साहित करून त्यांच्यासह स्वतां तिनें अग्नींत उडी घेतली. बुंदीच्या राजानें या युद्धांत चांगला पराक्रम केला होता, यांत संशय नाहीं.

गादीचा उपभोग घ्यावा असा त्याचेकडून करार करून घेतला. बनवीर हा पृथ्वीराजाचा दासीपुत्र होता. त्याची बुद्धी पुढें पालटली. आपणच अखेरपर्यंत चितोडच्या गादीचा उपभोग घ्यावा असें त्याला वाटूं लागलें. त्यानें प्रथम आपल्या इच्छेच्या वाटेंतले कांटे काढण्यास विक्रमादित्याच्या खूनापासून सुरवात केली. त्यानंतर, त्यानें बालराजा उदयसिंहासही ठार मारण्याची मसलत केली. बनवीराचा हा नीच उद्देश ओळखून, उदयसिंहाच्या पन्ना नामक दाईनें, आपला स्वामिपुत्र जो पुढें राजा व्हायचा, त्या उदयसिंहाच्या संरक्षणाचा निश्चय केला व त्याप्रमाणें तिनें मोठ्या चातुर्यानें, त्या चितोडच्या भावी राजाचा बचाव करण्याचा एक विलक्षण व खरा राजसेवेचा उपक्रम केला. पन्नादाईनें राजपुत्राचा बचाव करण्यासाठीं जी युक्ती योजिली, तिच्यामुळें तिचें नांव चितोडच्या इतिहासांतच नव्हे, भारतेतिहासांतच नव्हे, तर अखिल भूमंडलाच्या इतिहासांत, सदैव सोनेरी अक्षरांनीं अधिष्ठित झालें आहे. आपला धनी जो राजपुत्र उदयसिंह, त्याच्या रक्षणासाठीं तिनें आपल्या आत्मिक बलाचा केवढा प्रताप दाखविला तो—वाचकहो, आपणांस माहीत आहे काय ? त्या अबलेनें सबला होऊन, आत्मोत्सर्गाचें केवढें तरी प्रज्वलित उदाहरण जगापुढें ठेवलेलें आहे ! तशा तऱ्हेचें उदाहरण उन्नतशील जातींच्या इतिहासांत फारच क्वचित आढळेल ! पन्नादाईनें राजपुत्र उदयसिंहास एका पाटींत झांकण घालून ठेविलें व त्यावर फुलेंतुळशी वगैरे ठेवून, एका बाईला ती पाटी नेमक्या ठिकाणीं नेऊन

ठेवण्यास सांगितलें व जेथें उदयसिंहाची निजण्याची जागा होती, तेथें तिनें आपल्या प्राणप्रिय पुत्रास निजवून ठेविलें. बनवीर जेव्हां त्या स्थळीं आला, तेव्हां तिनें आपल्या पुत्राकडे बोट दाखविलें. बनवीरानें पन्नादाईच्या पुत्रालाच उदयसिंह समजून ठार मारलें व अशा तऱ्हेनें राजसेवेंत तिचा कुलदीपक पुत्र तिच्या दृष्टीआड अक्षयीचा झाला. तिचा मुलगा जरी मारला गेला होता व उदयसिंहाला जरी सुरक्षित स्थितींत तिनें ठेवविलें होतें, तरी जाणून बुजून तिनें ' उदयसिंह मारला गेला ' म्हणून उच्च स्वरानें टाहो फोडण्यास प्रारंभ केला. अशा तऱ्हेनें पन्नाला शोक करतांना पाहून व उदयसिंह ठार झाल्याचें वृत्त ऐकून, राणीवशांत मोठा हाहाकार उडाला ! अशा तऱ्हेनें पन्नेनें उदयसिंह बाल–राजाचें रक्षण करून, आपल्या पोटच्या गोळ्याचा होत असलेला खून, स्वतांच्या डोळ्यांनीं मोठ्या धारिष्टानें पाहिला व राजनिष्ठेच्या मंदिरावर अक्षयीचा–शुभ्र–विमलध्वज फडकत ठेवला. पन्ने, जा ! तूं जरी कालवश झाली आहेस, तरी तुझी कीर्ति अनन्त कालोदरांत कधींही गडप होणारी नाहीं ! तुझ्या यशाची विमलध्वजा अक्षय फडकत राहील. तुझी कीर्ति माला कोण जपणार नाहीं ? तुझ्यासारख्या पवित्र व उन्नत हृदयाचीयांकरतांच एका कवीनें म्हटलें आहे:—

" दुजे के हित प्राण दै, करै धर्म प्रतिपाल ।
को ऐसो शिवि के बिना, दुजो है या काल ॥

वाचकहो, बोला आतां ! चितोडगडाला व मेवाडभूमीला तुम्ही खरें तीर्थस्थान म्हणाल कीं नाहीं ? यांपेक्षां अधिक पवित्रभूमी कोणची

बरें आपण दाखवूं शकाल ? जेथें धर्म आणि देश यांसाठीं आत्मत्यागाचीं असलीं उज्वल उदाहरणें सांपडतील, अशीच हीं स्थलें आहेत ना ? ज्या ठिकाणीं पन्नेसारखी उन्नत हृदया दाई जन्म घेते, ती भूमी खरोखरच धन्य होय ! पांच हजार वर्षांपासून जी आर्यजाति आजपर्यंत अनेक विपत्तीशी टकरा देऊन जिवंत राहिली आहे, ती केवळ पन्नादाईसारख्या आर्यस्त्रियांच्याचमुळें होय !

पन्नानें उदयसिंहाच्या रक्षणासाठीं अनेक जागांच्या आलटापालटी केल्या व आश्रय मागितला; परंतु तिला कोठेंच आश्रय मिळाला नाहीं. बनवीरच्या भीतीनें उदयसिंहाला आश्रय देण्यास कोणीच धजेना. बनवीरशीं दुश्मनगिरी करून, आपल्यावर प्राणसंकट कोण ओढवून घेणार ? पन्ना आश्रयासाठीं अनेक रजवाड्यांकडे भटकत गेली व शेवटीं कमलमीरमध्यें जाऊन पोंचली. तेथे जैनधर्मी जो कुम्भमेर दुर्गाधिपति आशास म्हणून होता, त्याच्यापाशीं तिनें आश्रयाची भिक्षा मागितली. आशासानें आपल्या मातेच्या आज्ञेनें उदयसिंहास आपल्या घरीं आश्रय दिला व त्याला आपला भाचा म्हणवून त्याचा प्रतिपाळ केला.

रत्नाची जपणूक गोधडी जशी करूं शकत नाहीं, तद्वत वस्त्रानें विस्तवाचें रक्षण होत नाहीं. विस्तवाची एकच ठिणगी कापसाच्या पर्वतप्राय ढिगांत जशी लपली जात नाहीं, तर ती आगीचा डोंब घेऊन उठते तद्वतच उदयसिंहाचें झालें. हलकें हलकें त्याचें प्रकटीकरण होऊं लागलें. संग्रामसिंहाचा वंशधर उदयसिंह सुरक्षित आहे, अशी बातमी लागतांच

राणा सांग यांचा पुत्र उदयसिंह हा मेवाडच्या सिंहासनावर बसण्यास नालायख होता! उदयसिंहाचा पुत्र प्रतापसिंह हा असा निपजला कीं, ज्याला आज मेवाडचा अढळ ताराच समजतात. हें विधिलेखन वर सांगितल्याप्रमाणें उलटें नव्हें तर कसें ?

महाराणा प्रतापसिंह असें म्हणत असे कीं, “मी आणि माझे आजोबा राणा सांग, यांच्या मध्यें जर दुसरा कोणी गादीवर आला नसता, तर मेवाडची अशी अधोगती कधींच झाली नसती. मेवाडच्या चितोडगडावर विदेशीयांचा ध्वज कधींच फडकत राहिला नसता!” खरें पाहिलें असतां महाराणा प्रतापसिंहाचे हे शद्ब अगदीं शद्बशः खरे आहेत!

उदयसिंह आपल्या वयाच्या बाराव्या वर्षी मेवाडच्या गादीवर बसला. कमलगीर मुक्कामीं ज्या सरदारांनीं उदयसिंहास राज–टिळक लावला, त्या सरदारांत मुख्य–भालोरचा सरदार शोणिगुरु हा होता. शोणिगुरुचा वंश आपलें वीरव्रत पालन करण्यांत सदैव तत्पर असे हें प्रसिद्धच आहे. त्यानें आपल्या मुलीचा उदयसिंहाबरोबर विवाह करण्याचा प्रस्ताव सुरू केला. सर्व सरदारांनीं त्याच्या त्या सूचनेला एकमतानें अनुमती दिली. त्याप्रमाणें योग्य आणि शुभमुहूर्त पाहून कमलगीरमध्यें उदयसिंहाचा विवाह शोणिगुरूच्या मुलीबरोबर साजरा करण्यांत आला. पुढें त्या शोणिवंशीय मुलीच्या पोटीं पुत्ररत्न झालें. त्यावेळीं हें कोणाला माहीत होतें कीं, तेंच पुत्ररत्न महाराणा प्रतापसिंह या नांवानें मेवाडची नव्हे, तर अखिल रजपुतांच्या नांवाला लागलेली काळोखी साफ धुऊन काढील! याचें नांव विधिघटना!

शुक्ल पक्षाच्या द्वितीयेप्रमाणें बालक प्रतापसिंहाची कान्ती उत्तरोत्तर वर्धमान होत जाऊन, त्याचें तेज फांकूं लागलें. महाराणा उदयसिंहास जरी एकंदर चोवीस पुत्र होते, तरी प्रतापसिंह आणि त्याचा धाकटा भाऊ शक्तसिंह ह्या दोघांचेंच आपसांत मोठें सख्य होतें व तेच दोघे आपसांत खेळत असत; परंतु पुढें त्या दोघांच्या प्रेमांतही कमीपणा येत चालला. वादविवादानें विद्वेषपणाचा फैलाव होत जाऊन, त्याचा परिणाम फारच भयंकर झाला. त्या दोघांमधला विद्वेषाग्नि इतका वाढला कीं, मेवाडचें स्वातंत्र्य त्यांत जळून खाक होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. प्रायः बालपणीं जे संस्कार मनावर झालेले असतात, ते मोठेपणांत नाहींसे होत नाहींत. कौरवपांडवांमध्यें बालपणापासूनच जो वैरभाव उत्पन्न झाला होता, त्याची अखेर त्यांच्यातील महान् रणसंग्रामांत झाल्याचें सर्वप्रसिद्ध आहे. भीम आणि दुर्योधन यांच्यामधील बालपणापासून प्रज्वलित होत गेलेल्या द्वेषाग्नीनें कुरुक्षेत्रावर केवढा कहर केला, तें सर्वांनीं वाचलेलेंच आहे. कर्ण व अर्जुन यांच्या मधील लहानपणापासूनची चुरस—महान् समराग्नींत तेलधारा ओतल्याप्रमाणेंच शेवटीं निष्पन्न झाल्याचें कोणाला माहीत नाहीं ? अशा तऱ्हेच्या द्वेषाग्नीची ज्वाला प्रताप व शक्त यांच्यामध्यें पेटूं लागली. त्यांचीं हृदयें परस्परांसंबंधीं एकसारखी जळूं लागलीं. ती हकीअनेक नरमुंडें कापायचीं, ती तलवार यःकश्चित दोरखंडावर चालविणें शक्तसिंहाला न आवडून त्यानें तिची परीक्षा करण्यासाठीं आपल्या

कत योग्य स्थळीं येईलच. त्यावेळचें भारतवर्ष आजच्या भारतवर्षा-पेक्षां फार निराळ्या स्थितींत होतें. सद्यःकालाप्रमाणें त्याकालीं भारतवर्षातील क्षत्रियत्व नष्ट झालेलें नव्हतें. सुऱ्या, चाकू, काऱ्या वगैरेनां भिणाऱ्या सध्यांच्या लोकांप्रमाणें, तत्कालीन प्रजा नव्हती. त्यावेळचा कर्मयोग सद्यःकालीन कर्मयोगाप्रमाणें म्हणजे प्रेक्षकांसमोर वक्तृत्वाची बावदुकी करणारा, किंवा वृत्तपत्रांतून लेखणी–बहाद्दरी करणारा नव्हता एखादी समिति, एखादी सभा अथवा एखादी संस्था स्थापन करण्यानें, तेव्हांच्या कर्मयोगाची परिसमाप्ति होणारी नव्हती. तेव्हांच्या कर्मयोगाची क्रियाशीलता फार निराळी व खऱ्या कर्मयोगाची होती. घसा फोडफोडून अथवा लेखण्या झिजझिजवून ज्याची समाप्ती होईल असा तेव्हांचा कर्मयोग नव्हता. खऱ्या कर्मयोगाचें रहस्य तेव्हांच्या वीरांत पूर्णपणें खेळत होतें. त्यांवेळच्या कर्मयोगी वीरांचा खेळ परसत्ताताडनाच्या तलवारींत होता. बालक प्रताप व शक्त हे तलवारींनींच खेळ खेळत असत. त्यावेळच्या एका साधारण इतिहाससंबंधानेंच जरी येथें लिहायचें आहे, तरी तो सद्यःकालीं असाधारण वाटल्यावांचून राहणार नाहीं! तो ऐकतांना अंगावर शहारून कांटा उभा राहील अशी सध्यांची वेळ आहे. तो इतिहास असा आहे कीं, एकदां एक नवी तलवार एकानें बनवून आणली होती. उदयसिंहानें एक मोठा दोरखंडा मागवून तिच्या धारेची परीक्षा करण्यास सांगितलें, ती दोरखंडावर चालवणें शक्तसिंहाला आवडलें नाहीं. ज्या तरवारीनें रणांगणावर

ओटावरच तिचा वार केला व त्या बरोबर त्याच्या ओटांतून रक्तप्रवाह सुरू झाला. तरी पण त्या बालकाच्या चेहेऱ्यावर लेशमात्रहि शोकोत्पत्ति न होतां, उलट तो मोठ्या हर्षभरानें त्या रुधिरप्रवाहाकडे पाहूं लागला. ती जखम जरी बरीच तीव्र होती, तरी त्याच्या नेत्रांतून एकहि अश्रुबिंदु टपकला नाहीं. तेथल्या सर्वलोकांनां तो प्रकार पाहून मोठें आश्चर्य वाटलें व ते जागच्याजागीं अगदीं स्तंभित होऊन शक्ताकडे पाहूं लागले. पांच वर्षांच्या बालकाचें केवढें हें साहस! तें त्या बालकाचें दारुण साहस पाहून उदयसिंहाला कौतुक न वाटतां भयंकर राग आला. त्यानें क्रोधाविष्ट होऊन एकदम असें फर्माविलें कीं, "आत्तांच्या आत्तां या कुलकलंकी कारट्याला धडावेगळा करून टाका!" भोंवतालच्या मंडळींनीं उदयसिंहाची कशी तरी समजूत घालून, त्याचा क्रोधाग्नि जरी शांत केला, तरी उदयसिंहाची भविष्यवाणी खरी ठरली. प्रतापसिंह जसा मेवाडचा व त्याबरोबरच भारतवर्षाचा मुखोज्वलकारी निघाला तसाच शक्तसिंह त्याच्या उलट—कुलकलंकी, देशद्रोही व जातिद्रोही असा पुढें निपजला. कांहीं इतिहासकार तर असें लिहितात कीं, त्याच्या जन्मपत्रिकेवरून ज्योतिष्यांनीं पूर्वीच असें भाकीत करून ठेविलें होतें कीं, तो मेवाडचा कलंकस्वरूपी निपजेल. याचमुळें उदयसिंह त्याच्याबद्दल नेहमी उदास व विरक्त राहिलेला असे. याचमुळें त्यानें त्यावेळीं शक्तसिंहाची गर्दन छाटून टाकण्याची आज्ञा दिली होती. कांहीं असलें तरी निदान शक्तसिंहाचा जीव बचावला गेला हें खरें.

प्रताप व शक्त ज्या काळीं आमोदप्रमोदांत आपलें आयुष्य घालवीत होते, अशा त्या वेळीं, मेवाडची स्थिति कशी काय होती तें आतां पाहूं. त्या वेळीं बाप्पा रावळाच्या गादीवर उदयसिंह विराजमान झालेला होता, परंतु मेवाडचा राणा होण्याची त्याच्या अंगीं लवमात्रहि पात्रता नव्हती. त्यानें आपल्या वीरधर्माला फांटा दिलेला होता. तो एका वेश्येच्या प्रेमपाशांत पुरा गुंतला जाऊन, परम्परागत वीर मर्यादेवर त्यानें लत्ताप्रहार केला होता. त्याला त्याच्या राज्याचीहि शुद्ध राहिली नव्हती.

इतिहासवाचकांना ही गोष्ट माहीत आहेच कीं, राणा सांग याच्या मृत्यूनंतर थोड्याच दिवसांनीं, त्याचा प्रतिद्वंद्वी बाबर हाहि हा लोक सोडून परलोकीं गेला. बाबरच्या मागून तख्तनशीन झालेल्या हुमायूंला, शेरशहामुळें आपली सल्तनत कांहीं काळ सोडावी लागली होती. हुमायूंनें अनेक संकटांस तोंड देऊन व अनेक खटपटी करून, आपल्या हातचें गेलेलें राज्य परत मिळविलें होतें. तशा त्या वेळीं, राणा सांगाप्रमाणें जर कोणी चतुर पुरुष मेवाडच्या गादीवर असता तर अखिल भारतवर्षावर त्यानें आपलें साम्राज्य प्रस्थापित केलें असतें, असा तो काळ होता; पण दुर्दैवानें तसा दूरदृष्टी पुरुष मेवाडच्या गादीवर नव्हता आणि त्यामुळेंच मोंगलांचा उन्नतीचा मार्ग परिष्कृत झालेला होता. हुमायूंच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा अकबर हा तख्तनशीन झाला. अकबर आणि उदयसिंह याची जर तुलना करायची झाली, तर असें म्हणावें लागेल कीं, त्या दोघांत बऱ्याच अंशीं साम्य नव्हतें. अकबरानेंहि

बालपणांत उदयसिंहाप्रमाणें अनेक संकटांशीं झगडा केलेला होता. तो अनेक गोष्टींत फसला गेला होता; परंतु संकटें आणि फसगती यांनीं त्याचें हृदय मजबूत झालेलें होतें. अनेक आपत्ति आणि क्लेश यांनीं त्याच्यांत धैर्य व सहिष्णुता हीं उत्पन्न केलीं होतीं. याच्या उलट उदयसिंह विलासप्रिय बनून, चैनींत कालक्रमणा करीत होता. यामुळें अकबर आपल्या बापाची राज्यमर्यादा वाढविणारा झाला व उदयसिंह मेवाडचें राज्य बुडविणारा निपजला.

हुमायूंवर जेव्हां प्रथम आपत्ति कोसळली, त्यावेळीं त्यानें मेवाडचा मल्लदेवराय याचा आश्रय मागितला होता. आश्रय देण्याच्या ऐवजीं मल्लदेवानें त्याला कैद करण्याचाच प्रयत्न केला. त्याचें कारण असें सांगतात कीं, मोंगलांशीं झालेल्या एका युद्धांत मल्लदेव याचा ज्येष्ठ पुत्र रामलाल हा मारला गेला होता. त्याचा सूड यावेळीं हुमायूंवर उगवण्याची मल्लदेवाला इच्छा झाली होती. त्यावेळीं हुमायूं त्याच्या हातीं सांपडला तर नाहींच पण तो झालेल्या आपल्या अपमानालाहि विसरला नाहीं. हुमायूंनें आपलें राज्य परत कमाविल्यावर थोड्याच दिवसांत त्यानें इहलोकची यात्रा संपविल्यामुळें, त्याला स्वतांला जरी मल्लदेवावर सूड उगवतां आला नाहीं, तरी त्याचा मुलगा अकबर यानें सूड घेण्याचा निश्चय केला. त्याला त्याच्या मातेनेंहि मल्लदेवावर सूड उगविण्याच्या बाबतींत प्रोत्साहन देऊन तत्पर केलें. अकबर आपल्या बापाचा झालेला अपमान विसरणारा कुपुत्र नव्हता. तो ससैन्य मेवाड-

मुळें अकबर मेवाडवर चाल करून न जातां, तो जरी परत फिरला तरी तो गप्प न बसतां, त्यानें पांच वर्षेपर्यंत आस्ते आस्ते आपलें सैन्यबल बरेंच वाढवून नंतर पुन्हां तो मेवाडवर चालून गेला व त्यांत त्याला यशःप्राप्तीहि झाली. जोधपूर, बिकानेर वगैरे ठिकाणच्या राजांनीं अकबराचें वर्चस्व कबूल केलें; इतकेंच नव्हे तर जोधपूरचा राजा मल्लदेव यानें आपल्या जोधबाई[1] नामक कन्येकडून अकबराचें पाणिग्रहणहि करविलें. माळव्याच्या राजानें मेवाडचा आश्रय केला, या सबबीवर अकबर मेवाडच्या उदयसिंह राण्यावर चालून गेला. त्याची दृष्टी चितोडवरहि गेली.

चितोडची भूमी जशी वीरांची खाण आहे, तशीच ती प्रकृतिलीलांचेही निकेतन होती. चितोड हें एक प्राचीन नगर असून वनास नांवाच्या नदी किनाऱ्यावरील एका पहाडावर वसलेलें आहे. चीनच्या भिंतिपेक्षांहि जबरदस्त अशी भिंत त्याच्या चौफेर आहे. ती अत्यंत दुर्भेद्य आहे. अद्यापि चितोडची शोभा नष्ट झालेली नाहीं. शहराच्या भोंवतालचा तट प्रत्यक्ष पर्वतप्राय आहे. त्याच्या मुख्य दरवाजाचें नांव ' सुरमपोल ' अथवा ' सूर्यतोरण ' असें आहे. साळुंबऱ्याचा दुर्गेश्वर चन्द्रावस यांजकडे या द्वाररक्षणाचें काम होतें. अकबरानें प्रथम यावर हल्ला केला, पण त्यांत त्याला यश आलें नाहीं. कारण, उदयसिं-

---

१ याच जोधबाईच्या पोटीं अकबराच्या ज्येष्ठ सलीम नांवाच्या पुत्राचा जन्म झाला.

हाच्या प्रियतम भार्येपुढें त्याची डाळ शिजली नाहीं. त्या स्त्रीनें क्षत्रिय वीरांना बरोबर घेऊन, बादशहाच्या छावणीपर्यंतच नव्हे, तर प्रत्यक्ष बादशहाच्या तंबूपर्यंत कापाकापी करीत दौड केली होती. या विजयाचें श्रेय उदयसिंहानें आपल्या स्त्रीस दिल्यामुळें रजपूत वीर क्रोधाविष्ट होऊन त्यांनीं त्या स्त्रीसच मारून टाकलें. घरांत होणाऱ्या फुटीपासून आमच्या देशांत आजपर्यंत परकीयांनीं जे अनेक वेळां फायदे घेतलेले आहेत त्यांतलाच अकबरानेंहि तशाच तऱ्हेचा फायदा घेण्याचा सहज उपाय योजला. त्यानें रजपुतांच्या घरांतली आपसांतली फाटाफूट झालेली ऐकून, सन १५६८ मध्यें पुन्हां मेवाडवर चाल केली. त्यावेळीं त्यानें आपल्याबरोबर बरीच फौज आणिली होती. कांहीं इतिहासकारांचें असें म्हणणें आहे कीं, ही फौज इतकी मोठी होती कीं, तिची छावणी वीस वीस मैलपर्यंत पडत असे. राणा उदयसिंहानें या स्वारीच्या वेळीं फारच भित्रेपणा दाखविला. तो चितोडगड सोडून जरी पळून गेला, तरी इतर रजपूतवीर भ्यायले नाहींत. त्या विलासप्रिय महाराण्यासंबंधानें जरी त्यांची अप्रीति होती, तरी चितोडबद्दलची त्यांची भक्ति अखंड होती. त्यांनां चितोड त्यांच्या प्राणाप्रमाणें प्यारा होता. चितोडचा गौरव तोच आपला गौरव असें ते समजत असत. चितोडचा कीर्तिविस्तार तोच आपला असें प्रत्येक रजपूतवीर समजत असे. चितोडची अप्रतिष्ठा तीच आपली मानहानी असें रजपूत वीरांना वाटत असें. एकंदरींत काय कीं, महाराणा जरी पळून गेला, तरी

अनेक रजपूत एकत्रित होऊन, त्यांनीं ' एकलिंगकी जय ! बाप्पा रावळ की जय ! ! ' वगैरे तऱ्हेचे गगनभेदी जयघोष करीत गडाचें रक्षण करण्याचें काम चालविलें होतें. ' सूर्यतोरण ' दरवाजाचें रक्षण करायला अनेक वीर जमलेले होते. बदनूरचा जयमल राठोड आणि केलनाचे पत्ताजी (पूत किंवा पत्तूहि म्हणतात) हेही आलेले होते. जयमल राठोड हे मेवाडचे राव होते. वरचा तंटा मिटविण्यासाठीं उदयसिंहानें त्यांना तेथें आणिलें होतें. जयमलासंबंधानें अद्यापीहि अबालवृद्धांत मोठी प्रतिष्ठा आहे.

वास्तविक पाहिले असतां, मेवाडच्या वीरांनीं स्वातंत्र्य आणि चितोडचें संरक्षण यांसाठीं त्या प्रसंगीं आपल्या प्राणांची बाजीच लावली होती. त्या प्रसंगीं तेथील कोमलांगी अबलांनींहि अपूर्व पराक्रम करून, अकबराला ' दे माय धरणीं ठाय ' करून सोडलें होतें. त्यांचें अपूर्व साहस पाहून, अकबर चकित झाला. साळुंब्र्याचा राव ज्यावेळीं सूर्यतोरण दरवाज्यापाशीं मारला गेला, त्यावेळीं रजपूत सेनेचें नायकत्व केळव्याच्या पत्ताजीवर सोंपविण्यांत आलें. त्याचें वय ह्यावेळीं केवळ सोळा वर्षांचें होतें. त्याचे वडील याच्या आधींच्या युद्धांत मारले गेले होते. तो आपल्या मातापित्यांचा एकुलता एक पुत्र होता; पण ज्यावेळीं त्याच्यावर सेनापत्याचा अभिषेक करण्यांत आला, त्यावेळीं त्याची माता लवमात्रहि डगमगली नाहीं. त्यावेळीं रजपूतमाता—देश व धर्म यांसांठीं येणारे मरण—हें मोठें सौभाग्यकारक असतें असें मान-

णाऱ्या होत्या. भारतवर्षाची ती वेळ अशी होती कीं, रजपूत आपल्या पुत्रांना मोठ्या आनंदानें व उत्साहपूर्णतेनें युद्धस्थलीं जाण्यास निरोप देत असत व ते युद्धास जावयाला निघत. ' **बेटा जाओ ! जीते रहोगे तो स्वाधीनता भोगोगे और मरगये तो सीधे स्वर्ग को जाओगे** " अशा तऱ्हेचा आशीर्वाद त्यांना देत असत. मातांचे आपल्या पुत्रांनां असे उत्तेजनपर शब्द त्यावेळीं निघत असत. याच अन्वयें पत्ताजीची माता-स्वदेश व स्वधर्म यांचें रक्षण करण्यासाठीं तेथें जय्यत तयारी करून आलेली होती. तिनें आपल्या पुत्राला वीरधर्मरक्षणाची सहर्ष आज्ञा दिली. इतकेंच नव्हे, तर ती वीरपत्नि, आपली मुलगी व सून यांनां बरोबर घेऊन, अकबराशीं मुकाबला करण्यासाठीं युद्धक्षेत्रांत प्राप्त झाली होती, असें ऐकिवांत आहे. बादशाही फौज जेव्हां चितोडगडाजवळ येऊन पोंचली, त्यावेळीं या तिघी वीररमणींनीं आपल्या तिरंदाजीच्या अचुक निशाणबाजीनें यवनसेनेची अगदीं फेंफें उडवून दिली होती. त्या तिन्ही वीरांगनांच्या बहादुरीवर अकबर बादशाहा इतका प्रसन्न झाला होता कीं, जो कोणी त्यांनां पकडून आणील त्याला तो मागेल तें बक्षीस देण्यास सिद्ध झाला होता. त्या तिघी वीररमणी एका मागून एक अशा धारातीर्थी पतन पावून, आपली अक्षय कीर्ती, या भूमंडळावर ठेवून गेल्या. त्या तिघी वीरांगनांचें शौर्य पाहून चितोडचे वीर, दुप्पट उत्साहानें मुकाबला करूं लागले.

शत्रूच्या सेनासागरापुढें मूठभर रजपुतांचा किती वेळ टिकाव लागणार! अखेरीस प्रचण्ड व प्रज्वलित अग्नीप्रमाणें आपली तेजस्विता प्रगट करीत करीत एकेक वीर भूतलशायी होऊं लागला. सोळा वर्षांच्या अभिमन्यु बाळानें, भारती युद्धांत चक्रव्यूह भेदतांना आपलें अनुपम-तेज व वीर्य जसें प्रगट केलें होतें व शत्रूंचीं काळजें भेदून टाकलीं होतीं, तद्वतच या प्रसंगीं अभिमन्यूप्रमाणें पत्ताजीनें आपलें साहस आणि पराक्रम यांच्यामुळें मुसलमानी सेनेंतल्या मोठमोठ्या योद्ध्यांचीं हृदयें कंपायमान करून सोडलीं होतीं. मोठमोठे वृक्ष आपल्या शुंडा-बलानें उपटून, शेवटीं हत्ती जसा थकून जातो, तद्वत पत्ताजीनें आपल्या तलवारीनें शत्रूच्या बलवान वीरांचीं अनेक मस्तकें तोडून, अखेरीस भूपृष्ठावर आपणहि शयन केलें. तो जरी मारला गेला, तरी रजपूत वीरांनीं धीर सोडला नाहीं. " कार्यं वा साधयेम् शरीरं वा पातयेम् " कार्य साधण्यासाठीं, मृत्यूला पुढें करून, ते जोमानें लढूं लागले. जयमल राठोडानें, किल्याच्या रक्षणाचा भार, आपल्या शिरा-वर घेतला. या प्रसंगीं आमचा चरित्रनायक जो प्रतापसिंह, त्यानें जयमल राठोडाच्या हाताखालीं राहून अपूर्व साहस आणि शौर्य प्रगट केल्यामुळें, त्याच्या बापानें केलेल्या मूर्खपणाची गोष्ट रजपूत वीर साफ विसरून गेले, हें योग्यच झालें.

या युद्धाच्या प्रारंभापासून अखेरपर्यंतच्या हकीकतीचें जर बारीक दृष्टीनें निरीक्षण केलें, तर असें म्हणणें प्राप्त होतें कीं, चितोडच्या

भाग्यरवि अस्तंगत झाल्यामुळेंच असा हा अंधःकार पडला, नाहीं तर काय चितोडच्या पतनाचें नांवच घ्यायला नको होतें. वीर जयमलानेंहि पराक्रमाची मेरपर्यंत शर्थ करून, चितोडचा किल्ला संरक्षण करण्याची शिकस्त केली; पण जेथें नशीबानेंच उचल खाल्ली, तेथें विधात्याचा लेख पुसून टाकण्यास कोण समर्थ होणार ? युद्ध सुरू असतां, एके दिवशीं रात्रीं, जयमल मशालीच्या उजेडांत किल्याच्या एका बुरजाची डागडुजी करीत होता. त्यावेळीं त्या किल्याला अकबराच्या सैन्याचा फार तीक्ष्ण वेढा पडलेला होता. शत्रूसैन्यानें जयमलाला डागडुजी करीत असतांना पाहून, त्या भागावर असा जोराचा मारा केला कीं, जयमलाला तेथून परतावेंच लागलें. आतां आपली धडगत नाहीं व किल्याचें नाजुक स्थान शत्रूच्या नजरेंत आलें, असें पाहून, जयमलानें आशा सोडली आणि शिल्लक राहिलेल्या आठ हजार रजपूत वीरांस केसरी करण्याची आज्ञा देऊन, किल्याचा दरवाजा उघडण्यास सांगितलें. किल्याचा दरवाजा उघडल्याबरोबर केसरी केलेले रजपूत वीर, बादशाही सेनेवर तुटून पडले व अखेरीस वीरगतीला गेले. नऊ राण्या, पांच राजकुमारी, दोन बच्चे राजकुमार आणि बहु-

---

१ सरदारांच्या अनुमतीनें किंवा त्यांच्या आज्ञेवरून ते केसरी करून बाहेर पडण्याच्या आधींच प्रतापसिंह व त्याचे कांहीं लोक युद्धक्षेत्रांतून निघून उदयपुरला निघून गेले होते. उदयपुराला जर प्रतापसिंह निघून गेला नसता, तर राजस्थानचें कमल प्रफुल्लित होण्याच्या आधींच तें सुकून गेलें असतें.

तेक सरदारांच्या स्त्रियांनीं वीररजपुतांनीं केसरी केलेली पाहतांच, भडाग्नींत आपले देह विसर्जित करून भस्मीभूत केलें. हा चितोडगडावरील तिसरा ‘ शाका ’ अथवा ‘ जोहार ’ होय. ‘ जय हर ’ याचा जोहार हा अपभ्रंश होय.

हें युद्ध किती भयंकर स्वरूपाचें झालें, ह्याची हकीकत टॉडच्या इतिहासावरूनच फक्त समजून येते. युद्धांत कामास आलेल्या वीरांचीं यज्ञोपवीतें जेव्हां वजन केलीं, तेव्हां तीं साडेचौऱ्याहत्तर मण वजनांत भरलीं. कोणाकोणाचें अनुमान असें आहे कीं, त्यावेळचा मण चार शेरांचा होता. तरी पण काय झालें ? प्रत्येक जानवें एक तोळा वजनाचें जरी धरलें तरी पंचवीस हजार नरवीर, त्या युद्धांत कालाच्या भक्ष्यस्थानीं पडल्याचा आढावा निघतो ! त्या युद्धाचें सदैव स्मरण राहावें म्हणून, अकबराच्या आज्ञेनुसार ७४॥ हा आंकडा पत्रांच्या लिफाफ्यावर लिहिण्याची वहिवाट सुरू झाली. या अंकड्यांतून असा अर्थ सांकेतिक भाषेंत निघतो कीं, जो दुसऱ्या कोणाचें पत्र त्याच्या पश्चात् वाचील, त्याला चितोडचा विध्वंस करण्याचें पाप लागेल. भरतखंडांतील कांहीं भागांत अद्यापिहि सदर आकडे लिहिण्याची पद्धत वहिवाटींत आहे.

अकबराची फारादिवसांची इच्छा सफल झाली. चितोडगड त्याच्या हस्तगत झाला खरा, पण त्यावेळीं चितोडगडावर शिल्लकबाकी काय वरें राहिलें होतें ? चितोड नगरी स्मशानपुरी होऊन गेली होती. ती जनशून्य दिसत होती. अशा त्या स्मशानवत् जनशून्य नगरीचा

ताबा अकबराला प्राप्त झाला. चितोड स्मशानपुरी असो अथवा जन-शून्य असो, परंतु बादशहाची फार दिवसांची चितोडगड हस्तगत करण्याची लालसा पूर्ण झाली.

---

१ पंजाबचे प्रसिद्ध विद्वान डॉ. गोकुलचंद्र, एम. ए., पी. एच्. डी. यांनीं लिहिलेल्या " The Transformation of Shikhism. " नामक पुस्तकावरून असें समजतें कीं, चितोडदुर्ग जिंकण्याबद्दल अकबर इतका उत्सुक झालेला होता कीं, त्यानें आपल्या एका कर्मचारी सरहिंदच्या भगवानदास खत्रीला असें लिहिलें होतें कीं, सीख गुरू अंगद याजपाशीं जाऊन चितोगडाची मालकी प्राप्त होण्यासाठीं प्रार्थना करावी. तो विश्वासपात्र खत्री सीखगुरूकडे गेल्यावर ते त्याला म्हणाले " ज्योंही कुंएका चक्र अपने स्थानपर बैठ जाएगा त्योंही चितोडगड विजय हो जायगा. " खरें पाहिलें असतां सीख-गुरूला चितोडचा इतिहास ज्ञात नव्हता आणि म्हणूनच त्यांनीं वरील-प्रमाणें उद्गार काढले होते. अकबर हा एक बुद्धिमान व दूरदर्शी बादशहा होता यांत जरी संदेह नाहीं, तरी तो कतिपत मूढ विश्वासा-पासून बचावला होता असें नाहीं. तो जरी ख्रिश्चन लोकांच्या पाद्र्यांप्रमाणें आपल्या मस्तकावरणांत ११ ह चिन्ह धारण करून हिंडत नसे तरी यांत संदेह नाहीं कीं, तो आपत्तिप्रसंगीं साहाय्यतेसाठीं साधूंची मदत मागण्यास मागेंपुढें पाहांत नसे. पवित्र मंदिरांतून प्रसाद मिळविण्या-साठीं तो अनवाणी गेल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. ज्वालामुखीच्या

ज्या अकबर बादशहाच्या प्रशंसेचे इतिहासकारांनीं, पाताळापासून अस्मानापर्यंत पूल बांधले आहेत, त्याच अकबर बादशाहानें आपल्या पाषाणहृदयाच्या नृशंसस्वभावाची जगाला ओळख करून दिली आहे. त्यानें चितोड नगरींत अनेक अत्याचार व अनन्वित कृत्यें केलीं आहेत. नराधम पापी अल्लाउद्दीन खिलजी आणि माळव्याचा बादशाहा रावबहादुर यांच्या हातून जीं राजचिन्हें अवशिष्ट राहिलीं होतीं, त्या सर्वांचा अकबरानें विध्वंस करून टाकला. हिंदूंच्या देवळांचीं शिखरें व मूर्ति, त्यानें आपल्या लोकांकडून तुडविलीं व देवालयें जमीनदोस्त करविलीं. ज्या नगाऱ्यांचे ध्वनि, कित्येक कोसपर्यंत ऐकूं जाऊन, गिल्होर नरेशांचा महिमा प्रगट करीत होते व ज्यांचा ध्वनि मेवाडच्या शत्रूंचीं वक्षस्थळें भीतीनें थरथर कांपवीत होता, जो दीपवृक्ष आपल्या विमल प्रकाशानें भगवती चतुर्भुजा देवीच्या मंदिराची शोभा वाढवून, आपल्या प्रकाशानें चितोडच्या मोठमोठ्या राजद्वारांची शोभा प्रगट करीत

हिंदुपवित्र मन्दिरांतील देवता प्रसन्न करून घेण्यासाठीं त्यानें माघार घेतली नाहीं. असें होतें तरी, तो दर्गे किंवा फकीर, अवलिया यांची राजनीतींत किंमत ठेवीत असे असेंही आढळून येत नाहीं. स्वार्थ साधण्यासाठीं तो हवी तेथें श्रद्धा दाखवीत असे. तवारिख फरिसा पान ४९० वरून असें आढळून येतें कीं, निजामउद्दीन औलिया व मुईनुद्दीन चिश्ती यांच्या दर्ग्यांपर्यंत तो अनेक वेळां प्रसादप्राप्त्यर्थ अनवाणी गेलेला होता.

होता, अशा वस्तु त्यानें आपल्या नवीन अकबराबादनगरीला शोभवि-ण्यासाठीं नेल्या. इतकें जरी त्यानें केलें, तरी तो शेवटपर्यंत—जयमल व पत्ता या दोघांचे पराक्रम विसरला नाहीं. त्यानें दिल्लींत आपल्या राज-महालाच्या समोर—जयमल व पत्ता यांचे हत्तीवर चढलेले संगमरवरी पुतळे तयार करून मांडले होते. खऱ्या शूराची प्रशंसा कोण करीत नाहीं? खऱ्या शूरापुढें शत्रूलाही आपलें मस्तक नम्र करावेंसें वाटतें हें निसर्गतः योग्यच आहे.

वाचकहो, तुम्ही एथपर्यंत अकबराची कारवाई वाचलींत. आतां तुम्हांला उदयसिंहाची हकीकत कळविणें इष्ट आहे. अकबर चितोडगडाला वेढा देऊन बसला असतां, दोन्ही पक्षांतील योध्यांत रणचंडीचें लास्य चालू होतें. अशा वेळीं उदयसिंहानें पाहिलें कीं, युद्धसमाप्ती कधीं होईल कोणास ठाऊक? असा विचार मनांत आणून त्यानें चितोडगडावरून पोबारा केला आणि प्रथम तो राज्यधिपाल नांवाच्या जागीं रोहिल्यांच्या आश्रयास जाऊन राहिला व तेथून पुढें तो अरवली पर्वतांच्या दक्षिण श्रेणींत जाऊन तेथें त्यानें आपलें निवा-सस्थान केलें. त्यानें प्रथम तेथें एक सुंदर सरोवर आणि एक राजभवन अशीं निर्माण केलीं. त्या सरोवराचें नांव त्यानें उदयसागर असें ठेवून राजभवनाचें नांव नवचौकी असें ठेविलें. तो त्या जागीं वास्तव्य करीत होता; म्हणून ती जागा मेवाडची राजधानीची होऊन पुढें तिचे नांव उदयपूर असें पडलें.

ही उपर्युक्त घटना चितोड पडल्यानंतर जरी घडून आली व चितोड पडल्यानंतर चार वर्षे जरी उदयसिंह जिवंत होता, तरी तो राजवैभव, सन्मान व राज्यत्व या नात्यानें वागत असतांही—राजगौरव म्हणून जो कांहीं असतो, तो त्याचा मुळींच नव्हता. वीर केसरी प्रतापसिंह त्या उदयपुरीं न राहतां, कमलमीरांत राहात असे. प्रतापसिंह व उदयसिंह यांच्यांतलें पितापुत्राचेंहि प्रेम त्यावेळीं नष्ट झालेलें होतें. हें जग मोठ्या चमत्कारांनीं भरलेलें आहे असें म्हणतात, तें कांहीं खोटें नाहीं. इतिहासवाचनावरून असें दृष्टोत्पत्तीस येतें कीं, राजपित्यानें जरी आपल्या राजपुत्राकडे प्रेमदृष्टीनें पाहिलें नाहीं, तरी अखिल जगत त्याच्याकडे प्रेमादरानें पाहूं शकतें. हिरण्यकशिपूनें आपल्या प्रल्हाद पुत्राचे कसे कसे हाल केले ते सर्वांना माहीत आहेतच. अशा त्या प्रल्हादाच्या नांवावर सर्वजग अद्यापि लुब्ध आहे. उत्तानपाद राजानें तरी ध्रुवावर कधीं प्रेमदृष्टी वळविली होती ? पण अद्यापि जगांतले सर्व लोक त्याच्या नांवाचा जयघोष करीत असतांना दृष्टीस पडतात. महाराष्ट्रराज्यसंस्थापक पुण्यश्लोक श्रीशिवाजी महाराजांचीहि गोष्ट अशीच आहे. तेहि आपल्या बापाच्या अप्रीतींतलेच होते. अशा त्या नावडत्या पुत्रानेंच महाराष्ट्रांतील यावनी सत्ता उखडून टाकून, महाराष्ट्रराज्याचा भगवा झेंडा फडकावला व आपलें नांव अजरामर करून ठेवलें. हीच स्थिति महाराणा प्रतापसिंहाची झाली. जो आपल्या पित्याचा स्नेहभाजन नव्हता, तोच आज आपल्या प्रौढप्रतापानें नुसत्या

राजपुतान्याचाच नव्हे, तर अखिल भारतखंडाचा पूजनीस भूदेव होऊन बसला आहे. वाचकहो, सांगा तर–प्रतापसिंह अशा कोणच्या आपल्या अंगच्या अलौकिक गुणांनीं इतक्या उच्च पदाला पावला आहे तो ? ते अलौकिक गुण कोणचे होते, ते पाहायचे असतील, तर पुढचे त्याच्या इतिहासाचे परिच्छेद वाचा, म्हणजे ते तुम्हांला तेथें आढळतील. जो होऊन गेल्याला आज पांचचारशें वर्षे झालीं आहेत तो कसा पूजनीय झाला त्याचें चित्र तुम्हांला यापुढील भागांत वाचण्यास सांपडेल. भारतमातेच्या पोटीं अशीं अनेक वीररत्नें निर्माण झालेलीं आहेत, तरी–प्रतापसिंह, गुरुगोविंद आणि श्रीशिवाजीमहाराज यांचीं नांवें ऐकतांच आनंदानें हृदय नृत्य करूं लागतें, हें आपण जाणतां ना ?

परिच्छेद तिसरा.

राज्यप्राप्ति.

' हे कुंवर तुम को राज है,
सिर अचल छत्र फिराइ है ।'

—भारतेन्दु.

इ. सन १५७२ मध्यें गोलकुंडा नांवाच्या स्थानीं वयाच्या बेचाळीसाव्या वर्षी मेवाडेश्वर महाराणा उदयसिंह याचा अंत झाला. त्यावेळीं मेवाडची काय स्थिति होती त्याचें वर्णन मागें आलेंच आहे. खरें पाहिलें असतां, उदयसिंह या नांवातच दोष आढळतो. बादशाहा अकबराच्या कारकीर्दींत दोन उदयसिंह होऊन गेले; पण ते दोघेहि कुलकलंक होते. महाराणा उदयसिंहाच्या कारकीर्दींत मेवाडचें पतन झालें व मारवाडचा राजा उदयसिंह यानें अकबराचें दास्यत्व स्वीकारलें. त्यानें आपली बहीण त्याला देऊन, तो त्याचा शालक झाला व अशा तऱ्हेनें त्यानें आपल्या मस्तकावर, कुलकलंकत्वाचा टिळा लावून घेतला. मेवाडच्या महाराणा उदयसिंहानें मरतांना—रजपूतवंश-परंपरा, लोकाचार आणि शास्त्रनिषिद्धकार्यें—या गोष्टी केल्या. त्यानें—आपल्या पश्चात् आपल्या खऱ्या उत्तराधिकारी पुरुषाचा त्याग केला. त्यानें पुरातन सनातन धर्माधिकाराचा त्याग केला आणि आपल्या

अगदीं छोट्या प्रेमळ राणीचा कुमार जो जगमल त्याला आपल्या पश्चात् उत्तराधिकारी करून ठेविलें. उदयसिंहाला एकंदर चोवीस मुलगे होते. त्या चोवीसांत जगमल हा सर्वांत लहान असून, प्रतापसिंह हा सर्वांत प्रौढ होता. या न्यायानें मेवाडचा राजदंड वास्तविक प्रतापसिंहानेंच धरावयास पाहिजे होता; पण उदयसिंहानें मृत्युसमयीं त्याचा यत्किंचितहि विचार केला नाहीं. तो आपल्या अखेरच्या प्रेमाप्रिय राणीच्या प्रेमपाशांत बद्ध होऊन, त्यानें—कुलमर्यादा, विवेकबुद्धि, लोकाचार व शास्त्र या सर्वांचें विसर्जन करून, जगमल यालाच आपला उत्तराधिकारी बनवून, बाकीच्या आपल्या तेवीस पुत्रांत भाऊबंदकीचा झगडा उत्पन्न केला. इतर राजघराण्यांप्रमाणेंच मेवाडमध्येंसुद्धां अशीच रीति आहे कीं, राजा मृत झाला असतां, त्याच्या खऱ्या व सरळ वारसा, लाच त्याच्या गादीचा वारसा प्राप्त होतो. तेथें अशी अट आहे कीं-एकीकडे राजपरिवाराच्या लोकांनीं त्यांच्या पुरोहितासमवेत सुतक पाळावें; दुसरीकडे प्रजेनें आपापलीं घरें साफसूफ करून, त्यांना रंगसफेती करावी व गुढ्यातोरणें उभारावीं आणि तिसरीकडे राजाचा राज्याभिषेक होत असावा. एकंदरींत काय कीं, राजाच्या मृत्युनंतर, राजसिंहासन रिकामें न राहण्याचीच तेथेंहि, इतरत्र असलेली जी वहिवाट तीच कायम असल्यामुळें, उदयसिंहाची अंत्येष्टी—जगमल्लाला गादीवर बसविल्यावर सुरू झाली. “ मानवी प्राणी इच्छा करीत असतो एक व परमेश्वराची इच्छा असते निराळीच ! ” या न्यायानें जग-

मल्लाला काय माहीत कीं, त्याच्या प्रारब्धांत राजसिंहासनाचा उपभोग नव्हता. जयमल्ल गादीवर बसल्यावर आपला राजदंड धरीत असतां, स्मशान भूमींत कांहीं निराळाच प्रकार चालला होता.

उदयसिंह जरी आपल्या वंशपरंपरेला विसरला, त्यानें लोकाचार बाजूस ठेवून शास्त्राला जरी धाब्यावर बसविलें आणि स्वतांच्या इच्छेनुसार वागण्याची जरी इच्छा केली, तरी रजपूत सरदारांनीं वंशपरंपरेची रीति, लोकाचार आणि शास्त्र यांना अर्धचंद्र दिलेला नव्हता. शहाजहांचा खरा उत्तराधिकारी दारा असतां, त्याला व शिकों (सुजा) यांना ठार मारून, त्यांचा धाकटा भाऊ औरंगजेब गादीवर बसला असतां त्याच्या विरुद्ध एकाहि मुसलमान सरदारानें जसा ब्र काढला नाहीं, तशापैकीं रजपूत सरदार नव्हते. उदयसिंहाची कृति त्यांना पसंत पडली नाहीं. झालाराधिपति शोणिगुरु सरदार यांस उदयसिंहाची कृति अत्यंत कटुतर वाटली. आपला भाचा प्रताप यासच गादी प्राप्त झाली पाहिजे या विचारानें त्यांचें मन व्यग्र झालें. मेवाडचे प्रधान मंत्री चूडावत कृष्णसिंह यांस त्यांनीं असें विचारलें कीं, " गादीचा **खरा वारस थोरला मुलगा प्रतापसिंह हयांत असतां, सर्वांत धाकटा पुत्र जयमल्ल यास गादीवर बसविण्याच्या कारस्थानांत तुम्ही उदयसिंहाना आपली अनुमति कशी दिलींत! अशी खोटी सल्ला तुम्ही कां दिलीत! अशा तऱ्हेच्या अन्यायाला तुम्ही अनुमोदन देण्यास तयार**

कसे झालांत ? " झालाराधिपति शोणिगुरूच्या या प्रश्नांना त्यानें हंसत हंसत असें उत्तर दिलें कीं, "रोग्याच्या अंतकाळीं त्याला कुपथ्य करण्याची जरी इच्छा उत्पन्न झाली तरी, तिच्यापासून त्याला कोण परावृत्त करील ? अंतकाळीं रोग्यानें जरी दूध पिण्यास मागितलें; तरी तें त्याला देण्यांत हानी आहे ! " असें म्हणून तो प्रधान मंत्री थोडावेळ चूप बसला व पुन्हां म्हणाला " चितोडच्या राजसिंहासनावर बसण्यास मीं आपल्या भाचाचीच खरी निवड केली आहे; त्याच्या मस्तकाशिवाय इतर कोणाच्या मस्तकावर मेवाडचा राजमुगुट माझ्यानें कधींच बघवणार नाहीं. मी प्रतापसिंहाच्याच बाजूला खडा उभा राहीन. "

इकडे स्मशानांत अशा तऱ्हेचें भाषण होत असतांना तिकडे जगमल्लाचा राज्याभिषेक सुरू झाला होता. प्रतापसिंह आपल्या पित्याच्या व्यवहारानें दुःखी होऊन, घोड्यावर जीन कसून, मेवाड सोडून जाण्याच्या तयारींत होता. अशा स्थितींत मेवाडच्या सरदारांनीं त्याला त्याच्या इच्छेपासून परावृत्त केलें ग्वाल्हेरचा राज्यच्युत राजा कृष्णसिंह याच्यासह ते जगमल्ल याच्याकडे गेले. जगमल्लानें त्यांच्या मानाप्रमाणें त्यांचें स्वागत केलें; परंतु ते तेथें पोहोंचल्यावर त्यांनीं जगमल्लाचे दोन्ही हात दोन्हीकडून पकडून, त्याला सिंहासनावरून खालीं ओढून जमिनीवर बसविलें व " कुमार, आपने धोका खाया है. इस

गद्दी पर केवल प्रतापसिंहके अतिरिक्त और किसिको बैठने का अधिकार नहीं है ! " असें म्हणून, त्यांनीं प्रतापसिंहाच्या कमरेस तरवार बांधली. साळुम्ब्राच्या राजानें प्रतापसिंहाच्या देहावर राजवस्त्रें चढविली व नंतर त्याला राजसिंहासनावर बसविलें. हें सर्व झाल्यावर मेवाडच्या रूढीप्रमाणें, जमिनीपर्यंत वांकून त्याच्यापुढें त्रिवार प्रणाम केला. नंतर महाराणा प्रतापसिंहाच्या नांवानें चारी दिशांत भरून जाणारा जयशब्द होण्यास सुरवात झाली. हें सर्व कृत्य होत असतां, जगमल्ल जरी तेथें होता, तरी त्यानें हूं कीं चूं केलें नाहीं. ईश्वरी माया तरी कशी आहे पाहा कीं, थोड्या अवसरापूर्वी, ज्याच्या नशीबानें ज्याला मेवाडच्या राजसिंहासनावर बसण्याचा अवधी दिला होता, त्यालाच जमिनीवर बसण्यास लावून, जो निराशेनें आपल्या जन्मभूमीला अखेरचा प्रणाम करून देशत्याग करण्यास तयार झाला होता, त्याला क्षणार्धांत मेवाडचा सिंहासनाधीश केला. हेंच ध्यानीं आणून एका कवीनें म्हटलें आहे कीं, " **रीते भरे ढरकानें महर करैं तो फेर भरैं !** "

परिच्छेद चौथा.

अहेरियाचा उत्सव.

बन्धु यह मलिन वेष तजि डारो।
आलस बन्द तोड अब यां छन याको बेग उत्तारो॥ धृ० ॥
तम कारन न लखत अबहि लौं अब हैंगयो उजारो॥ धृ० ॥
किं कट फटो वस्त्र केवल पै हृदय न मलिन तुम्हारो॥
तासे तजि ऊपरि मलिनता यह कलंक को टारो।
बन्धु अब चूकन को समय रह्यो नहिं बैठे काह विचारो॥
"माधव" अवसर गये न मिलि हैं लाख जतन कर हारो।
बन्धु अब मलिन वेष तजि डारो॥ धृ० ॥

—पं. माधवशुक्ल.

वसन्त ऋतूच्या प्रारंभींच राणा प्रतापसिंहानें मेवाडचा राजमुकुट आपल्या मस्तकावर धारण केला. अहेरियाचा उत्सव समीपच आलेला होता. महाराणा प्रतापसिंहानें आज्ञा दिली कीं, सर्वांनीं जंगलांत शिकार खेळण्यासाठीं चलावें. भगवती गौरीपुढें बारा बळी देऊन आगामी भावी वर्षाचें फळ कसें काय आहे तें त्यानें पाहिलें व येणाऱ्या वर्षाचें फळ त्या दिवशीं निश्चित ठरविलें. सामन्त सरदारांनीं

महाराणाजीची आज्ञा शिरोधार्य समजून, आपले घोडे, हत्यारें वगैरे सज्ज केलीं व शिकार खेळण्यासाठीं त्या सर्वांनीं जंगलाची वाट सुधारली. महाराणाहि आपल्या सर्व सरदारांसह शिकारीसाठीं जंगलांत गेला. सर्व लोक आनन्दभरानें शिकार खेळूं लागले. मेवाडच्या भविष्यत् कालच्या स्थितीसंबंधानें सर्वांचीं मनें विचारमग्न झालेलीं होतीं. महाराणा त्यावेळीं आपल्या सर्व सरदार, मानकरी वगैरे लोकांना उत्साहित करीत होता. प्रतापसिंह आपल्या सरदारांनां मोठ्या गंभीर आणि उत्साहित शब्दांनीं असें म्हणाला कीं, “ सरदारगण, मेवाड के वीरो, स्मरण रक्खो की आज बाराह के शिकार पर ही मेवाड भाग्य की परीक्षा निर्भर है। मत समझो कि केवल शान्ति समय मे शोडशोपचारसहित वन घोर घन्टाध्वनि करके ही भगवती के साम्ने बाराह की बली देनेसे ही कार्य की सिद्धि होजायगी । माताके साम्ने बन सूअरो को बलि देने हो तो भले ही दो, लेकिन अच्छी तरह से याद रक्खो कि हमारा महाव्रत जो चितौड को स्वाधीन करनेका है वह केवल बन-बाराहों के बलिदान करने से नहीं हो सक्ता है। देखते नहीं हो कि समस्त राजपुताना मुगलोंसे ग्रस्त हो रहा है। मेवाड की राजपुताने की रजपुत जातिकी स्वाधीनता हरण हो गयी है। माता भगवती की परम पवित्र मूर्तिं यवनों

द्वारा पापाक्रान्त हुई है। भगवती चतुर्भुजाकी मूर्ति यवनों की ठोंकरों से टकराई गई है। इस महोत्सवके करने का प्रयोजन यही है कि हम सब राजपुताँने से मुगलों को खदेडने की, अपनी प्यारी जन्मभूमि चितौडके मुगलों के हाथ से उध्धार करने की अटल प्रतिज्ञा करे। जिस तऱ्हसे आज हम बन-बाराहोका शिकार करते हैं वैसे ही रजपूतजाती के शत्रुओं का शिकार करें।" अशा तऱ्हेचे महाराण्याच्या मुखारविंदांतून निघालेले उत्साहपूर्ण शब्द ऐकून सर्व लोकांनीं, "महाराणा प्रतापसिंह की जय। मेवाडाधिपति की जय। एकलिंगजी की जय" असा भयंकर जोराचा जयध्वनि केला. त्या जयघोषानें स्वर्गपृथ्वीमधील दशदिशा घुमून निनादित झाल्या. त्यानंतर सर्व लोक शिकारींत गुंग झाले. त्यांनीं अनेक रानडुकरें मारलीं. अशा तऱ्हेची उत्तम शिकार करून, सर्व लोक आनंद पावले व भविष्यत् कालीं फारच चांगल्या गोष्टी घडून येणार आहेत, अशा तऱ्हेचा त्या दिवसाचा शुभ शकून मानून, ती सर्व मंडळी शिकार खेळून परत आली.

परिच्छेद पाचवा.

रंगभंग!

सौहृदेन परित्यक्तं निःस्नेहं खलमुत्सृजेत् ।
सोदर्यः भ्रातरमपि किमुतान्यं पृथग्जनम् ॥

—सुभाषित.

प्रतापसिंह आणि शक्तसिंह हे दोघे भाऊ होते असें वाचकांनीं मागें वाचल्याचें त्यांच्या आठवणींत असेलच. बालपणीं त्या दोघांचें लालनपालन, खेळ, शिक्षण वगैरे सर्व गोष्टी एकत्रच झालेल्या होत्या. प्राय: बालकांत जें वैमनस्य उत्पन्न होतें तें त्यांच्या बालपणांतल्या खेळण्यापासूनच सुरू होतें. या गोष्टीला ते दोघे भाऊ अपवाद नव्हते. प्रताप व शक्त यांची गोष्ट तशीच झाली. आस्ते आस्ते त्या दोघां भावांत त्यांच्या वयोमानाप्रमाणेंच द्वेषवन्हीहि वाढत चालला होता. शेवटीं हे दोघे एकमेकांचे पूर्ण वैरी बनले.

अहेरियाच्या उत्सवप्रसंगीं, अनेक रजपूत वीरांनीं गहनारण्यांत प्रवेश करून, बरींच रानडुकरें मारलीं व अहेरियाचा उत्सव साजरा केला. देवीच्या पुढें त्यांनीं अनेक वराहांचें बलिदान केलें. येणारें वर्ष उत्तम जाणार अशा भावनेनें, सर्वांचें प्रेम प्रतापसिंहाकडे वळलें; पण हाय! त्या महोत्सवाच्या प्रसंगीं अशी एक दुर्घटना घडून आली कीं, जिच्या

योगानें सर्वांचे प्राण कासावीस होऊन, चितोडच्या शत्रूंना—प्रतापच्या वैऱ्यांनां—ती दुर्घटना एकप्रकारें साहाय्यकारकच झाली. ती घटना मेवाडच्या इतिहासहि पालटण्यास कांहीं अंशीं कारणीभूत झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं.

अहेरियाच्या उत्सवदिनीं ज्यावेळीं सर्व रजपूतवीरमंडळी चारी बाजूंनीं रानडुकरांची शिकार करण्यांत गुंतली होती, त्या प्रसंगीं कोण कशा कौशल्यानें शिकार करतो व कोण कोणावर मात करतो अशी त्यांच्यामध्यें चढाओढ लागली असतां, वर सांगितलेली दुर्घटना घडून झाली हें दुर्दैव होय.

त्याप्रसंगीं प्रताप आणि शक्त या दोघां भावांमधला, पूर्वीचा बालपणीं बीजारोपित झालेला द्वेष उद्भूत झाला. त्या दोघांत भयंकर विवाद सुरू झाला. विवादाचें कारण असें होतें कीं, सर्वांच्या मनांत एकमेकांवर श्रेष्ठत्व मिळवण्याची लालसा उत्पन्न होऊन, सर्वांतच शिकारीची स्पर्धा लागली होती. श्रेष्ठ कोण व कनिष्ठ कोण हा भेदभाव, त्या स्पर्धेत सर्वजण विसरून गेले होते. प्रताप व शक्त हे दोघे भाऊ इतरांबरोबरच शिकार खेळण्यास चालले होते. एक रानडुक्कर दोघांच्या दृष्टीस पडला. त्या दोघांनीं त्या वराहाचा पाठलाग सुरू केला. तो डुक्करही आपले प्राण वांचवण्यासाठीं मोठ्या वेगानें धावूं लागला; पण तो जाणार कोठें ? त्या दोघां वीरांच्या तडाख्यांतून तो वचावणें अशक्य होतें. त्या दोघां भावांनीं एकसमयावच्छेदेंकरून त्या वराहावर नेम धरून

बाण सोडले. एक तीर मस्तकावर झाला. त्या तीराच्या वेदना त्या धनडुकराला असह्नीय झाल्या व तो धाडकन् जमीनीवर पडला. त्या प्रखर शराचा मारा, त्या जंगली वराहावर फारच तीक्षणतेचा झाला होता, त्याच लक्ष्यवेधासंबंधानें त्या दोघां भावांत तर्कवितर्क सुरू झाले. ते दोघे आपसांत असें भांडण भांडूं लागले कीं, प्रत्येकजण म्हणे ' माझ्या तीरानेंच तो वराह माराला गेला. ' शेवटीं तो तंटा विकोपास गेला. त्यावेळीं प्रतापसिंह आपला घोडा चक्राकार फिरवीत होता. त्याच्या हातांत एक उत्तम पेषकब्ज चमकत होता. दोघां भावांच्या हृदयांत दबून राहिलेला द्वेषाग्नि, त्यावेळीं भडकून उठला व ते दोघे एकमेकांना आव्हान करून, द्वंद्व करण्यास सज्ज झाले. ते परस्परांना गर्जना करून म्हणूं लागले कीं, " **खबरदार, पीछे मत हटना आओ अभी हम तुम फैसला करें कि किसके तीर से वराह मारा गया है !** " याप्रमाणें ते दोघे भाऊ एकमेकांचा प्राण घ्यायला उठले. ही त्यांची स्थिति पाहून, इतर मंडळी चकित होऊन स्तंभित झाली. मांत्रिकानें भारलेल्या नागाप्रमाणें ती मंडळी जागच्याजागींच उभी राहून त्यां दोघां भावांकडे पाहूं लागली.

सर्वत्र भयंकर त्वेषाची छाया पसरली. ' **आतां त्या दोघां भावांचा तंटा कोणी मिटवावा ? अशांत महासागराप्रमाणें खवळलेल्या हृदयांच्या त्या दोघां भावांचीं हृदयें कोणी शांत करावींत? हाय रे दैवा ! केवढा हा मेवाडचा नाश उत्पन्न**

झाला !' अशा प्रकारचे विचार मनांत येऊन, भोंवतालच्या सर्व वीरांचीं वक्षस्थळें कंपायमान झालीं. सर्वजण तो झगडा मिटविण्यासाठीं आपापल्या इष्ट देवतेची मनापासून प्रार्थना करूं लागले; पण प्रताप आणि शक्त हे आपापल्या संकल्पापासून ढळले नाहींत. ते परस्परांचे प्राणघातकी बनले होते. ते अचल पर्वताप्रमाणें आपल्या ठाम विचारांवर उभे राहिले होते. सर्व सरदार मांत्रिकानें भारलेल्या सर्पांप्रमाणें जागच्याजागीं गुपचिप व तटस्थ झाले होते. अशा वेळीं भावी स्थितिबद्दलचा बरावाईट विचार करण्याचें, त्या दोघां भावांनीं सोडून, एक दुसऱ्याचा प्राण घेण्यास तयार झाला. अशावेळीं त्या दोघांचे प्राण रक्षण करण्यासाठीं पुढें कोण बरें सरसावला ? वाचकहो, अशा त्या बिकट प्रसंगीं जिला थोर लोक श्रेष्ठ समजतात अशा ब्राह्मण जातींतील अग्रेसर जो कुलपुरोहित तो पुढें सरसावला. दोघां भावांच्या वंव्यानें मेवाडचा सर्वनाश होणार आहे, ही कल्पना त्याच्या कोमल हृदयाला सहन झाली नाहीं. तो दोघां भावांच्या मध्यें जाऊन उभा राहिला व मोठ्यानें ओरडून बोलला:—
" अहो महाराणाजी, अहो राजकुमार शान्त व्हा ! शान्त व्हा अशा तऱ्हेचा आपसांत झगडा करण्यापासून कांहीं एक फायदा नाहीं." हें त्याचें बोलणें कुणीच ऐकलें नाहीं. मत्त हत्तीप्रमाणें ते दोघे भाऊ त्वेषानें एकमेकांवर भाले चालवूं लागते. अशा त्या भयंकर दृश्याला पाहून, त्या राजपुरोहित ब्राह्मणानें पुन्हां उच्च स्वरांत प्रतापसिंहाला संबोधून म्हटलें " **द्वैत ! जळो तें द्वैत !**

अरे बन्धूंनो, जरा धीर धरा! थोडा वेळ तरी थांबा! माझी थोडी तरी विनंति ऐका!" महाराणा प्रतापानें या म्हणण्याकडे लक्षहि दिलें नाहीं. आपल्या प्रार्थनेचा कांहींच उपयोग झाला नाहीं असें जेव्हां त्या कुलपुरोहितानें पाहिलें, तेव्हां त्यानें शक्तसिंहाला संबोधून म्हटलें "**अहो राजकुमार, जरा थांबा! तुमच्या सारख्या वीर पुरुषांनीं आपसांत लढणें उचित नाहीं. यांत तुमची शोभा काय आहे? मोठ्या भावाशीं झुंज खेळण्यांत कोणची बुद्धिमत्ता आहे?"** पण हें त्याचें भाषण कोण ऐकत होतें? ते एकमेकांवर चकचकीत भाल्यांचे आघात करीतच होते. कुलपुरोहितानें जेव्हां बघितलें कीं, त्याचें भाषण बहिऱ्या कानांवर पडलें, तेव्हां तो दोघां भावांच्या झुंजीमध्यें पांचरेसारखा घुसून जाऊन उभा राहिला. तो वेड्यासारखा मेघगर्जनेच्या आवाजानें ओरडून म्हणाला:- "**कांहीं हरकत नाहीं! तुम्ही दोघां भावांनीं जरी माझें म्हणणें ऐकलें नाहीं तरी मी स्वकर्तव्यमूढ होणार नाहीं. हे स्वर्गस्थ देवतांनो या दोघां भावांचें रक्षण करा! राजकुलाचें कुशल करा! बाप्पा रावळाच्या गादीच्या गौरवाचा भंग होऊं न देतां तिला वर्धमान करा! शिसोदेकुळाच्या मुगुटाची मानमर्यादा अबाधित ठेवा! त्याच्या जीवितरक्षणानेंच मेवाडचें संरक्षण होणार आहे. मोंगलांच्या हातून चितोडची सुटका होण्यासाठीं या दोघां भावां-**



राजवंशरक्षणार्थ कुलोपाध्यायानें खंजीर काढून आपल्या हृदयांत भोंसकून घेतला. [पृष्ठ संख्या—६३

तला तंटा मिटवा. भ्रातृविद्वेषाग्नीचा परिणाम शोचनीय स्थितींत होणार आहे हे द्वेषाग्ने, तुला जर साफ विझून जायचें नसेल, तुला जर रक्ताची तहान लागली असेल, तर मेवाडच्या राजकुमारांचें रक्त न पितां, या ब्राह्मणाचें रक्त पी." असें भाषण करून त्या कुलोपाध्यायानें आपल्या पोटांत अशा जोरानें खंजीर खुपसून घेतला कीं, त्यासरसा जो रक्ताचा फवारा जोरानें बाहेर उडाला, त्यानें त्या दोघां भाव.चे कपडे रंगपंचमीच्या रंगाप्रमाणें लालभडक करून सोडले.

"अरेरे ! हें काय ? या कुलपुरोहितानें आमच्या-साठीं आपल्या प्रियप्राणाचें विसर्जन केलें ना ?" असा विचार त्या दोघांच्या मनांत एकसमयावच्छेदेंकरून उद्भवल्यामुळें, ते दोघे जागच्याजागीं स्तंभित होऊन, त्यांनीं आपसांतलें द्वंद्व थांबविलें. दोघांनांहि आपली चूक समजली. दोघेहि स्थिर गंभिरावस्थेंत जाग-च्याजागीं तटस्थ झाले. दोघांच्याहि हृदयांत जो अशान्त महासागरा-प्रमाणें क्रोधाचा खळबळाट उत्पन्न झाला होता, तो शान्त झाला. दोघांनाहि आपल्या कृत्याचा पश्चात्ताप होऊं लागला, पण जें होऊन चुकलें तें परत कसें दुरुस्त होणार ! ब्राह्मणाला जिवंत करण्याचें सामर्थ्य त्या दोघांच्याहि हातीं नव्हतें.

प्रतापसिंहानें योग्य वेळीं त्या कुलभूषण कुलोपाध्यायाची यथा-योग्य रीतीनें अन्त्येष्टी करविली व त्याच्या वंशजांना यथेष्ट भूमिवृत्ति

वंशपरंपरागत लिहून दिली. त्या ब्राह्मणाचे वंशधर अद्यापि त्या भूमीचा उपभोग घेत आहेत व राजवृत्तीहि त्यांच्याकडे अद्यापि कायम आहे. प्रतापसिंहानें नंतर आपला सहोदर जो शक्तसिंह त्याला आपल्या राज्यांतून निघून जाण्याची आज्ञा दिली. शक्तसिंहानें आपल्या ज्येष्ठ भ्रात्याची आज्ञा शिरसावंद्य मानून, तो तत्काळ आपल्या जन्म-भूमीला प्रणाम करून चालता झाला खरा, पण त्याच्या हृदयस्थ क्रोधाची शांति झाली नाहीं. आपल्या अपमानाचा बदला घेण्याची त्याची वृत्ति वाढूं लागली. ज्येष्ठ भ्रात्याचा, आपल्या अपमानाबद्दल सूड उगविण्यासाठीं, रजपुतांचा सदैव वैरी जो अकबर बादशाहा, त्याचा त्यानें आश्रय केला.

परिच्छेद सहावा.

भीष्म प्रतिज्ञा आणि सर्वाहुति !

क्वचिद्भूमौ शय्या क्वचिदपि च पर्यंकशयनम् ।
क्वचिच्छाकाहारी क्वचिदपि च शाल्योदनरुचिः ॥
क्वचित्कंथाधारी क्वचिदपि विचित्राम्बरधरो ।
मनस्वीकार्यार्थी न गणयति न दुःखं न च सुखम् ॥

—सुभाषित.

प्रतापसिंह मेवाडच्या राजसिंहासनावर सुशोभित झाला. विशाल मेवाडचा तो स्वामी झाला. असंख्य नरनारींच्या सुखदुःखांचा भार त्याच्या मस्तकावर पडला. हें सर्व झालें खरें ! पण प्रतापसिंहाजवळ त्यावेळीं राज्याला योग्य अशा सामुग्रींचा सर्वस्वी पूर्ण आभाव होता ! त्यावेळीं धनबल व जनबल यांचा मेवाडांत दुष्काळ झालेला होता ! स्वर्गतुल्य मेवाडभूमी त्यावेळीं स्मशानवत् बनलेली होती. त्यासमयीं मेवाड जनशून्य झालेलें होतें. मेवाडची राजधानी चितोड मोंगलांच्या कब्जांत होती. मेवाडवर चहूंबाजूंनीं त्यावेळीं पारतंत्र्यांधःकाराचें पटल पसरलें गेलें होतें. रजपूत वीरांच्या हृदयांतील आशावन्हीची ज्योत विझली होती. निराशेच्या महासागरांत रजपूत लोक गटंगळ्या खात होते. मेवाडांतूनच नव्हे, तर राजपुतान्यांतल्या कोणच्याहि दिशेंतून प्रतापाला

मदत मिळण्याची आशा नव्हती. रजपूत वीर आपल्या स्वाभाविक शौर्याला विसरून जाऊन, मोंगल दरबारांतले थुंकझेले बंदिजन होऊन बसले होते. तेव्हां अशा वेळीं, चितोड कोणत्या स्थितींत असेल, त्याचें जें वर्णन चारण भाटांनीं त्याला ' विधवा स्त्री ' असें विशेषण देऊन केलें आहे त्यावरून वाचकांना समजून येईलच.

धनबल नाहीं व जनबलहि नाहीं ! अशा राज्याचा जरी प्रतापसिंह स्वामी झाला होता, तरी सर्वश्रेष्ठ असा जो हृदयबलाचा उत्साह, तो त्याच्यापाशीं कायम होता ! त्याच्या हृदयाप्रमाणें मेवाडची परिस्थिति नव्हती, हें सर्वांना माहीत होतें, तरी पण बालपणापासून प्रतापसिंहाच्या हृदयावर जे संस्कार घडले होते ते कधींच दूर झाले नाहींत. चारण भाटांच्या मुखांतून आपल्या पूर्वजांचा वृत्तांत ऐकून ऐकूनच, प्रतापसिंहाच्या हृदयांत, चितोडच्या उद्धाराचा उत्साह दुप्पट शोभानें वृद्धिंगत झालेला होता. अकबराच्या नीतिनिपुणतेमुळें, सर्व रजपुतांना आपली मानमर्यादा गुंडाळून ठेवून, पराधीनतेच्या बेड्यांनीं जखडबंद

---

१ खरें पाहिलें असतां, दुर्बल हृदयाला बलवान् बनवण्यासाठीं, महापुरुषांचीं जीवनचरित्रें व वृत्तान्त यांपेक्षां कोणचाही दुसरा उत्तम उपाय नाहीं. महाराज छत्रपति शिवाजी राजांचें हृदय जें स्वदेशभक्तीनें भरलें गेलें व न्यायी झाले, त्याला कारण महाभारत आणि रामायण यांतल्या कथाच होत, हें प्रसिद्धच आहे.

झाला होता. जे रजपूत कांहीं काळापूर्वी मेवाडच्या छत्राखालीं राहात होते, त्यांतले निम्यापेक्षां अधिक फुकटंफाकटेपणानें अकबराचे हांजी-हांजीखोर थुंकझेले बनले होते. जे रजपूत कांहीं कालापूर्वी चितोडच्या रक्षणाकरितां आपलें रक्त सांडण्यास तयार असत, तेच सध्यां, अकब-राच्या नीतिपरायणतेवर लुब्ध होऊन, चितोड व मेवाड यांच्या स्वातं-त्र्याला बरबाद करण्यासाठीं तयार झाले होते ! मेवाडाधिपतीच्या घामाचा थेंब जेथें पडेल, तेथें जे रजपूत एकेकाळीं आपल्या रुधिराचे सडे घाल-ण्यास सज्ज होते, तेच वीर त्या परम सौभाग्याला सोडून, आज अकब-राच्या नीतिपाशांत बद्ध होऊन, राणा प्रतापसिंहाचा प्राण हरण करण्यास अगदीं टपून बसले होते. मारवाडचा उदयसिंह अकबराचा गुलाम बनला होता. जयपुरचा मानसिंह अकबराचा सेनापती बनून, त्यानें आपलें हृदय त्याला विकलें होतें. बुंदीचा राजा जो महाराण्याचा परम मित्र होता व जो वेळोंवेळीं महाराण्याच्या उपयोगी पडत असे, तोहि यावेळीं अकबराच्या हातचें कळसूत्री बाहुलें बनला होता ! एकंदरींत सांगण्याचा सारांश इतकाच कीं, त्यावेळीं रजपुतांच्या हृदयांतून—स्वदे-शप्रेम व स्वबांधववात्सल्य हीं एकदम दूर झालीं होतीं. रजपूत रज-पुतांचा घात करण्यास टपून बसले होते. अशा या देशद्रोहाची सीमा इतकी वाढली होती कीं, प्रतापसिंहाचे भाऊ—सोंगरजी व शक्तसिंह

---

१ सागरजी हा प्रतापसिंहाचा सावत्र भाऊ होता. त्याचा सख्खा भाऊ जगमल याला सिरोहीचा राव सुलतान यानें ठार मारलें होतें. त्याचा

आपल्या भूमातेचें नातें विसरून, ते अकबराच्या पक्षास जाऊन मिळाले होते. इतक्या बिकट परिस्थितींतहि, प्रतापसिंह निराश व निरुत्साहि झाला नव्हता. रजपुतांची अशी दुर्दशा पाहून, जरी त्याला दुःख

बदला प्रतापसिंहानें घेतला नव्हता. याचें कारण असें होतें कीं, राणा-सुलतान त्याचा मेहुणा होता; यास्तव सागरजीचें मन बिघडून तो अकबरास जाऊन मिळाला होता. अकबरानें त्याला राणा पदवी देऊन चितोड दिलें होतें. कांहीं इतिहासकारांचें असें मत आहे कीं, ज्यावेळीं प्रतापसिंहाचा पुत्र अमरसिंह आणि जहांगीर यांचा संधी झाला, त्यावेळीं जहांगीरनें त्याला राणा ही पदवी देऊन, त्याच्याकडून चितोड काढून घेऊन अमरसिंहास दिलें. कांहीं इतिसहासकार असेंहि म्हणतात कीं, सागरजीला आपल्या कृत्याचा पश्चात्ताप होऊन, त्यानें आपल्या भाच्याला म्हणजे अमरसिंहाला—चितोडगड दिला. जहांगीरनें त्याला राणाजी अशी पदवी दिली होती. सागरजीनें अजमेरांत वराहाचें मंदीर बारा लाख रुपये खर्चून बांधलें होतें. तें जहांगीरनें पददलित केलें. या कारणानें अथवा इतर कांहीं अन्य कारणामुळें जहांगीरकडून तिरस्कृत झाल्यामुळें जहांगीरच्या दरबारांत त्यानें आपल्या छातीवर अस्त्राचा आघात करून घेऊन आत्महत्त्या केली. सागरजीला एका मुसलमानणीपासून एक पुत्र झाला होता. त्याचें नांव टॉडनें महाबलखां होतें असें म्हटलें आहे. कोणी म्हणतात कीं, महाबलखां हा सागरजीचा पुत्र नसून, काबुलाहून तो इकडे आला होता व त्याचें पहिलें नांव जमाना बेग असें होतें.

होत होतें, तरी त्याच्या भावांची स्थिति पाहून त्याला अधिक दुःख होत असें. इतक्या सर्व अडचणी लक्षांत आल्या असतांहि, तो आपल्या व्रतापासून ढळला नाहीं. त्यानें आपल्या व्रताची पूर्तता करण्याची भीष्म प्रतिज्ञा केली !

आजपर्यंत या जगांत आपल्या जन्मभूमीच्या उद्धारासाठीं अनेकांनीं प्रतिज्ञा केल्याचें ऐकिवांत आहे; परंतु प्रतापसिंहाप्रमाणें कठोर प्रतिज्ञा करणारे फारच विरळा असतील ! त्याच्याप्रमाणें देशोद्धाराची बिकट प्रतिज्ञा केल्याचा दाखला क्वचितच सांपडेल ! प्रतापसिंहाचे कठोर व्रत काय होतें, तें आपणांस माहीत आहे काय ? दुर्बल हृदयाला त्या कठोर व्रताची कल्पनाहि होणार नाहीं. प्रतापाची ती असाधारण प्रतिज्ञा—भीष्मप्रतिज्ञा—ऐकली असतां, अंगावर रोमांच थरारून केश ताठ होतील ! डोळ्यांतून मेघवृष्टिप्रमाणें अश्रू वाहूं लागतील ! अरे विलासप्रेमीयांच्या दासांनों, भोगविलासांत गर्क झालेले तुम्ही देशोद्धाराच्या व्यर्थ गप्पा कशाला मारतां ? तुम्ही आपल्या कानाचे पडदे साफ करून—त्या राजपुत्राची, त्या वीर नरनाथाची प्रतिज्ञा तर ऐका ! पण ती केवळ ऐकूनच स्वस्थ बसूं नका ! आपलीं हृदयकपाटें उघडून, ती प्रतिज्ञा हृदयांत धारण करा ! ऐका तरमग प्रतापाची

व महाबलखां हें त्याचें नांव जहांगीरनें ठेवलें होतें. कांहीं असलें तरी जहांगीरच्या वेळीं त्याच्यासारखा योद्धा व सेनापति दुसरा कोणी नव्हता हें खरें. कंदाहारचा किल्ला सागरजीच्या ताब्यांत होता ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं.

प्रतिज्ञा काय होती ती! ती वज्राहूनहि कठोर होती; पण नाहीं! प्रतापाच्या प्रतिज्ञेवर लक्ष देण्यासारखी वेळ आज तुम्हांला कोठें आहे! तुमच्या शुद्ध पाषाणहृदयावर प्रतापाची ती प्रतिज्ञा आपला प्रभाव कसा करूं शकणार? हिंदूंनो, पराजित गुलाम हिंदूंनो, ऐकाच तर आतां!

मातेपेक्षांहीं जन्मभूमातेचा सिद्धांत फार गहन आहे हें आपणांस माहीत आहे काय? आपलें व्यावहारिक जीवन किती लोकांनीं —'जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी'—या वाक्याला स्वकार्यांत परिणत करून दाखविलें आहे? प्रतापानें हें वाक्य–नुसतें वाक्य उच्चारूनच–शांतता स्वीकारली नाहीं, तर त्यानें या वाक्याला स्वकर्मांत परिणत करून दाखविलें आहे! प्रताप खरा क्रियाशील होता. त्याच्या हृदयांत–त्याच्या जन्मभूमातेच्या दुर्दशेबद्दल–शोकसागर खवळून राहिला होता. मातेच्या मृत्यूनंतर अनेक लोक शोक करतांना दिसतात; पण प्रतापानें आपल्या भूमातेबद्दल जो शोक केला होता, तो त्याच्या त्या प्रतिज्ञेवरूनच स्पष्ट होतो आहे. " जोंपर्यंत चितोडचा उद्धार झाला नाहीं, तोंपर्यंत मी व माझे वंशधर श्मश्रु करणार नाहींत[1]. सोन्याचांदीच्या पात्रांतून भोजन करणार नाहींत! पलंग किंवा मृदुशय्येवर निजणार नाहींत!" केवढी ही घोर प्रतिज्ञा! या प्रतिज्ञेप्रमाणें ती अमलांत आली. सोन्याचांदीचीं भांडीं फोडून टाकून, सर्व सुख-

---

१ भारतमातेच्या दुर्भाग्यानें चितोडचें पूर्ववैभव चितोडला पुन्हां प्राप्त झालें नाहीं.

सामुग्री नष्ट करण्यांत आली. राजपरिवारानें कोमल शय्यांचा त्याग करून, गवताच्या शय्यांचा स्वीकार केला. स्वदेशभक्त प्रताप इतकेंच करून शांत राहिला नाहीं, तर त्यानें असा एक उपाय योजला कीं, ज्याच्या योगानें त्या शोकपूर्ण मेवाडच्या समोर सदैव ती गोष्ट खडी उभी राहिली जावी. चितोडचें स्वातंत्र्य जरी नष्ट झालें होतें तरी, चितोडचे डंके व नौबदी सेनेच्या अग्रभागीं पूर्ववत् ज्या राहात असत, त्या जन्मभूमीचा उद्धार करण्याचें व्रत स्मरणांत राहावें म्हणून, वीरवर प्रतापानें, अशी आज्ञा केली कीं, " हे नगारे मेवाडच्या सेनेच्या अग्रभागीं न वाजतां पृष्ठभागीं वाजले जावे.* प्राण असेपर्यंत मी मेवाडचा गौरव नम्र होऊं देणार नाहीं, जन्मभूमीची मानमर्यादा रक्षण करण्यासाठीं कोणचीहि चीज खर्ची घालण्यास मी भिणार नाहीं व मातेच्या दुधाला कधींहि बट्टा लागूं देणार नाहीं ! " अशा तऱ्हेची कठोर भीष्मप्रतिज्ञा प्रतापसिंहानें केली. याप्रमाणें प्रतापानें कठोर देशोद्धाराचें कठीण व्रत स्वीकारलें. ज्याप्रमाणें मातेच्या परलोकगमनानें शोकाकुल होऊन, वत्सल पुत्र कांहीं कालपर्यंत, सर्व सुखांपासून

---

* मेवाडचे राणे अद्यापपर्यंत या रूपांतराच्या आशेचें प्रतिपालन करीत आहेत. ते शयनसमयीं अंथरुणाच्या खालीं गवत ठेवतात. सोन्याचांदीचीं भांडीं पानावर ठेवून त्यांत भोजनाचे पदार्थ वाढले जातात, आणि चितोडच्या रणसेनेचा डंका अद्यापी पिछाडीलाच वाजविला जातो.

अलिप्त होतो, त्याचप्रमाणें आर्यभूमीच्या सुपुत्र प्रतापसिंहानें सर्व तऱ्हेचीं चैन व सुखें यांवर लाथ मारली.

राजर्षि प्रतापसिंह यानें स्वतःच केवळ स्वदेशासाठीं संन्यास घेतला होता असें नाहीं, तर त्यानें सर्व मेवाडलाच सन्यासी करून सोडलें होतें. त्यानें अशी आज्ञा सोडली होतो कीं, " समस्त प्रजेनें राज्य सोडून पर्वतराजींत जाऊन राहावें. राज्यांत कोणीहि महोत्सवादि करूं नयेत. सर्व घरें जाळून टाकावींत. वाणिज्य, कृषि वगैरे कोणी कांहीं करूं नये. जिच्यामुळें वैरी मुसलमानांची नजर आकर्षित होईल, अशी वस्तु कोणीहि जवळ बाळगूं नये. जो कोणी ही राजाज्ञा भंग करील त्याला प्राणदंडाची शिक्षा देण्यांत येईल. " अशी जी ही आज्ञा वीरवर प्रतापानें आपल्या राज्यांत सोडली होती, तिला हंसणारांनीं खुशाल हंसावें ! प्रतापानें वेडोपिराप्रमाणें हें कृत्य केलें असें जगतांत जर कोणाला मानायचें असेल, तर खुशाल मानावें. खरें कार्य करण्याची लालसा ज्याला असेल व जो स्वेच्छेनें वागतांना लोक त्याला पाहात असतील तर तो प्रतापाप्रमाणें वेड्या पिरांतलाच गणला जातो असा अनुभव हरघडी येतो. प्रेमांत सर्वच पागल होत असतात. प्रेमांत प्राणी आपल्या सर्वस्वालाहि आंचवतो. मग असें तें प्रेम मनसोक्त कां नसावें ? मजनूनें लैलाच्या प्रेमांत आपला प्राणहि खर्चीं घातला होता. प्रतापाचें प्रेम कांहीं त्या लैलामयजनूंप्रमाणें नव्हतें. त्याचें प्रेम देशप्रेम्यांप्रमाणें होतें. ईश्वरी प्रेमाप्रमाणें त्यानें सर्वस्वाचा त्याग करून, एकान्तवास

पतकरला होता. त्यानें आपला राष्ट्रीय यज्ञ पूर्ण करण्यासाठीं सर्वस्वाचा स्वाहाकार केला होता. आपल्या प्रजेच्या हृदयांत स्वदेशाच्या शोचनीय स्थितीचें भेसूर चित्र उमटवून, तें सुधारण्यासाठींच त्यानें अशा कठोर व्रताचें अवलंबन केलें होतें.

प्रजेनें मोठ्या आनंदानें आपल्या नरनाथाची आज्ञा मनःपूर्वक स्वीकारली. मोठमोठ्या सरदारांपासून तों अगदीं हलक्या दर्जाच्या प्रजेपर्यंत सर्वांनीं, प्रतापसिंहाच्या या व्रताची साहाय्यता करण्याचें कबूल केलें. आपल्या प्रजेच्या साहाय्यानें प्रतापसिंहानें देशोद्धाराच्या अनुष्ठानास याप्रमाणें सुरवात केली!

परिच्छेद सातवा.

राजाज्ञाभंगाबद्दल दंड.

अहो, जिन्को विधि सब जीव सों बढि दीयें जग काज
अरे, दान सलिल वारे, सदा जे जीतहिं गजराज ॥
अहो, झुक्यो न जिनको मान ते नृपवर जग सिरताज।
अरे, सहहिन आज्ञा भङ्ग जिमि दन्त पात मृगराज ॥
अरे, केवल यहु गहिना पहिरि राजा होइ न कोय।
अहो, जाकी नहिं आज्ञा टरै सो नृप तुम सम होय ॥

—भारतेन्दु.

देशोद्धाराचें कठोर व्रत पालन करण्यास सांगून प्रतापसिंह स्वस्थ बसला नाहीं. तो घोड्यावर स्वार होऊन, एकटाच आपल्या राज्यांत भटकत असे व लपून छपून, आपल्या आज्ञेचें यथायोग्य पालन सर्वत्र होतें आहे कीं नाहीं, याचें तो परीक्षण करीत असे. त्याची आज्ञा अमान्य करणाऱ्याला तावडतोब पकडून त्याच्यावर बऱ्याच कठोर देहदंडाची शिक्षा बजावली जाई. थोडक्याच अवधींत मेवाडचा बराच भाग अगदीं उजाड स्थितींत जाऊन पोंचला. तो इतका कीं, ज्या राजरस्त्यावर नगरवासी जनांची इतकी गर्दी व्हायची कीं, गर्दी-

हून रस्ता काढण्यास मार्गस्थांना जागा मिळत नसे, ते राजरस्ते अगदीं जनशून्य दिसूं लागले. ज्या मोठमोठ्या बाजारांतल्या कोलाहलामुळें एक शब्दहि पुरा धड ऐकूं येत नसे, ते बाजार अगदीं सताड उजाड होऊन गेले! त्याठिकाणीं पशुपक्षी मोठ्या जमावानें वावरूं लागले! ज्या राजमहालांमधून होणाऱ्या रोषणाईनें नेत्रांपुढें चकचकाट होत असे, तेथें अंधःकाराचें साम्राज्य दिसूं लागलें. ज्या पिलखान्यांतून हत्तींचे चीत्कार व घोड्याचें खिंकाळणें ऐकूं येत असें, त्या स्थळीं जंगली पशूंचे अड्डे जमले! ज्या स्थळीं सुंदर पुष्पवाटिका होत्या व जेथून येणाऱ्या सुगंधानें मस्तक तरावदून जात असें, तीं स्थानें कांटेरी झा-डांनीं व्यापून टाकलीं! पुष्पांच्या ठिकाणीं काट्यांचा सुळसुळाट झाला! ज्या शेतांतून हिरवीं पिवळीं शेतें लोंगरलेलीं दिसत असत, तेथें उंच उंच गवतांनीं आपलें ठाणें दिलें! बहुतेक रस्त्यांवरून कांटेरीं झाडें व जाळ्या माजून राहिल्या! ज्या महालांतून खुबसूरत कमलनयना अप्स-रातुल्य लावण्यलतिका विहार करीत असत, तेथें भयंकर जंगली विषारी जनावरें बेगुमानपणें दिवसांढवळ्या संचार करूं लागलीं! फार काय सांगावें! त्या स्वर्गतुल्य मेवाडची स्थिति स्मशानभूमीच्याहि पलीकडली होऊन गेली यांत तिळमात्र संदेह नाहीं!

अशा त्या देखाव्याच्या स्थितींत प्रतापसिंह आपल्या सांथीदारां-सह एके दिवशीं बनास नदीकांठच्या अनतल्ला नांवाच्या ठिकाणीं फिरत असतां, एक गडेरिया म्हणजे गवळी लपून आपल्या म्हशीला त्या नदी-

कांठच्या गवतावर चारीत असतांना त्याच्या दृष्टीस पडला. त्या बिचाऱ्याला काय माहीत कीं, राणाजी अशा तऱ्हेनें तेथें अवचित प्राप्त होतील तें! त्या निर्जनस्थानीं आपल्यास कोण बघायला येणार अशी त्याची समजूत होती; पण तो त्याचा समज मिथ्या ठरला. समोर महाराण्याला पाहातांच, त्या गडेरियाचा होश उखडून गेला. महाराण्यानें त्याच्या त्या आज्ञाभंगाबद्दल त्याला तत्काळ देहदांडचें कठोर प्रायश्चित्त देऊन, त्याचा मुडदा, सर्वांस दहशत बसण्यासाठीं, सर्वांच्या नजरेस पडेल अशा एका झाडाच्या फांदीवर लटकावून ठेविला!

अशा तऱ्हेची त्या श्यामल सस्यपूर्ण स्वाभाविक सौंदर्यखनि देवतुल्य मेवाड नगरीची अवस्था, आपला सर्व श्रृंगार दागदागीनें, कपडेलत्ते टाकून, मलिन हीन भिकारीण विधवेप्रमाणें झालेली होती. सस्याढ्या मेवाडभूमि याप्रमाणें मरुस्थली बनली होती.

मेवाड उजाड करून, राजर्षि प्रतापसिंहानें आपली राजधानी कुम्भलमेर येथें केली व गोगुंदा वगैरे पहाडी किल्ले दुरुस्त करून, दुर्भेद्यावस्थेंत आणिले. त्या ठिकाणीं प्रवेश करण्यास फक्त एक दोनच पहाडी रस्ते होते. मोंगल सेना त्या प्रदेशाच्या बाहेर एकत्रित होत होती. तिला पहाडी प्रदेशाचा मुळींच पत्ता नव्हता. मेवाड उजाड झाल्यामुळें, बादशाही सेनेला खाण्यापिण्यास मिळणाऱ्या वस्तूंचा आभाव झालेला होता. यामुळें अन्नसामुग्रीचा यथेष्ट सांठा जवळ असल्यावांचून बादशाही सेनेला, त्या प्रांतांत घुसून जाणें अशक्य झालें होतें. रजपूत

लोक आपल्या प्रदेशांतील सर्व वाट, रस्ते, नाले वगैरेंचे सर्वस्वी माहितगार होते; पण मोंगली सैन्य त्या बाबतींत अगदीं अनभिज्ञ होतें. मधून मधून रजपूत सेनेच्या टोळ्या मोंगलांच्या सेनेवर छापे घालून, त्यांचा फडशा पाडीत होत्या. त्यावेळीं हिंदुस्तानाच्या उत्तर भागांतून व्यापाराचे जे जिन्नस ज्या ठिकाणांतून युरोपांत रवाना होत असत, तें ठिकाण अरवली पर्वताच्या जवळ असून, तेंथून ते पदार्थ सुरतेस जाऊन, जहाजावर चढविण्यांत येत असत. रजपूत लोक त्या वस्तूंची लूट करूं लागले. याप्रमाणें त्या रस्त्यानें जाणाऱ्या यात्रेकरूंनांहि त्या भागांतून प्रवास करणें हलकें हलकें मुष्किलीचें होऊं लागलें. मोंगलसेनेचा जमाव आस्ते आस्ते वाढत चालला होता. त्या सेनेला रोखून धरण्यासाठीं, प्रतापसिंह आपल्या सैन्यासह उत्तरेकडील गुंफांकडे चालला होता. त्याच स्थळाला हळदी घांट असें म्हणतात.

परिच्छेद आठवा.

अकबराची कपटलीला.

मधुर वचन तें जात मिट, उत्तम जन अभिमान ।
तनक शीत जल सों मिटै, जैसे दूध उफान ॥

—वृन्द.

जाकी धन धरती हरी ताहि न लीजे संग ।
जो संग राखे ही बनै करि राखुं अपंग ॥
तै करि राखुं अपंग फेरि फरकै सुन कीजै ।
कपट रूप बतराय ताहि को मन हरि लीजै ॥

—गिरिधर.

वाचकहो, थोडा वेळ परम पुनीत अशा प्रतापचरित्राची आलोचना बाजूला ठेवून, त्याचा प्रतिद्वंद्वी जो अकबर, त्याच्या नीतिकुशलतेचा आतां विचार करूं. आम्हांला इतिहासाच्या द्वारें असें शिकविण्यांत आलें आहे कीं, अकबर हा हिंदूंचा मोठा दोस्त होता. तो हिंदूंच्या बरोबर मोठ्या प्रेमभावानें उत्तम तऱ्हेचा व्यवहार करीत असे. कोणी कोणी इतिहासकार तर, अकबराच्या गुणांवर लुब्ध होऊन, माना डोलवतांना दृष्टीस पडतात. जगन्नाथरायासारख्या शृंगारलुब्ध

कविवर्यांनें म्हटल्याप्रमाणें ' दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा ' अशा तऱ्हेची पदवी अकबराला देऊन आपल्या औदार्याची हद्द करणारेहि कित्येक आहेत. शाळेंतील कोमलमति बालकांना असें शिकविलें जातें कीं, अकबरापेक्षां श्रेष्ठतर असा बादशाहा, मुसलमानांत झालाच नाहीं. त्याच्यावर नेहमी हिंदु प्रसन्न राहून, मुसलमान नाराज राहात असत. तो मुसलमानांच्या नाराजीची मुळींच पर्वा करीत नसे व सदैव हिंदूंचाच पक्षपात करीत असे. सद्यःकालीन विद्यालयांतून आमच्या बालकांपैकीं ज्यांनीं अभ्यास केलेला असेल, अथवा जीं कोमलमति बालकें आणि नवयुवकें शिकत असतील, तीं आम्हीं वर म्हटल्याप्रमाणें, आमचा मताच्या अनुवाद करून असें सांगू शकतील कीं, यापेक्षांहि अकबर जास्त श्रेष्ठ होता, असें आम्हांस शिकविलें जातें. कविकल्पना किंवा लेखकाचें अवडंबरहि नाहीं, किंवा शब्दरचनाहि नाहीं, पण वस्तुतः अकबराला हिंदूंचा मित्र असा इतिहासकारांनीं संबोधिलेला आहे. असें म्हटलें आहे कीं, '**अकबराच्या दरबारांत गंगाजल प्राशन केलें जात होतें. त्यानें आपल्या राज्यांत गोवध बंद केला होता. वर्षांतून सहा महिन्यांपेक्षां अधिक दिवस तो मांसभक्षणहि करीत नसे, तो हिंदुंच्याप्रमाणें आपला पेहराव करीत असे.**' अशी जर खरी गोष्ट होती असें म्हणतां आलें, तर तो हिंदूंचा पक्षपाती नव्हता असें कसें बरें म्हणावें ? अकबराचा प्रपौत्र जो कपटी औरंगजेब याला आपण जाणतां ना ! तो कसा बरें

होता ? तो हिंदूंचा द्वेष करीत असे. त्यानें अनेक हिंदूंना मुसलमान करून, त्यांचीं देवळें फोडून टाकलीं. तो हिंदूंचा द्वेष करीत असे, असें इतिहासांत लिहिलेलें वाचायला सांपडतें. त्यानें हिंदूंची अनेक वेळां कत्तल केली होती. सांगा तर मग, तुम्ही औरंगजेब आणि अकबर यांच्या वृत्तींत कोणचा भेदभाव काढला आहे तो ? तुम्हांला त्याचें तात्पर्य काय समजलें आहे ? वाचकहो, तुम्हीच काय, पण त्यावेळचे हिंदू व रजपूतहि अकबराच्या वागणुकींतले हालाहल ओळखण्यास असमर्थ होते ! त्यावेळच्या रजपूत वीरांना जर अकबराच्या राजनीतींतलें जहर ओळखतां आलें असतें, तर आमच्या वृद्धा भारतमातेला पराधीनतेच्या शृंखलांनीं जखडबंद होण्याचें कारणच पडलें नसतें ! अकबराच्या त्या अवडंबराचा मूळ सिद्धान्त काय होता ? अहो वाचकहो, अकबराची कुटिल राजनीति, चाणक्य आणि जर्मनीचा प्रिन्स बिस्मार्क यांच्याहि पलीकडची होती. चाणक्यानें फक्त नंदवंशाचाच उच्छेद करून, चन्द्रगुप्ताला राज्यावर बसविलें, बिस्मार्कानें फ्रान्सला मान खालीं घालायला लावून जर्मनीमधील विप्लवशांति नष्ट करून, पुन्हां जर्मनीचें साम्राज्य प्रस्थापित केलें; पण अकबराच्या राजनीतीचा शोध लावणें मोठें कठीण काम आहे. अकबराचें हिंदुपणाचें ढोंग काय होतें ? आम्हीं स्पष्टपणें असें म्हणतों कीं, ती अकबराची निव्वळ कपटनीति होती व ती कशी होती, तर ‘ विषस्य विषमौषधम् ’ या न्यायाची होती. विषानें विष शान्त होतें. लोखंड लोखंडानेंच तोडलें जातें ! हीच नीति अकबराची

होती. त्याची नीति हिंदूकडून हिंदूंचा नायनाट करण्याची होती. रजपूतवीर रजपुतांच्याच द्वारें आधीन करून घेण्याची त्याची नीति होती. अकबराचें हें असें हिंदुपण होतें. याचसाठीं तो हिंदूंवर प्रेम करीत होता. अकबर जर (Divide and Rule) भेद करून राज्य करणारा नसता, तर त्यावेळीं मुसलमानांचें साम्राज्य हिंदुस्तानांत कधींच टिकलें नसतें. अकबराचा पितामह जो बाबर त्यास राणा सांगाच्यावेळीं कसे-कसे डाव खेळावे लागले होते, ते तो चतुरचूडामणि अकबर समजून चुकला होता. त्याचा बाप जो हुमायून, त्याला दिल्लीचें तख्त कां सोडावें लागलें होतें, त्याबद्दल तो पूर्ण अभिज्ञ होता. या मागील सर्व अनुभवांनीं तो शहाणा व धूर्त बनलेला असल्यामुळें, त्यानें असें धोरण ठेविलें होतें कीं, कांट्यानेंच जसा कांटा काढावा लागतो, तद्वत शत्रूला शत्रूकडूनच मारविलें पाहिजे, म्हणजे आपला त्यांत लाभ होईल. साखरेनें जर प्राणघात होत असेल, तर विषाची योजना कशाला? अकबराचा सिद्धांत असा होता कीं, कपटजालाशिवाय आपल्या राज्याचें दृढीकरण होणें शक्य नाहीं. मासा जसा थोड्याशा पिठाच्या गोळीच्या लालचीनें गळांत आडकला जातो, किंवा मधुरालापाला भुलून, चौफेर पळत चाललेला हरिण जसा नादलुब्धतेनें प्राणास मुकतो, तीच स्थिति रजपूत जातीची अकबराच्या कपटनीतीनें शेवटीं झाली.

शत्रूपेक्षां मित्रांकरवींच विशेषेंकरून, रजपुतान्याचा सत्यनाश झालेला आहे. औरंगजेब हिंदूंचा द्वेषी होता ही गोष्ट सत्य आहे; परंतु

हिंदूही त्याचा द्वेष करून, त्याच्याशीं संग्राम करण्यास आखाड्यांत उतरलेले होते. औरंगजेबाच्या द्वेषानें हिंदूंना त्याच्या मूळ स्वरूपाची ओळख पटवून दिली होती. औरंगजेबाच्या द्वेषामुळेंच दिल्लीची बादशाही रसातळाला गेली; पण अकबराच्या धूर्ततेनें जी हिंदूंची मैत्री संपादिली, तिनें त्याचें राज्य विस्तृत झालें. त्यावेळीं जर मुसलमानांनीं अकबराची कपटनीति न ओळखतां, ते त्याच्यावर चिडले असते, तर त्यांची मोठी चूक झाली असती. अकबरानें हिंदूंच्या आचरणाचें ग्रहण करून, रजपुतांच्या विशुद्ध रक्ताला कलंकित करण्यापर्यंत, कपटनीतीचें जाळें मोठ्या सफाईनें पसरलें होतें. औरंगजेब हा निष्ठुर शास्ता होता. त्यानें हिंदूंवर अनेक अत्याचार केले; पण अकबरानें हिंदूंचें—विशेषत: रजपुतांचें रक्त—ढेंकूण अथवा जळवा यांप्रमाणें पिण्याची शक्कल योजिली होती. तो फुंकर मारून टांचा कुरतडणारा उंदीर होता. औरंगजेबानें तसें केलें नाहीं. *त्याच्यांत जरी हजारों दोष होते, तरी तो अकबराप्रमाणें विषयविलासी आणि इन्द्रियनिरत नव्हता. अकबराप्रमाणें

---

* औरंगजेब हा इतर बादशाहांप्रमाणें भोगविलासी नव्हता. त्यानें आपल्या मृत्युसमयीं असें लिहून ठेविलें आहे कीं, मीं ज्या टोप्या शिवून विकल्या त्यांची जी बाकी साडेचार रुपये शिलकेंत आहे तीच माझ्या दफनाकरतां खर्च करावी व मीं कुराण वाचून जे ८७५ रुपये जमविले आहेत, ते फकीरांना वांटून द्यावेत. यावरून हें उघड होतें कीं, शिल्पकला व साहित्यसेवा यांच्या द्वारें औरंगजेब आपला स्वतांचा

औरंगजेबाला नाचगाण्यांचा शोक नसून, हिंदूंच्या स्त्रियांचें सतीत्व हरण करण्याचीहि लालसा त्याला केव्हांहि झाली नव्हती. अकबर जरी हिंदूंवर प्रेम करीत असे, तरी तें बाह्यात्कारी असून, त्याचा आंतला डाव हिंदूंना निःसत्व, बलहीन, धर्महीन आणि जातीविहीन करण्याचा असून, तो आपले मनोरथ कसें सफल करीत असे, हें मागें सांगितलेलें स्मरत असेलच.

रोजचा खर्च भागवीत असे. शमशुद्दीन अलतिमश याचा मुलगा नासिरुद्दीन मुहम्मद हिंदुस्तानचा बादशाहा झाला असतांहि मोठ्या साध्या व सरळ स्वभावाचा होता. त्यानें आपलें एकच लग्न केलें होतें. तो आपल्या बेगमेकडूनच खाना बनवीत असे. लौंडी अथवा मज्बूरीण (मोलकरीण) तो तिच्यापाशीं एकहि राहूं देत नसे. गरीब जें अन्न खातात तेंच तो खात असे. तो आपला गुजारा साहित्यसेवेवर करीत असे. त्यानें एके दिवशीं एक पुस्तक लिहून त्याची नक्कल एका मुल्लाला दाखविली. मुल्लानें त्याला त्यांतल्या कांहीं चुका जरी दाखविल्या आणि त्याप्रमाणें त्यानें त्या त्याच्या देखत जरी दुरुस्त केल्या, तरी तो गेल्यावर त्यानें आपलें पुस्तक पूर्ववतच करून ठेविलें. त्याबद्दल त्याला एकानें विचारलें असतां, तो असें म्हणाला कीं, " मीं जें लिहिलें होतें तें बरोबर होतें; पण तसें मी बोललों असतों तर मुल्लाचें मन व्यर्थ दुखावलें असतें. "

परिच्छेद नववा.

नौरोजा व मीना-बाजार.

धनि धनि भारत की क्षत्राणी ।
वीर कन्यका वीर प्रसविनी वीरवधू जगजानी ॥
सती शिरोमणि धर्म धुरंधरि बुधि बल धीरज खानी ।
इनके जस की तिहूं लोक में अमल ध्वजा फहरानी ॥
—हरिश्चन्द्र.

खरीददार रमणी जहां, रमणी बेचनहार ।
रमणीगण के रूप का लगा अनूप बजार ॥

आमच्या बहुतेक वाचकांनीं ' नौरोजा ' हें नांव ऐकलें नसेल किंवा ऐकलेंहि असेल. हा नौरोजाचा मेळा चालवणारा व हिंदूंचें लाडु-कपण प्रेमानें पुरवणारा, प्रत्यक्ष बादशाहा अकबरच होता. अकबराच्या आधीं व नंतरहि नौरोजाचा मेळा भरविण्याची कल्पना कोणाच्याही स्वप्नांत सुद्धां आली नव्हती व नाहीं. हा नौरोजाचा मेळा म्हणजे काय गोष्ट होती ? कांहीं नाहीं हो ! त्यांत सगळा पाजीपणा होता ! आपल्या राज्यांतर्गत अवस्था जाणण्यासाठीं बादशाह नौरोजाचा मेळा भरवीत असे, असें त्याचा लाडका व प्रेमांतला वजीर अबुल फाजल

ह्या जें स्पष्ट म्हणतो त्याबद्दल आम्ही अबुल फाजलला मुळींच दोष देत नाहीं. कारण, म्हटलें आहे ' समरथ को नहि दोष गुंसाई ! ' अकबराच्या वेळीं जर दुसऱ्या कोणी अकबराप्रमाणेंच नौरोजाचा मेळा भरवण्याचें धाडस केलें असतें, तर अबुल फाजलनें आपल्या पुस्तकांत, त्याला फजित केल्यावांचून कधींच सोडलें नसतें; परंतु प्रत्यक्ष बादशाहा अकबर आणि अबुल फजल हेच त्याचे उत्पादक असल्याकारणानें अबुल फजालनें तसल्या त्या निंद्य मेळ्यासंबंधानें चकारशब्दहि वाईटपणाचा काढलेला नाहीं. उलट त्या बाबतींत अकबराच्या बाजूनेंच अबुल फाजलनें मोठ्या बहारीची वकिली केलेली आहे. अकबराला नौरोजाच्या मेळ्याबद्दल कोणीहि दूषण देऊं नये म्हणून, अबुल फाजलनें बरीच शाई खर्चून, लेखणीहि बरीच झिजविलेली आहे. काव्यशेखर अबुल फाजलनें नौरोजा या शब्दाच्या अर्थाचा मोठ्या बहारीनें खून करून टाकला आहे. सत्य कधींहि लपून राहात नाहीं. अकबराच्या मस्तकावरील दोषभारापैकीं, बराचसा दोषभार हलका करण्यासाठीं, अबुल फाजलनें खोटें लपवावें म्हणून, प्रयत्न केला आहे; पण तो त्यांत सर्वथैव फसला आहे. अबुल फाजलच्याच शब्दांत ऐकायचें असेल, तर दरमहा हा नौरोजाचा मेळा, बड्याबड्या उत्सवाच्या ऐवजीं नऊ दिवसभर भरविण्यांत येत असे, असें ऐकूं येतें. नौरोज्याच्या नऊ दिवसांत सर्व मुसलमान आनंदानें मजा मारीत, परंतु त्या नऊ दिवसांपैकीं एक दिवस बादशाह आपल्याकरितां खास राखून ठेवून, त्या दिवशीं स्त्रियांचा मेळा तो भर-

थीत असे. स्त्रियांच्या या मेळ्यांत मोठमोठ्या सौदागरांच्या स्त्रिया, स्वतां आपापला माल विक्रीसाठीं आणीत असत. बादशाहाची बेगम, शहाजाद्या व बादशहाच्या आश्रित सर्व थोर पुरुषांच्या स्त्रिया, त्या मेळ्यांत आपल्या आवडीप्रमाणें जिन्नस विकत घेत असत. याप्रमाणें हा—नौरोज-मीना—बाजार, दरमहा एक दिवस बादशहाच्या महालाच्या समोर भरत असे. अशा वेळीं बादशाह अकबर काय करीत असे? पक्षपाती आणि खुषामति इतिहासलेखकांनीं अबुल फाजलप्रमाणेंच या मीना—बाजाराची मोठी थोरवी गायलेली आहे. राज्यांतर्गत अवस्था जाणण्याची ही फारच बहारीची युक्ति शोधून काढण्यांत आली होती. रूपसुधापान करण्यासाठीं अकबर हा मीना-बाजार भरवीत असे, असें अबुल फाजल लिहायला कसा विसरला कोण जाणें! बादशाहा आपल्या हृदयस्थ पापवासनेच्या ज्या तऱ्हेनें लोकांच्या डोळ्यांत धूळ टाकून, कित्येक मृगनयनांच्या गुप्तपणें ज्या शिकारी करीत असे, त्यांचें कोठवर वर्णन करावें? याच नौरोजाचें दुसरें नांव खुषरोज म्हणजे आनंदाचा दिवस असेंहि होतें. त्या दिवशीं बादशाह अकबर आपल्या इंद्रियजनित पापवासनेला तृप्त करून, आनंदाच्या महासागरांत दरमहा मग्न होत असे. आजच्या दिवशीं बादशहानें, किती ललनांचीं सतीत्व रूपीरत्नें, विकारवशतेच्या नशेंत खरीद केलीं असतील कोणाला ठाऊक! कित्येक अबोध ललना जरी लोभ व लांचलुचपत यांना वश होऊन, आज नेहमींप्रमाणें बादशाहाच्या हस्तगत झाल्या असल्या, तरी त्यांतल्यात्यांत—बिकानेरच्या रामसिं-

हाच्या स्त्रीनें, राजालंकारांच्या लुचपतीला भुलून, आपखुषीनें आपलें अमूल्य सतीत्वरत्न अकबराच्या हातीं समर्पित केलें होतें हेंच सत्य आहे. अकबराचा नियमहि असाच होता कीं, जे रजपूत त्याचे बंदीजन झालेले होते, त्यांनीं आपल्या बढ्या बेट्या मीना–बजारांत दरमहा धाडल्याच पाहिजेत. त्याप्रमाणें अकबराच्या आधीन असलेल्या रजपूत राजांपैकीं, फक्त बुंदीच्या * हाडा राजानें आपली बडी बेटी दिल्लीच्या मीना–बाजारांत धाडली नव्हती. कारण, त्याच्या तहनाम्यांतच असें स्पष्ट लिहिलेलें होतें कीं, ‘ बुंदीचा राजा कधींहि बादश-

---

* खरें पाहिलें असतां, त्यावेळीं सर्व हिंदूंत ऐक्याचा अभाव झाल्यामुळेंच बादशाह अकबराला आपल्या राज्याचा विशाल विस्तार करतां आला. चितोडच्या वीराप्रमाणेंच बुंदीच्या हाडा वीरामुळें अकबराची नाडी बरीच मंद चालत होती. बुंदीच्या सुर्जनरावाच्या वेळींच बादशाह व राव यांच्यांत संधी झालेला होता. बुंदीच्या राजाशीं संधी करण्यासाठीं अकबर इतका उतावळा झाला होता कीं, तो स्वतां बुंदीच्या दरबारीं जयपुरचा राणा भगवानदास आणि राजा मानसिंह यांच्या बरोबर त्यांचा नौकर म्हणून प्रथम प्रविष्ट झाला होता. [विक्रम संवत १६२४ बुंदीचा अकबराशीं संधी] Tod's Rajaputana Vol. II पाहा.

हाच्या विरुद्ध उठणार नाहीं व तो आपला कविला कधींहि बादशाहाकडे नौरोजाच्या मीना—बाजारांत धाडणार नाहीं. बुंदीचा राजवंश सोडून, अकबर हा रजपुतांच्या थोर थोर घराण्यांचें रक्त एकसारखा नौरोजच्या मेळ्यांत अपवित्र करीत सुटला होता; अशा तऱ्हेनें बहुतेक सर्व रजपुतांनीं आपले आत्मे, ललनांप्रीत्यर्थ जरी अकबराला विकून टाकले होते, तरी फक्त एकच वीर आत्मविक्रय करण्यास कधींहि तयार झाला नाहीं. अनेक रजपूत स्त्रियांनीं आपलें पातिव्रत्य जरी भ्रष्ठ करून घेतलें होतें, तरी आजच्या प्रसंगीं एका अलौकिक कुलवान् कामिनीनें आपल्या पातिव्रत्याचें रक्षण करण्याचा निश्चय केला होता. अशा त्या ललनाश्रेष्ठ वीरस्त्रीपुढें अकबराला कोणच्याही तऱ्हेनें जयप्राप्ति न होतां, तिच्या पदकमलीं आपलें मस्तक नम्र करणेंच भाग पडले होतें व अकबराला आपल्या पापी वासनेबद्दल त्या वीरश्रेष्ठा स्त्रीची क्षमा मागणें भाग झालें होतें. अशा त्या धन्या साध्वीची हकीकत काय घडली ती आतां ऐका:—

खरें पाहिलें असतां, त्यावेळीं बिकानेरचा राजकुमार पृथ्वीराज, अकबराचा बंदीवान होता. तो जरी अकबराचा कैदी होता, तरी त्यानें आपलें हृदय बादशाहाला विकलें नव्हतें. पृथ्वीराज हा मोठा कवि, निधड्या छातीचा व खरा देशभक्त होता. त्याला योग्य अशीच व त्याच्या विचारांशीं एकजीव पावणारी भार्या मिळालेली होती. तिचें

व त्याचे विचार अगदीं एकसारखेच होते. ती त्या पृथ्वीराजाची धर्मपत्नी, महाराणा प्रतापसिंहाचा भाऊ जो शक्तसिंह, त्याची मुलगी होती. तिला आपल्या शिसोदेकुळाचा फार अभिमान होता. ती जशी रूपवती होती तशीच गुणवतीहि होती. सर्व राजस्थानांत ती अद्वितीया सुंदरी होती. आजच्या दिवशीं, कांहीं अपरिहार्य कारणानें तिला मीना-बाजारांत[१] जाणें भाग पडलें होतें. मीना–बाजारांत बादशाहा अकबर त्यावेळीं मोठ्या झोंकानें चैन करीत हिंडत होता. तो त्या स्त्रीला पाहून चकित झाला व तिच्या सौंदर्यावर लुब्ध होऊन मोहितहि झाला. इतर स्त्रियांप्रमाणें तीहि आपलें आत्मार्पण आपल्याला खात्रीनें करील, अशी त्याची समजूत झाली; पण ती त्याची समजूत चुकीची होती असें अखेरीस त्याच्या निदर्शनास आलें. पृथ्वीराजाच्या त्या धर्मपत्नीसंबंधानें त्याचा तो समज भ्रामक होता. ती शिसोदेकुलांतली बालिका होती, पृथ्वीराजाची पत्नी होतीं व प्रत्यक्ष भीष्मप्रतिज्ञा करणाऱ्या प्रतापसिंहाची पुतणी होती. अशा त्या साध्वीचें पातिव्रत्य भ्रष्ट करणें म्हणजे कांहीं हलकी गोष्ट नव्हती.

---

१ पुण्यांतल्या सेवासदनाचा जो मीना–बाजार भरला होता व मुंबईसहि तशाच तऱ्हेचा बाजार भरवला गेला होता व पुढेंहि याच नांवानें बाजार वारंवार भरण्याचा संभव आहे, ते अकबराचीच पुनरावृत्ती होते किंवा असतील असें म्हणण्याचें कोणी धारिष्ट करावें ?

ती हरिणी नसून सिंहीण होती, हें अकबराला काय माहीत ? त्या मृगनयनेला आपण आपल्या फन्दांत गिरफदार न करतां, आपणच त्या सिंहिणीच्या तडाक्यांत सांपडलों आहोंत, अशाबद्दलची अकबराला कल्पनाहि नव्हती. अकबरानें लोभ व लालुच दाखवून त्या सतीला आपल्या प्रेमपाशांत बद्ध करण्याचा प्रयत्न केला; परंतु त्या तेजस्वी वीररमणीनें त्याच्या त्या कृत्याकडे मुळींच लक्ष्य दिलें नाहीं. अकबर हा भारतसम्राट आहे ही कल्पनाहि तिला शिवली नाहीं. ती त्याला खालीं पाडून एकदम त्याच्या छातीवर बसली आणि तिनें आपल्या कमरेचा पेषकब्ज काढून, त्याला म्हटलें:—" अरे नराधमा, पापिष्टा, देवाची शपथ घेऊन सांग कीं, यापुढें केव्हांहि रजपुतांचें कुल कलंकित करणार नाहीं. अशी जर शपथ न घेशील, तर याच पेषकब्जानें आतां पाहा तुझा कंठनाळ चर चर कांपून, तुला यमलोकाला धाडून देतें. " अशी म्हण आहे कीं, ' चोराचीं पावलें वाजत नाहींत. ' अन्यायाचे कुटिल कटुवृक्ष आणि पर्वतप्राय पापी हृदयें, हीं न्यायाच्या झुळुकीबरोबर हदरून जातात. तीच स्थिति अकबर बादशहाची झाली. अकबर हा भारतवर्षाचा जरी सम्राट होता, तरी पृथ्वीराजाच्या वीरपत्नीचें तें साहस पाहून, तो अगदीं भीतीनें गांगरून गेला व कोणच्याही तऱ्हेचा अनमान न करतां, त्यानें त्या वीरबालेच्या पायांवर शरणागताप्रमाणें आपला मस्तक नम्र केला.

अशा वीरललना ज्या भूमींत उत्पन्न होतात ती भूमी खरीच धन्या होय! अद्यापीहि या भारतमातेचें मस्तक या बाबतींत जरी उन्नत असलें; तरी-हाय! आज काल अशा स्त्रिया येथें उत्पन्न होणें तर दूरच राहिलें, पण पुरुषांचाहि दुष्काळच आहे. असो. याप्रमाणें रजपूत जात अकबराच्या कुटिल नीतीला भुलून—आपला वंश, मान आणि प्रतिष्ठा यांना जरी मुकली होती, तरी राजस्थानचा ध्रुव तारा जो प्रतापसिंह, त्यानें अकबराचा मुकाबला वेण्याचें ठरवलें.

परिच्छेद दहावा.

मानापमान.

निज कुल की मरजाद लोभवस दूर बढाई ।
जीवनभय जिन खाइ दई आपुनी बढाई ॥
जिन जग सुख हितकरी जाति की जगत हँसाई ।
सखि जिनको मुख वीर सबै सिर रहे नवाई ॥
तिनके सँग खानौ कहा मुख देखतहू पाप है ।
जाइ सीस वरु धर्म हित यह सिसोदिया थाप है ॥

—श्री राधाकृष्णदास.

सर्वग्रासी अकबरानें, एकामागून एक असे बहुतेक सर्व देशी रजवाडे आपल्या काबूंत आणिले होते. ते त्याच्या मंत्रबलानें त्याचे अगदीं बंदे गुलाम बनले होते. आराधनीय अशा रघुकुलकमलदिवाकर धर्मरक्षक पुरुषोत्तम श्रीरामचंद्रानें ज्या सूर्यकुलाची शोभा वृद्धिंगत केली होती त्याच रविकुलांतल्या आर्य जातींतील फक्त एकमात्र जो जयपूरचा नरेश त्यानें सर्वांच्या आधीं अकबराचें दास्य स्वीकारलें होतें. जयपूरचा राजा मानसिंह अकबराचा उजवा हात होऊन राहिला होता. कांहीं मुसलमान इतिहासकारांनीं असें लिहिलें आहे कीं, जयपुर

जोधपुरादि राजे अकबराच्या राज्याचे आधारस्तंभ होते. हें त्यांचें म्हणणें यथार्थ आहे. रजपूत राजे जर त्याला वश झाले नसते, तर त्याला आपलें राज्य निष्कंटक असें कधींच करतां आलें नसतें हें खास !

जे रजपूत राजे अकबराच्या अंकित झाले होते, त्यांतील जयपूरचा राजा जो मानसिंह त्याचाच सर्वांत मोठा मान होता. कच्छी भाट आणि चारण यांनीं मानसिंहाच्या कीर्तीबद्दल मोठें आजस्वितेचें कवित्व केलें आहे. असें सांगतात कीं, अकबराचें अर्ध्यापेक्षां अधिक राज्य, मानसिंहानें जिंकलें होतें. चारणांच्या कवित्वांत असें म्हटलें आहे कीं, पश्चिमेकडे इराणी पर्वताच्या पायथ्याशीं असलेल्या पामीरपर्यंत व पूर्वेकडे ब्रह्मदेशाकडील आराकानपर्यंत मानसिंहानें दिग्विजय करून, अकबराला राज्यप्राप्ति करून दिली होती. या दिग्विजयांत फक्त रजपूत सेनाच होती. अशा प्रकारच्या अनेक गोष्टी चारणभाटांनीं लिहिलेल्या आहेत. काय वाटेल तें असलें, तरी अकबराच्या राज्याची उन्नति मानसिंहानेंच केली, यांत संशय नाहीं. अकबराच्या राज्याची उन्नति करण्याच्या कामीं, मानसिंहानें—जातिद्रोह व देशद्रोह यांची मुळींच पर्वा केली नाहीं ! राजा मानसिंह हा अकबराचा उजवा हात झाल्यामुळें—राजस्थानचा ध्रुवतारा जो हिन्दपति महामहेन्द्र यावदार्यकुलकमलदिवाकर महाराणा प्रतापसिंह, त्याला अनेक कष्ट सहन करावे लागले. प्रतापसिंह आणि अकबर यांच्यांत युद्ध उपस्थित करण्यास हा मानसिंहच आदि कारण होय.

राजा मानसिंह दक्षिणेंत सोलापुरापर्यंत विजय करून, दिल्लीस परत येत असतां, वाटेंत तो प्रतापसिंहाची राजधानी जी कुम्भलमेर, तेथें प्रतापसिंहास भेटण्यासाठीं गेला. त्याच्याबद्दल प्रतापसिंहाच्या हृदयांत कांहीं जरी असलें, तरी त्यानें मानसिंहाचा त्याच्या ऐश्वर्याला शोभेल असाच अगदीं यथायोग्य आदरसत्कार केला. उदयसागरापर्यंत त्यानें स्वतां जाऊन त्याचें स्वागत के आणि मोठ्या आदरसत्कारानें त्यानें मानसिंहाला आपल्या राजधानींत नेलें. त्यानें नवीन स्थापन केलेल्या राजधानींतील उदयसागर तलावाच्या तटाकावर, मानसिंहाच्या भोजनसमारंभाची योजना केली होती. मानसिंह हा एक तर आज प्रतापसिंहाचा पाहुणा, दुसरा नातेवाईक आणि तिसरा मेवाडचा चिर शत्रू जो सम्राट अकबर त्याचा युद्धमंत्री—अशा तिहीरी नात्यानें तेथें आला असल्यामुळें, त्याच्या मेजवानीचा थाट सर्वोत्कृष्टपणें करण्यांत आला होता.

राणाप्रताप त्यावेळीं व्रतधारी असल्यामुळें, सोन्याचांदीच्या वस्तूंना स्पर्श करण्याचें जरी त्यानें सोडलें होतें, तरी त्यानें मानसिंहाच्या आदरातिथ्यांत कोणच्याहि प्रकारची उणीव पडूं दिली नाहीं. त्यानें आपला ज्येष्ठ पुत्र जो आमरसिंह त्याला त्याच्या आतिथ्यावर नेमला होता. मानसिंहहि युवराज अमरसिंह याच्या आदरातिथ्यानें संतुष्ट झाला होता.

संगमरवरानें बांधलेल्या सुंदर सरोवराच्या तीरावर भोजनसमारंभाचे स्थान शृंगारलें होतें. भोजनाची सामुग्री तेथें हलके हलकें येऊं लागली. सर्व तयारी झाल्यावर, राजा मानसिंहाला भोजनार्थ बोलावणें गेलें. मानसिंह येऊन भोजनाच्या योग्य स्थळीं बसला. भोजनाप्रारंभीं, तीक्ष्ण दृष्टीच्या त्या मानसिंहानें, महाराणा प्रतापसिंह भोजनाच्या पंक्तीस कां आला नाहीं तें ताडलें. महाराणा कुठें आहे? असें त्यानें नंतर विचारलें. अमरसिंहानें विनम्रभावानें म्हटलें " माहाराण्याचें डोकें फार दुखतें आहे, यास्तव ते आले नाहींत. आपण स्वस्थ भोजन करावें. राग मानूं नये. " हें ऐकून मानसिंह म्हणाला " राणाजींना सांगा कीं, त्यांच्या डोकें दुखण्यांतलें मर्म मी चांगल्या तऱ्हेनें जाणतों आहें. जें व्हायचें होतें तें होऊन चुकलें आहे. आतां त्याला कांहीं उपाय नाहीं. राणाजीशिवाय माझ्याबरोबर भोजन करणारा दुसरा कोण आहे? " मानसिंहाचा हा निरोप तत्काळ प्रतापसिंहाला कळविण्यांत आला. ' जोंपर्यंत राणा प्रताप माझ्यापंक्तीला बसून भोजन करणार नाहींत तोंपर्यंत मीहि येथें भोजन करणार नाहीं ' अशा अटीतटीनें मानसिंह स्वस्थ बसला.

भोजनास न येण्याचें कारण छपवून ठेवणें प्रतापसिंहास अनुचित वाटल्यामुळें, त्यानें असा स्पष्ट जबाब धाडला कीं, " ज्या राजपुत्रानें आपली मुलगी (बहीण) तुर्काला विकली आहे आणित्यामुळें साहजिकपणेंच तिचे खाण्यापिण्यादि सर्व व्यवहार त्याच्या बरोबर होताहेत, अशाच्या बरोबर राण्यानें भोजन करणें अशक्य आहे. "

आतां मात्र मानसिंहाला आपली चूक अशी आढळून आली कीं, आपण अनिमंत्रित असें येथें पाहुणे आलों ही गोष्ट चुकीची झाली. हा जो आपला अपमान झाला आहे, तो आपल्याच चुकीचा परिणाम आहे. असो. असा विचार त्याच्या मनांत येऊन, त्यानें एकहि घांस न घेतां, फक्त पांचचार दाणे—अन्न देवतेचा अपमान होऊं नये म्हणून—घेऊन पागोट्यांत ठेवून दिले व जातांना राणा प्रतापाला असें सांगण्यास सांगितलें कीं, " आपल्या मानमर्यादेचें रक्षण करण्यासाठींच मी आपली सर्वप्रतिष्ठा आणि गौरव यांना धुळींत मिळविलें आहे ! आपली इच्छा जर सदैव दुःखसागरांत गटंगळ्या खात पडण्याची असेल, तर खुशाल पडा. आपल्याला आतां मेवाड नेहमींचेंच सोडावें लागेल. यापुढें आपणांस मेवाडची एक वीटभरही जमीन मिळणार नाहीं ! " इतकें सांगून मानसिंह घोड्यावर जों बसणार, तोंच तेथें प्रतापसिंह एकदम आलेला पाहून मानसिंह त्याला मोठ्या अभिमानानें म्हणाला " मी जर तुमच्या दर्पाची नांगी मोडली नाहीं, तर नांवाचा मानसिंहच नव्हे ! " प्रतापसिंह त्यावर शांतपणें म्हणाला " आपल्याला युद्धक्षेत्रांत पाहूनच मला आनंद वाटेल ! " जवळच उभ्या असलेल्या एका सरदारानें प्रतापसिंहाचें हें भाषण ऐकून, मानसिंहास म्हटलें " आपल्याबरोबर आपला मेहुणा (सासरा ?) अकबर यालाही रणांगणांत घेऊन यावें ! " हें ऐकून मानसिंह सक्रोध होऊन घोड्यावर बसला व आपला सर्व राग त्यानें त्या घोड्यावर काढला. त्या बिचाऱ्या

महाराणा प्रतापसिंह.



यवनांच्या दास्यत्वाबद्दल मानसिंहाचा प्रतापसिंह धिःकार करीत आहे.

[पृष्ठ संख्या–९६

घोड्याला त्यानें जोराची एक टांच मारल्याबरोबर, तो आपल्या मालकाला घेऊन हवेच्या वेगानें हां हां म्हणतां तेथील मंडळीच्या दृष्टीपुढून नाहींसा झाला.

मानसिंहाला मेजवानी देण्याचा समारंभ ज्या ठिकाणीं केला होता, तें स्थळ भागीरथीच्या पवित्रोदकानें स्वच्छ धुण्यांत आलें. मानसिंहाचें कुलकलंकी मुख ज्यांनीं ज्यांनीं म्हणून पाहिलें होतें, त्या सर्वांनीं भागीरथीचीं स्नानें केलीं व जानवीं बदललीं.

मानसिंह उदयसागरवरून गेल्यानंतर, तेथें जीं भाषणें झालीं तीं सर्व मानसिंहाला समजल्यावर, तीं अकबराच्याही कानावर सहज गेलीं. राजा मानसिंहानें आपल्या रंगदार भाषणांत मीठमसाला पेरून, अकबराचे कान चांगलेच भारले. अपमानाच्या क्रोधानें अकबर लाल बुंद झाला. जो [1] अकबर एकेकाळीं राजा मानसिंहाला लाडवांत वीष घालून ठार मारण्यास उद्युक्त झाला होता, तोच आतां मानसिंहासाठीं प्रातापला मारण्यास सज्ज झाला!

---

१ बुंदी येथील कागदपत्रांवरून असें समजतें कीं, मानसिंह जेव्हां आपला भाचा (नातु ?) खुशरू यास दिल्लीच्या तख्तावर बसविण्याची खटपट करीत होता, त्यावेळीं अकबरानें त्याला ठार मारण्यासाठीं विषाचे लाडू बनविलें होते. Tods Rajasthan, Vol II.

परिच्छेद आकरावा.

रणचण्डीचा थैथयाट !

महाप्रलयमारुत क्षुभितपुष्करावर्तक ।
प्रचण्डघनगर्जित प्रतिरुथानुकारी मुहुः ॥
रवश्रवणभैरवस्थगित रोधसी कंदरः ।
कुतोद्य समरोधेरयमभूतपूर्वः परः ॥ —वेणीसंहार.

बिभीषण जर श्रीरामचन्द्राला येऊन मिळाला नसता व त्यानें जर गृहभेद केला नसता, तर रावणाच्या लंकेचा नाश झालाच असतां असें म्हणणें धाडसाचें झालें असतें; श्रीरामाचें नशीब त्या वेळीं थोर होतें म्हणूनच त्याला जशी यशःप्राप्ति झाली, तद्वतच या वेळीं अकबराची स्थिति झाली होती. त्याच्या नशीबाचा तारा मध्यावर चमकत होता! एकापेक्षां एक थोर पुरुष त्याच्या दरबारांत होते, त्यामुळें त्याला गृहभेद सहजीं समजत होता. भाऊबंदकीची फूट जेथें घुसते, तेथें ती डाकिनीसारखी सत्यनाश उडवते. वाचकहो, हृदय शांत करून सांगा कीं, त्या चांडाळणीनें काय बरें केलें नाहीं ? हे चांडळणी भाऊबंदकी, तूं खरी पिशाचिनी आहेस! तुला कोणच्या कोणच्या म्हणून संबोधनांनीं संबोधावें ? या जगतांत तूं काय म्हणून करायाचें बाकी ठेविलें आहेस? तूं मंथरेच्या रूपानें कैकेईराणीला बिघडवून श्रीरामाला वनवास भोगायला लावलेंस! तूं बिभीषणांच्या हृदयांत प्रवेश करून सुवर्णाच्या लंकेची राखरांगोळी उडवलीस! तूं दुष्ट दुराचारी दुर्योधनाचें रूप धरून या स्वर्गतुल्य भरतभूमीला स्मशानाचें रूप दिलेंस ?

पामर जयचंद्राचा वेष घेऊन रत्नगर्भा भारतमातेचे हातपाय परकीयांच्या शृंखलांनीं जखडबंद करून टाकलेस आणि आतां तूं—शक्तसिंह, सागरजी वगैरेंचीं रूपे धारण करून, दिल्लीश्वराच्या दरबारी लोकांकडून मेवाडचा सत्यनाश करायला तयार झाली आहेस ! तेव्हां आतां तुला कोणच्या बरें नांवानें संबोधावें ? हे पिशाचिनी, तुझ्या कपटनीतीपासून कोणाचाही बचाव होणें शक्य नाहीं. ज्यानें एकदां तुझ्या विषकुंभाच्या पयोमुखोपम फळाची गोडी घेतली तो तुझ्यावरचें प्रेम कधींच सोडीत नाहीं. तूं त्याला सर्पिणीप्रमाणें डसतेस ! अग चांडाळणी, या वृद्ध भारतमातेवरचें तुझें तें भयंकर अज्ञानाचें आणि भीतीचें वादळ आतां झटपट आवरून टाक ! बस्स ! पुरे झाला तो आतां तुझा हिडिस खेळ !

राजा मानसिंहाचा जो अपमान झाला तेवढें निमित्त अकबराला पुरेसें झालें. धुमसत असलेल्या क्रोधाग्नींत, ती एक तेलाची धारच जणूं काय धरली गेली. प्रतापसिंहानें आपलें स्वामित्व स्वीकारावें अशी अकबराची फार दिवसांची इच्छा होती. तो संधीच साधीत होता. मानसिंहाच्या अपमानाचें आयतेंच ताट त्याच्यापुढें वाढून आलें. आपला मेहुणा जो मानसिंह, त्याचा जो अपमान तोच आपला असें तो समजला. क्रोधाविष्ट झालेला सर्प जसे फूत्कार करीत सुटतो, तद्वत अकबर क्रोधांध होऊन, त्यानें आपल्या सरदारांना मेवाडवर चाल करून जाण्यास उत्तेजित केलें. दुर्दैवानें त्यावेळीं, प्रतापसिंहाचा धाकटा भाऊ शक्तसिंह आणि सावत्र भाऊ सागर हे अकबराच्या दरबारीं

अजमीर वगैरे स्थानांकडून मोंगल सेना याच रस्त्यानें आपल्यावर चाल करून येईल असा विचार करून, तिला रोखण्यासाठीं आपली सेना घेऊन प्रतापसिंह तिकडेच निघाला. हळदीघांटाच्या आसमंताद्भागांतून बावीस हजार रजपूत वीर बहाद्दर, मातृभूमीच्या रक्षणार्थ आपल्या रक्ताचें तर्पण करण्यासाठीं प्रतापसिंहाच्या राष्ट्रीय झेंड्याखालीं एकत्र जमले होते.

रजपुतान्याच्या त्या कठीण पहाडी प्रदेशांत, भिल्ल वगैरे बऱ्याच रानटी जाती वस्ति करून होत्या. भिल्ल हे रजपुतान्यांतले मूळचे रहिवाशी होत. रजपुतान्यांत इतर भागापेक्षां मेवाड प्रांतांतच भिल्लांची वस्ति अधिक आहे. भिल्लांना पाहाडी प्रदेशांत हांकून लावून, रजपुतांनीं त्यांच्या जागीं आपलें स्वामित्व बसविलेलें आहे. “ सब से भले मूढ, जिन्हें न व्यापै जगत गति ” अशी जी म्हण आहे ती जरी त्या भिल्लांना लागू पडते, तरी ते रानटी असतांहि प्रतापसिंहावर त्यांचें निष्कपट प्रेम अढळ होतें. त्यांची भक्ति, भव्य समाजापुढें घसा फोडफोडून वक्तृत्व करणें किंवा वर्तमानपत्रांतून जोमदार लेख खरडणाऱ्या अलीकडील राष्ट्रभक्तांप्रमाणें नव्हती. महाराण्यावर विपत्ति आल्याबरोबर आपली राजभक्ति व देशभक्ति यांचा त्यांनीं असा अनुपम परिचय करून दिला कीं, इतरत्र तसा आढळणें अशक्य आहे. ते भिल्ल अद्यापीहि त्या प्रांतांत स्वातंत्र्याच्या शान्तींत सुखानें नांदत आहेत, असेंच कोणालहि अढळेल.

याच भिल्लांनीं प्रतापसिंहाला यापूर्वी अनेक संकटांत मदत केली होती. ज्यावेळीं बावीस हजार कडवे रजपूत वीरपट्ठे प्रतापाच्या झेंड्याखालीं जन्मभूमीच्या गौरवाचें रक्षण करण्यासाठीं एकत्र झाले होते, त्यावेळीं भिल्ल मर्दांनींहि प्रतापाला साहाय्य केलें होतें. देशभक्तीचा डांगोरा पिटणाऱ्यांनीं जर स्वच्छ नेत्र उघडून, मागल्या प्रतापाच्या काळाकडे नजर फेंकली, तर त्यांना असें आढळून येईल कीं, ते जंगली–रानटी भिल्ल, आपापले तिरकमटे घेऊन, प्रतापाच्या झेंड्याखालीं राजसेवा करण्यास आनंदानें जमले आहेत. आपल्या महाराणा प्रतापसिंहाची प्रतिज्ञा पूर्ण करण्यास, त्याला मदत करण्यासाठीं सभोंवारच्या सर्व प्रांतांतून भिल्ल तेथें येऊन, भोंवतालच्या पहाडांवरून पांगून शत्रूची वाट पहात बसले आहेत. त्यांनीं मोंगल सेनेवर फेकण्याकरितां आपापल्याजवळ दगडांच्या राशीं केल्या होत्या.

मेवाडचा गौरव आणि प्रतापाचें स्वातंत्र्य यांनां नष्ट करण्यासाठीं बादशाही सेना निघाली. अकबराचा युद्धमंत्री मानसिंह, प्रतापसिंहाचा धाकटा भाऊ शक्तसिंह, त्याचा सावत्र भाऊ सागर, सागराचा मुलगा महाबतखां वगैरे सरदारांबरोबर अकबरानें प्रचंड सेना दिली व त्या सेनेचें सैनापत्य युवराज सलीम याजला[१] देण्यांत आलें. ग्रीष्मऋतूच्या प्रारंभीं बादशाही सेना मेवाडवर स्वारी करण्या-

---

१ या युद्धावर सलीम गेला होता किंवा नाहीं याबद्दल संदेह आहे. मुसलमानांच्या इतिहासाचा प्रसिद्ध ज्ञाता जोधपुरचा मुन्सी

साठीं निघाली. मोंगलसेना प्रतापाच्या सेनेपेक्षां पुष्कळच अधिक होती. मोंगलसेनापतीनें आपली सेना किती आहे याचा अंदाज लागूं नये म्हणून, सुरवातीलाच चलाखी करून, ती सर्वत्र पसरून टाकली; पण या युक्तीचा कांहीं उपयोग झाला नाहीं. मोंगलसेना आल्याची प्रतापच्या हेरांनीं बातमी दिली. मोंगलसेनापतीची अशी कल्पना होती कीं,

---

देवीप्रसाद म्हणतो कीं, " त्यावेळीं सलीम हा केवळ सहा वर्षांचा होता. यास्तव तो बादशाही सेनेचा अधिपति होऊन मेवाडवर जाणें अशक्य आहे. " राजस्थानचा इतिहासलेखक तुहफ्ए हाही असेंच म्हणतो. युवराज सलीमचा जन्म १५६९ मध्यें जोधपुरच्या राजकुमारीच्या पोटीं झाला. या हिशेबावरून हळदीघांटाच्या युद्धाच्या वेळीं म्हणजे संवत १६३२ अर्थात सन १५७६ मध्यें सलीमचें वय आठ वर्षांचें असलें पाहिजे; असें असतां कर्नल टॉड यानें हळदीघांटाच्या लढाईत सलीम सेनापती होता असें लिहिलें आहे. यावरून असें वाटतें कीं, हळदीघांटाच्या युद्धाचें श्रेय सलीमला देण्यासाठीं त्याला उगीच नांवाचें सेनापत्य देऊन धाडला असावा. या युद्धानंतर पुन्हां दहापंधरा वर्षांनीं जें प्रतापसिंहाशीं युद्ध झालें त्यांत कदाचित सलीम सेनापति असण्याचा संभव आहे. ' आईनें अकबरी ' वगैरे ग्रंथांत या गोष्टींचा कांहींच उल्लेख नाहीं. निजामीकृत ' तबकाते अकबरी ' आणि बदाऊनीकृत ' मुन्तखबुतारीख ' या ग्रंथांत मानसिंह हा सेनापती होता. असें

पहाडांचा आश्रय सोडून प्रतापसिंह मोकळ्या मैदानावर येईल; पण रणपंडित आणि स्वदेशभक्त प्रतापानें तसें केलें नाहीं. प्रतापसिंह खुल्या मैदानांत येत नाहीं असें जेव्हां मोंगलसेनापतीस दिसून आलें, तेव्हां तो पहाडांतच त्याच्याशीं युद्ध देण्यास निघाला.

श्रावणशुद्ध सप्तमीस रणचण्डीच्या विकट हास्यलास्याची सुरवात झाली. हळदीघांटाच्या पवित्र रणक्षेत्रावर—स्वदेश व स्वातंत्र्य यांसाठीं रजपूतवीरांच्या रक्ताच्या नद्या वाहूं लागल्या. आपल्या जन्मभूमीच्या रक्षणासाठीं देशभक्त रजपूतवीर आपलें रक्त सांडूनच राहिले नाहींत, तर त्यांनींहि शत्रूचे अनेक लोक ठार करून, हळदीघांटाचें युद्ध सामान्य नसून मोठें बिकट आहे असें सिद्ध केलें. स्वदेशरक्षणाच्या बावतींत एक ग्रीस देश सोडून, इतरत्र कोठें असें घनघोर युद्ध झालें असेल, असें वाटत नाहीं. मोंगलांची प्रचंड सेना एकीकडून पुढें

म्हटलें आहे. त्यांत सलीमचें नांवहि कोठें नाहीं. Badauni Vol. II. P. 228. Elliols's History Vol. P. 397. Elphinstone P. 506 बदाऊनी हा स्वतः रणभूमीवर हजर होता. त्यानें या युद्धाचें प्रस्तृत वर्णन लिहिलें आहे. यानें असें लिहिलें आहे कीं, मानसिंहानें विजयाची बातमी अकबराला लिहिली. अकबरानें मानसिंह व त्याचे सरदार यांस इनामें, बक्षीसें वगैरे दिलीं. बदाऊनीच्या विवरणांतहि सलीमचें नांव नाहीं.

जात असतां, तिला आडवण्यासाठीं दुसरीकडून महाबली रजपूत सेना पुढें चालू लागली. जणूं काय दोन मत्तहत्तींची झुंजच सुरू झाली. त्या कठिण घांटांत सेनेला मार्ग मिळणें जेथें अवघड होतें, अशा ठिकाणीं हजारों मुसलमान व हिंदु, एकमेकांना मारण्यासाठीं छाती काढून उभे होते. सर्वत्र नरमुंडें आणि कबंधें पडलेलीं दिसत होतीं !

वाचकहो, हें युद्ध किती भयंकर झालें असेल, तें एकदां आपल्याच कल्पनाशक्तीनें पाहा. तुफान होण्याच्या आधीं जसा समुद्र—शांत, निश्चल व गंभीर असतो, पण तुफान आल्याबरोबर ती त्याची वृत्ति जाऊन, तो जसा भयंकर प्रलयकालचें रूप धारण करून प्रचंड लाटांच्या गर्जनांनीं आकाशाला खालीं पाडण्यास धांवतो, तद्वतच त्या दोन्ही सेनांची स्थिति झाली. प्रथम दोहोंबाजूंचे वीर स्वस्थ होते; पण जेव्हां रणवाद्यांचे गंभीर आणि उन्मत्त घोष कर्णरंध्रांत घुसूं लागले, तेव्हां पहाडांतले वनचर, पक्षी वगैरे सर्व क्रोधायमान झाले. मेघांच्या गडगडाटांशीं स्पर्धा करणारे रणभेरींचे आवाज ऐकतांच—हत्ती, घोडे, पायदळ, स्वार वगैरे सर्व युद्धासाठीं उन्मत्त झालीं ! दोन्हीं दळें परस्परांवर तुटून पडलीं. मुसलमानी सैन्य "**दीन दीन जिहाद**" असा घोष करूं लागली, व रजपूतसेना "**हर हर महादेव**" अशी गर्जना करूं लागली. त्या गर्जनांचे प्रतिध्वनि आकाशांत उठत होते. क्षुधेनें पीडलेला सिंह जसा हरणांच्या कळपावर वेगानें धावून जातो, तसे रजपूत वीरवर मोंगलांच्या सेनेवर नेमके तुटून पडले. रजपुतांचें साहस, बल आणि आत्मत्याग हीं पाहून मोंगलसेना चकित झाली. मेवाडच्या

स्वातंत्र्यरक्षणासाठीं रजपुतांनीं आपले प्राण पणाला लावून बेहद्द युद्ध केलें! वीरश्रेष्ठ प्रतापसिंहहि निश्चिंत नव्हता. तो निधड्या छातीनें सर्वांच्यापुढें होऊन, शत्रूसेना निर्बल करण्याचें काम त्यानें चालविलें होतें व त्यांत त्याला यशहि आलें. त्यानें आपल्या असामान्य साहसानें मोंगलांच्या सेनेचा चक्रव्यूह फोडून टाकला. प्रतापाचें हें साहस व युद्ध-कौशल्य पाहून, रजपूत वीर अधिक उत्साहानें लढूं लागले. भुकेलेला सिंह जसा मत्त हत्तींचीं गंडस्थळें भराभर विदीर्ण करीत सुटतो, तद्वत एकट्या प्रतापानें यवनांच्या सेनेचे हजारों मुडदे आपल्या तरवारीनें लोळविले! राजा मानसिंहाला त्यानें जें सांगितलें होतें कीं, " **मी आपल्याला युद्धभूमीवर पाहून सुप्रसन्न होईन !** " त्याप्रमाणें तो त्या रणक्षेत्रांत मानसिंहाचा शोध करूं लागला; पण तो त्याला सांपडला नाहीं. प्रतापाच्या रौद्रमूर्तीला पाहून, तो भीतिग्रस्त झाल्या-मुळें आपल्या सैनीकांच्या गराड्यांत अगदीं गुप्तपणें छपून राहिला होता. प्रतापसिंह मानसिंहाचा शोध काढीत व आपला रस्ता काटीत जरी मोंगल सेनेच्या मध्यभागापर्यंत जाऊन पोंचला होता, तरी रज-पूत सेना कांहीं निश्चिंत राहिली नव्हती. तिनें आपल्या प्राणांची बाजी लावून, महाराण्याचें संरक्षण केलें. महाराण्याच्या संरक्षणार्थ शेंकडों रजपुतांनीं आपले प्राण विसर्जित केले. भिल्ल लोकांनींहि झाडांचा आश्रय करून, आपल्या बाणांनीं व गोफणगुंड्यांनीं हजारों यावनी सैनि-कांच्या मस्तकांचा चकणाचूर उडवला. अशा तऱ्हेचें तें दोहोंबाजूंच्या वीरांत—असामान्य व भीषण युद्ध झालें.

परिच्छेद बारावा.

झयाला सरदाराचा आत्मयज्ञ !

मित्र परिच्छहु मैं कियो सरनागत प्रतिपाल ।
निरमल जल शिवि सो लियो तुम या काल कराल ॥

—हरिचंद्र.

मानासिंहाला शोधून काढण्याचा दोन वेळ जरी प्रतापानें उद्योग केला तरी तो त्याला सांपडला नाहीं आणि म्हणूनच तो या वेळीं पुन्हा मत्त–सिंहाप्रमाणें चवताळून जाऊन, त्या देशद्रोही कुलकलंक्याला रणक्षेत्रांतून हुडकून काढण्याचा ज्यारीनें प्रयत्न करीत होता, या वेळीं प्रताप आपल्या चेतक नांवाच्या घोड्यावर स्वार झालेला होता व तो घोडा त्याला योग्य असाच होता. तो आपल्या धन्याप्रमाणेंच वीर होता. प्रताप-प्रमाणेंच त्याचा तो घोडा रणनिपुण होता. अशा त्या घोड्यावर बसून, राजा मानसिंहाचा शोध वीरवर प्रतापसिंह मोठ्या जारीनें करीत होता. लहान मुलें मातींत खेळत असतां, तीं जशीं मातिची उधळा-उधळी करतात, तसाच प्रतापसिंह मानसिंहाचा शोध शत्रूसैन्यांत करीत वेगानें फिरत असतां, मोंगल सेनेचे आपल्या तलवारीनें तुकडे उडवीत होता. त्याची रणदक्षता पाहून, मोंगल सेना जरी हटली, तरी मानसिंह त्याला सांपडला नाहीं. प्रतापाला आपल्या मध्यें घुसलेला

पाहून, त्याला ठार करण्याचा मोंगल सेना प्रयत्न करीत असतां, प्रतापाचे देहरक्षक एकामागून एकेक जरी धारातीर्थी पडले, तरी त्याची त्यानें पर्वा केली नाहीं. तो एकटाच मोंगलवीरांशीं सामना करीत होता व देशद्रोही मानसिंहाला हुडकीत होता.

मानसिंहाचा तर पत्ता लागला नाहींच; पण समोरच्या हत्तीवर अकबराचा मुलगा सलीम बसलेला होता, तो प्रतापाच्या दृष्टीस पडला. 'मानसिंह नाहीं सांपडला तर नाहीं सलीमचं कां होईना' असा मनांत विचार करून, प्रतापानें आपल्या घोड्याला एक टांच दिली व त्याबरोबर तो आपल्या धन्याच्या इशाऱ्यासारखा पुढें वेगानें धांवला. त्याला पुढें सरसावलेला बघतांच, युवराजाच्या संरक्षणासाठीं चहूंबाजूनें मोंगलसेना धांवली व तिनें प्रतापावर हल्ला केला. तें त्या सेनेचें प्रतापावरील आक्रमण त्याच्या शौर्यानें फिकें पाडलें. प्रतापाला त्याचें कांहींच वाटलें नाहीं. स्वदेशाच्या स्वातंत्र्यरक्षणाच्या युद्धांत प्राणत्याग हा त्याचा सिद्धांतच होऊन बसला होता ! प्रतापानें दुरून नेम धरून, आपली बरची सलीमवर फेंकली, पण ती चुकून लोखंडी हौद्यावर अदळलेली जेव्हां त्यानें पाहिलें तेव्हां त्यानें आपला घोडा पुढें फेंकला. घोड्यानें आपले पुढले दोन पाय हत्तीच्या दोन दांतांवर टेंकून मागील पायांवर तो उभा राहिला. ऐरावतप्रमाणें भासणाऱ्या त्या महागजाच्या दांतांवर उच्चैश्रव्याप्रमाणें चेतकाचे पाय त्यावेळीं शोभले. अशा तऱ्हेची प्रतापाची रणनिपुणता पाहून, अल्पकाळ वीरगण जागच्याजागीं थक्क झाला

व शत्रू त्याच्या त्या साहसाची प्रशंसा करूं लागले. तशा स्थितींत एक मुहूर्तमात्रापेक्षां प्रतापाला तेथें अधिक वेळ राहणें धोक्याचें होतें. घोड्यानें नंतर हत्तीच्या मस्तकावर पाय देतांच, प्रतापानें आपल्या समशेरीचा वार सलीमवर म्हणून जो केला, तो पुन्हां बर्चीप्रमाणेंच हौद्यावर व महातावर बसला. महात खालीं पडला व महाताशिवायच हत्ती सलीमला घेऊन पळून गेला. त्यावेळीं हत्ती जर पळाला नसता, तर अकबराचा नेत्रदीप खात्रीनें तेथेंच विझण्याची वेळ आली होती. सलीमचें रक्षण त्यावेळीं देवानेंच केलें यांत संशय नाहीं.

सलीमवर अशा तऱ्हेची आलेली आपत्ति पाहून, मोंगलसेना अगदीं वेडावून जाऊन, तिनें प्रतापाला ठार मारण्याच्या उद्देशानें, मोठ्या त्वेषानें त्याच्या भोंवती गराडा घातला. प्रतापानें भीमविक्रमानें अनेक सैनिकांना ठार करून जमीनदोस्त केले, तरी एकट्या प्रतापाला पाहून, मोंगलसेनेचा दम खचला नाहीं. समुद्राची लाट पर्वतावर टक्कर खाऊन, जशी पुन्हां परत फिरते व पुन्हां माघारी जोरानें येऊन आदळते, त्याप्रमाणें मोंगलसेना प्रतापावर जोराजोरानें जाऊन आदळूं लागल्या. प्रताप एकटा व मोंगलसेना हजारांनीं मोजतां येण्याजोगीं. केवढें तें भयंकर युद्ध ! आतां प्रतापाचें रक्षण कोण करणार ? ह्या चिंतेनें सर्व लोक घाबरून गेले. तितक्यांत प्रतापाला तीन बरचीचे समशेरीचे वार लागून, एक बंदुकीची गोळीहि लागली. इतक्यांत

' जय प्रतापकी जय ' असा शब्द कानावर पडला. हे शब्द ऐकतांच प्रताप अधिक उत्साहानें लढूं लागला ! इतक्यांत झावडीचा झ्याला सरदार मन्ना हा प्रतापसिंहापाशीं लढत लढत येऊन पोंचला. प्रतापावरचें राजछत्र आणि चवरी त्यानें काढून घेंऊन तीं आपल्यावर धरवलीं, मोंगलसेनेनें झ्याल्याच्या मन्ना सरदारालाच प्रतापसिंह असें समजून ती खऱ्या प्रतापाला सोडून मन्नावर कोंसळली. झ्याला सरदार मन्ना यानें अनेक मोंगल कापून काढले व अखेरीस आपणहि शत्रूकडून कापला गेला; पण महाराणा प्रतापसिंहाचे प्राण त्यानें वांचविले. धन्य ! धन्य आहे त्या मन्ना सरदाराची ! अशा तऱ्हेच्या आत्मत्यागी सरदारांमुळेंच मेवाडच्या कीर्तीचें रक्षण तशा त्या भीषणकालीं होत होतें.

महाराणा प्रतापसिंह झ्याल्याच्या मन्ना सरदाराच्या आत्मयज्ञाला विसरला नाहीं. त्याच दिवशीं त्याच्या वंशधराला राजचिन्हांसह

---

१ अशा तऱ्हेचीं उदाहरणें भारतवर्षाच्या इतिहासांत अनेक सांपडतात. श्रीशिवकालीं सरदार बाजीप्रभु देशपांडे यानेंहि असेंच चमत्कारिक उदाहरण करून ठेवलें आहे. पन्हाळ्यावरून निघून शिवराज खेळणा किल्यावर जाऊन पोंचेपर्यंत, बाजीप्रभूनें आपल्या मूठभर मावळ्यांसह, पावन खिंडीच्या तोंडाशीं सिद्दीजोहाराच्या प्रचंड सेनेला थोपवून धरून, ठरल्याप्रमाणें खेळण्यावरून तोफांचे आवाज ऐकूं येईपर्यंत तो शत्रूशीं घायाळ स्थितींत लढत होता. तोफांचे आवाज ऐकल्याब-

महाराण्याच्या उजव्या हाताकडे बसण्याची, पुढें नगारा वाजवीत येण्या-जाण्याची आणि राजकीय झेंडा आपल्या ताब्यांत ठेवण्याची सनद करून देण्यांत येऊन सद्री देशांत जमीनहि बक्षीस देण्यांत आली.

रोबर, स्वामीकार्याची पूर्तता झाली, असे मनांत आणून, त्याच्या आत्म्यानें त्याच्या देहाला रणांगणांत काळनिद्रा घेण्यास ठेवून, आपण वीरगती स्वीकारली.

परिच्छेद तेरावा.

हा विजय कीं पराजय ?

मरना भला है उसका जो जीता है अपने लिये।
जीता है वह जो मर चुका स्वदेश के लिये॥

—भारतेन्दु.

मागील परिच्छेदांत वर्णन केलेल्या हळदीघाटाच्या लढाईंत बावीस हजार रजपूत शूर वीरांपैकीं चौदा हजार रजपूत योद्धे—स्वदेश-प्रीति, स्वराज्यप्रेम आणि स्वधर्मवात्सल्य—यांसाठीं धारातिर्थी कंठस्नानानें सुस्नात होऊन, वीरगतीला गेले. मातृभूमीचा लौकिक कायम राखण्यासाठीं त्या वीरांनीं, मोठ्या प्रेमानें प्रियकरणीस जसें दृढालिंगन द्यावें, त्याप्रमाणें मृत्यूला कवटाळिलें! महाराणा प्रतापाचे आत्मीय जनहि कमींत कमी पांचशें होते. ग्वाल्हेरचा राज्यच्युत राजासाहेब महाराण्याच्या आश्रयाला येऊन राहिला होता. तो व त्याचा मुलगा खंडेराव आणि तुमारवंशीय एक सरदार आपल्या बरोबरच्या तीनशें योध्यांसह मारले गेले. ह्यालाच सरदार मानसिंह आपल्या दीडशें रजपूत पठ्यांसह प्रतापाचें रक्षण करतां करतां ठार झाला! अशा तऱ्हेनें आणखीहि बरेच योद्धे मारले गेलेले प्रतापानें ज्या वेळीं पाहिले, ती

वेळ सायंकाळची होती. अशा त्या वेळीं त्यानें युद्धासंबंधानें जी कांहीं व्यवस्था करायची होती, त्याबद्दलचे हुकूम देऊन, दुःखितान्तःकरणानें तो युद्धभूमींतून परतला. हळदीघांटाचें युद्ध समाप्त झालें. मानसिंहाची मनोकामना पूर्ण झाली.

वाचकहो, आतां विचार करा ! या युद्धांत प्रतापाचा हा विजय झाला कीं पराजय ? प्रतापाचे योद्धे फार मारले गेले ही गोष्ट सत्य आहे व मोंगल सेना रणांगणांतून हटली नाहीं, हेंहि पण खरें आहे. प्रताप जरी रणांगणांतून परतला, तरी आमची समज अशी आहे कीं, प्रतापाचा पराजय झाला नाहीं त्याचा चिरस्मरणीय असा विजयच झाला ! तो कसा ? म्हणून आपण विचाराल, तर ऐका ! मोंगल सम्राट आपल्या मोंगली सेनेसह आपल्या राज्याचा विस्तार करण्यासाठीं लढत होता, पण राणा प्रताप व त्याचे रजपूत वीर, हे आपल्या जन्मभूमातेच्या लौकिकाच्या रक्षणार्थ आणि स्वजातीयांच्या स्वातंत्र्यार्थ लढत होते. रजपुतांची लढाई सिद्धान्तविषयक होती आणि मोंगलांची स्वार्थ साधण्यासाठीं होती. जे सिद्धान्तविषयक स्वभूमीची मानमर्यादा आणि कीर्ति यांसाठीं लढतात, ते जयापजयांची कधींहि तमा धरीत नसतात. त्यांचा पराजय लाखों जयांपेक्षां अधिक मौल्यवान् असतो. त्यांचा पराजय जर जयावर मात करणारा नसता, तर आज तशा वंदनीय वीरांचें कोणी स्मरणहि केलें नसतें ! त्यांचा पराजय मानवी हृदयावर परिणाम घडवून आणणारा जर नसता तर ते कधींच

वंदनीय आणि पूजनीय झाले नसते. अशा पराजयांत जर जयापेक्षां कांहीं अधिक शक्ति आहे, तर आम्ही त्याला पराजय हें नांव कसें द्यावें ? हळदीघांटाच्या महान् रणधुमाळींत, मोंगल सैन्याला आपल्या अतुल पराक्रमाची थोरवी दाखवून, रजपूत वीर क्षणमात्र म्हटले हें खरें, पण त्यायोगें ते प्रलयकालपर्यंत जनमनांतील सिंहासनावरून कधींच पदच्युत होणें शक्य नाहीं. त्यांची कीर्ति चिरंजीवी झालेली आहे! ध्यानांत ठेवा कीं, कीर्तिवर्धन आणि चिरंजीवित्व हीं दोन्हीं जरीं विजयाचीं चिन्हें असलीं, तरी रजपूत पराजित झाले असें म्हणतां येणार नाहीं! रजपुतांचा विजयच झाला! हळदीघांटाच्या युद्धासारख्या युद्धांतील पराजयासारखा पराजय—हा पराजय असा गणला जात नाहीं! तो पराजय विजयाहून श्रेष्ठ मानला गेला आहे! असें नसतें तर ग्रीसच्या थर्मापिलीच्या संकीर्ण पार्वतीय घांटांत लिओनेडाज यानें, पारसिकांच्या राजाच्या आफाट सेनासागराच्या प्रवेशद्वारापाशीं येऊन, जो आत्मबलि दिला, त्याच्या कीर्तिकथेचें लेखन इतिहासकारांनीं करायचें कधींच सोडून दिलें असतें. थर्मापिलीप्रमाणेंच हळदीघांटांत चौदा हजार रणशूर रजपूत, जन्मभूमीच्या वात्सल्यानें लढून धारातीर्थीं सुस्नात झाले व त्यांनीं आपली कीर्ति अमर केली! तर मग आतां रजपुतांचा या युद्धांत पराजय झाला असें कसें म्हणतां येईल बरें?

परिच्छेद चौदावा.

बन्धु-मीलन !

किं मे भ्रातृ विहीनस्य स्वर्गेण सुरसत्तमा ।
यत्र मे मम स स्वर्गो नायं स्वर्गो मयो मम ॥

—महाभारत.

महाभारतांत अशी एक कथा आहे कीं, युद्धसमाप्तीनंतर व राज्यसूत्रें खालीं ठेवल्यानंतर, धर्मराज युधिष्ठिर जेव्हां स्वर्गांत गेले तेव्हां तेथें त्यांचे बंधु व द्रौपदी त्यांना न दिसल्यामुळें ते असें म्हणाले कीं, **" जेथें माझे बन्धु व द्रौपदी नाहींत असा स्वर्ग मला नको. बंधुपत्निविरहित असा स्वर्ग मला नरकासमान आहे व ज्या नरकांत माझीं बंन्धुपत्नि आहेत, तो नरक मला स्वर्गापेक्षांहि अधिक श्रेष्ठ आहे ! "** याचें नांव खरें बन्धुप्रेम ! भारतवर्षाच्या दुर्भाग्यानें भावाभावांमधल्या पारस्परिक निर्मल व शुद्ध अशा प्रेमाचा गंगौघ आजकाल पार अटून गेला आहे ! तो प्रेमौघ जर सुकला नसता, तर सद्यःकालप्रमाणें हा देश अधोगतीला कधींच गेला नसता ! भावाभावांच्या प्रेमाच्या अखंड साम्राज्याचा एक काळ भारतवर्षांत होता; पण ती गोष्ट फार जुनी असल्यामुळें,

आज नष्टदशेला गेली आहे ! असें पाहाण्यांत आलें आहे कीं, भावा-भावांत जरी प्रेम नसलें, तरी जर कोणावर आपत्ति आली, तर त्याचा रक्तप्रभाव दुसऱ्या भावावर झाल्याशिवाय राहात नाहीं. अशाच प्रकारचें एक उदाहरण या हळदीघांटाच्या युद्धांत घडून आलें होतें.

रणमैदान सोडून, प्रताप आपल्या चेतक नांवाच्या घोड्यावर बसून, एकटाच चालला होता. त्यावेळीं प्रताप अतिशय थकला असून, रणांगणांतील जखमांनीं तो बराच घायाळहि झाला होता. त्याच्या प्याऱ्या चेतक घोड्याचीहि जरी तीच स्थिति झाली होती, तरी तो आपल्या धन्याला पाठीवर घेऊन, मोठ्या वेगानें चालला होता. प्रतापाला रणांगणांतून परततांना पाहून, दोन मोंगल स्वारांनीं त्याचा पाठलाग चालविला होता. त्या दोघांपैकीं एकाचें नांव खुरासानी असें असून, दुसऱ्याचें नांव मुलतानी असें होतें. सर्व दिवसभर झालेल्या युद्धाच्या श्रमानें, आधींच प्रताप अत्यंत थकून गेला होता आणि त्यांतच स्वदेशाबद्दलच्या चिंतेच्या ध्यासानें त्याचें मन व्यग्र होऊन तो दुःखसागरांत बुडून गेला होता. तो स्वतांशींच विचार करीत घोड्यावरून जात असतां, त्याच्या मागें जे स्वार त्याचा पाठलाग करीत दौडत येत होते, त्यांची त्याला दादहि लागली नव्हती. प्रताप ज्या मार्गानें जात होता, त्या मार्गांत मध्येंच जरी एक विस्तृत नाला होता, तरी चेतक आपल्या धन्याला घेऊन तो नाला पार कुदून गेला. मोंगली स्वारांचे घोडे नाल्याच्या कांठाशींच थबकले; इतक्यांत प्रतापाच्या कांनीं त्याच्या देशी भाषे-

तले 'हो नीला घोड्यावर सवार हो' असे शब्द पडले. हे शब्द ऐकतांच, प्रतापानें मागें वळून पाहिलें, तों दोघां मुसलमान स्वारांना ठार करून, आपला भाऊ शक्तसिंह आपल्याचकडे घोड्यावर दौडत येत आहे, असें त्याच्या दृष्टीस पडलें. प्रताप धीरगंभीरभावानें उभा राहिला आणि मनांत म्हणाला "**मला ठार मारून, शक्तसिंह आपल्या प्रतिज्ञेंतून पार पडून लौकिक संपादून करण्या- साठींच इकडे येत असावा असें दिसतें! ठीक आहे! ये, शक्तसिंहा, ये! मला मारून आपली प्रतिज्ञा पूर्ण कर! रणांगणाला पाठ दाखवून, पळ काढणाऱ्या माझ्यासा- रख्या कुलकलंक नराधमाला हेंच शासन योग्य आहे!**"

पूर्वी शक्तसिंह आणि प्रताप यांच्यांत भांडण झाल्याचें आम- च्या वाचकांनीं वाचलेच आहे. त्यामुळेंच शक्तसिंह प्रतापाला सोडून अकबराला जाऊन मिळाला होता व यावेळीं तो मोंगल सेनेबरोबर हळदीघांटाच्या युद्धांत तेथें आलेला होता. त्यानें हळदीघांटाच्या युद्धांत आपल्या भावाचा पराक्रम पाहिला. अनेक रजपूत वीर स्वदेशासाठीं धारातीर्थीं सुस्नात होत असलेले त्यानें पाहिले. त्यानें आपल्या जातीच्या वीरांचें व प्रतापसिंहाचें स्वदेशप्रेम आणि वीरता हीं पाहिलीं होती. तें सर्व पाहून, त्याच्या ज्येष्ठ बंधूबद्दल त्याच्या हृदयांत वात्सल्य उत्पन्न झालें होतें. दोन मोंगल आपल्या ज्येष्ठ भ्रात्याचा घात करण्यासाठीं त्याच्या मागून दौडत जात असतांना जेव्हां त्यानें पाहिलें, तेव्हां पूर्वींचा

द्वेषभाव तो विसरून गेला आणि त्यानें त्यावेळीं धर्मराज युधिष्ठिराच्या नीतीचा अवलंब केला. चित्रसेन गंधर्वानें जेव्हां कौरवांना पकडलें, त्यावेळीं युधिष्ठिर जरी आपल्या भावांसह वनवासांत होता, तरी त्याला ती बातमी समजल्यावरोबर तो म्हणाला:—

ते शतं हि वयं पंच परस्पर विवादने ।
परैस्तु विग्रहे प्राप्ते वयं पंचाधिकं शतम् ॥

(आपसांत तंटा करायला कौरव शंभर व आम्ही पांच आहांत; पण दुसऱ्याशीं झगडण्यांची वेळ आली असतां, आम्ही एकशेंपांच आहोंत.)

मोंगल स्वार दौडत जातांना पाहून, शक्तसिंह मनांत म्हणाला **"ज्या प्रतापानें-रजपूत ज्ञाति आणि जन्मभूमी-यांच्या वात्सल्यानें मोंगलांशीं लढण्याची शिकस्त केली व त्या दोहोंना कलंक लागूं दिला नाहीं, त्या माझ्या ज्येष्ट भ्रात्याला ठार करायला हे मोंगलस्वार धावून जर जात आहेत, तर त्यांना ठार करणें हेंच यावेळीं माझें काम आहे!"** असा पोक्त विचार मनांत येतांच त्यानें आपलें धनुष्य खेचलें व त्यांतून दोन बाण सोडून, त्या दोघां स्वारांस ठार केलें आणि नंतर तो आपल्या ज्येष्ट भ्रात्यास-प्रतापसिंहास-जाऊन भेटला.

अहाहा! काय तो बहारीचा प्रसंग! ज्यांचे लहानपण प्रेमभावांत गेलें व जे त्या वयांत एकमेकांना कवटाळीत असत, तेच

प्रसंग या वेळीं पुन्हां आला. परस्परांच्या मनांतलें द्वेषविष अमृतमय झालें. शक्तसिंहानें आपल्या भावाच्या चरणकमलीं आपलें मस्तक ठेवून, मागील अपराध विसरून जाण्याची विनंति केली. त्यानें त्याची मागील अपराधांबद्दल क्षमा मागितली. प्रतापानें त्याला उठवून, सजल नयनांनीं प्रेमालिंगन दिलें. त्यावेळीं प्रताप हळदीघांटाचा पराजय विसरून गेला व त्यानें आपल्या भावाच्या हृदयसाम्राज्यावर जयप्राप्ति करून घेतली. त्याच्या हृदयांत त्या वेळीं अद्भुत आनंदाचा संचार झाला. जणूं काय, ती अनेक वर्षांची—भरत आणि राम—यांचीच भेट झाली होती !

पण काय ? तो आनंददायक वेळ, तें अपूर्व संमीलन, ती बन्धु भेट—फारवेळ टिकली नाहीं ! कारण, महाराणा प्रतापसिंहाचा घोडा चेतक, त्या दिवशीं युद्धांत अतिशय थकला होता. त्याच्या देहावर शस्त्रांचे बरेच आघातहि झालेले होते. ज्या वेळीं ते दोघे भाऊ आनंदसाम्राज्यांत एकमेकांना प्रेमालिंगनें देत होते, त्याचवेळीं तो घोडा आपल्या मालकाची संगति सोडून परलोकीं गेला होता. तें पाहून प्रतापाला अत्यन्त दुःख झालें. त्यानें अत्यन्त आक्रोश केला. जणूं काय त्याचा कोणी सख्खा नातलगच त्याला सोडून गेला आहे. त्या चेतकाचा मृत्यु ज्या ठिकाणीं झाला त्या स्थलाचें नांव, जारोली असें होतें. त्या ठिकाणीं चेतकाचें स्मारक म्हणून, एक वेदी तयार करवून त्यावर प्रतापानें चबुतरा बांधविला. त्यालाच 'चेतकाचा चबुतरा' असें

अद्यापि म्हणतात. असें सांगतात कीं, मेवाडांत जेथें जेथें म्हणून, प्रतापाची तसबीर आहे, तेथें तेथें त्या तसबिरीवर चेतकाचेंहि चित्र हुबेहुब काढलेलें आहे.

त्या ठिकाणीं शक्तसिंह एक घटकेपेक्षां जास्त वेळ राहूं शकला नाहीं. त्यानें आपला अंकारों नांवाचा घोडा, प्रतापाला दिला व तो त्यावर बसून चालता झाला आणि शक्तसिंह त्याला जातांना म्हणाला " पुन्हां लवकरच आपली भेट होईल. "

ज्या दोन स्वारांना शक्तसिंहानें ठार मारले होते, त्यांपैकीं खुरासनीच्या घोड्यावर तो स्वार होऊन परत आपल्या छावणींत गेल्यावर, युवराज सलीम यानें याला खुरासनीच्या घोड्यवर बसून येण्याचें कारण विचारलें. प्रथम शक्तसिंहानें खरा प्रकार काय होता तों सांगण्याची जरी टाळाटाळ केली, तरी सलीमनें सर्व आपराधांची क्षमा करण्याचें वचन दिल्यावर, त्यानें घडलेली सर्व हकीकत त्याला सांगितली व म्हटलें " युवराज, सर्व राज्याचा भार माझ्या वडील भावाच्या मस्तकावर आहे. त्याच्यावर विपत्तीचा पर्वत कोंसळत असतां, मी स्वस्थ बसावें, असें कसें होईल ? खुरासानी व मुलतानी या दोघांनांही मीं ठार मारले आहेत. माझ्या भावाचा घोडा मेल्यामुळें, मीं माझा घोडा त्याला देऊन, मी खुरासानीच्या घोड्यावर स्वार होऊन इकडे परत आलों आहें. "

हें ऐकून सलीम थोडा वेळ गप्प राहिला व त्यानें नंतर आपलें दिलेलें वचन आठवून म्हटलें :—" **ठीक आहे! तुमचा सर्व अपराध माफ केला आहे! मात्र तुम्हांला आजच्या आज मोंगलांची छावणी सोडून गेलें पाहिजे!** "

हें ऐकून शक्तसिंह प्रसन्नान्तःकरण होऊन, त्यानें तत्काल मोंगलांच्या छावणीचा त्याग केला. भावाशीं भांडण झाल्यामुळें, शक्तसिंह त्वेषानें निघून जाऊन अकबराला मिळाल्यानें जो त्याला देशद्रोहाचा कलंक लागला होता, तो बऱ्याच दिवसांनीं आज त्याला धुऊन टाकण्याचा प्रसंग, परमेश्वरानें आणून दिला. भेटीच्या प्रसंगीं भावाला कांहीं तरी नजराणा द्यावा अशा इच्छेनें त्यानें मैसरोड किल्यावर स्वारी करून, तो हस्तगत केला व आपल्या भावाला नजराणा म्हणून दिला. प्रतापसिंह आपल्या भावाच्या या वर्तणुकीवर प्रसन्न होऊन, त्यानें शक्तसिंहाला तेंच ठिकाण वंशपरंपरेनें उपभोगण्यास परत दिलें.

राजमातेचें शक्तसिंहावर पहिल्यापासूनच विशेष प्रेम होतें, यास्तव तीहि त्याच्याजवळ तेथें जाऊन राहिली. याचसाठीं शक्तसिंहाच्या वंशधर मातांस ' **बाईजी महाराज** ' असें म्हणण्याचा पडलेला प्रघात अद्यापि चालू आहे. शक्तसिंह परत येऊन, मिळाल्यामुळें प्रतापसिंहाचें बल अधिक वाढलें गेलें. चंद्रावतासारखीं शक्तवतांचीहि वीरेंद्रगणांत परिगणना झाली. शक्तसिंहानें खुरासानी आणि मुलतानी स्वारांना मारून प्रतापाचें रक्षण केलें होतें, यास्तव त्याचे वंशज अद्यापि आपल्याला ' **खुरासानी आणि मुलतानी यांचे अर्गल** ' म्हणजे त्यांना रोखणारे अडसर असें म्हणवतात.

परिच्छेद पंधरावा.

महासंकट !

बडे लहत सुखसम्पदा, बडे सहत दुःख द्वन्द्व ।
उडगण घटत न बढत कहुं, बढत घटत नित चन्द ॥
बड़े तजत नाहिं नीति पथ, यदपि प्राण तजि देत ।
भूखो रहत मृगेन्द्र तउ, तृण न कबहूं मुख लेत ॥

रजपूत वीर हळदीघांटाच्या रक्षणार्थ कोणच्याहि तऱ्हेचा संकोच न करतां, आपलीं शिरकमलें आपल्या हातांत घेऊन लढले व अखेरीस धारातीर्थी सुस्नात झाले. हळदीघांट वीरांच्या रुधिरजलानें साफ धुतला गेला! हळदीघांट हें परम पवित्र रणक्षेत्र बनलें! अशा त्या परम पवित्र रणक्षेत्रासंबंधानें व तेथील युद्धासंबंधानें कवीनें रचलेलें रसपरिप्लुत कावित्व, केव्हांहि चिरस्मरणीयच राहील. पक्षपातरहित अशी इतिहासलेखकाची लेखणी, तो इतिहास सुवर्णाक्षरांनीं लिहील! प्रलयकालपर्यंत महाराणा प्रतापसिंहाचेंच नांव श्रेष्ठतर असें ती राखील ही गोष्ट जरी खरी आहे, तरी वीरेंद्र जो प्रताप त्याच्या हालांचें चित्र काढणें काठिण आहे. खरें पाहिलें असतां, त्याचें सौख्य आणि संपत्ति बादशाहासमान! पण तें सर्व त्यानें आपल्या हातांनीं नष्ट केलें! छेः

त्यावेळीं वीरशिरोमणी प्रतापाच्या दुःखाचा ठाव लागणें कठिण होतें! हा सर्व दैवदुर्विलास नव्हे तर दुसरें काय?

हळदीघांटाचें युद्ध वर्षाऋतूच्या प्रारंभींच झालें होतें. वर्षाऋतूनें त्या वर्षीं आपलें स्वरूप फारच उग्र व भयंकर धारण केलें होतें. तेथील त्या पाहाडी प्रदेशांत पावसानें बादशाही सेनेची फारच त्रेधा उडविली होती. सावरतां सावरतां अगदीं नाकीं नऊ आले होते. पर्वतश्रेणीच्या आसपासचे नदीनाले तुडुंब भरून वाहूं लागले. बादशाही सेनेंतले बरेच लोक सर्द हवेनें आजारी पडले. विजयोन्मत्त मोंगल सेनेचा उन्माद पार मावळला. ती स्थिति पाहून, सलीमनें आपला डेरा तेथून हालवला आणि प्रतापाला त्यामुळें थोडे दिवस तयारी करायला अवकाश मिळाला. वसन्तऋतूच्या प्रारंभीं सर्व रस्ते साफ झाले. मार्गांत कोणच्याही प्रकारचा विरोध न झाल्यामुळें, मोंगलसेना पुन्हां पुढें चालून आली. प्रतापसिंहानें पुन्हां आपले लोक एकत्र जमविले. माघ शु० ७ संवत १६३३ ला मेवाडच्या स्वातंत्र्याच्या युद्धाचें पुन्हां रणशिंग फुंकलें गेलें. मोंगलांचा सेनासागर—रजपुतांचें वैभव, स्वातंत्र्य आणि अहंमन्यता—यांना धुळीस मिळवून टाकण्याच्या उद्देशानें मोठ्या जोमानें, सर्व प्रकारची युद्धाची तयारी करून उधळत चालला. बिचाऱ्या रजपुतांच्याजवळ त्यावेळीं काय होतें? उत्साह आणि आत्मिक बल! या दोहोंशिवाय त्यांच्यापाशीं तिसरें कांहींच नव्हतें. ते आपल्या सर्व लोकांची गणती करून, मोंगल सेनेशीं जाऊन भिडले खरे, पण ते मूठ-

मर रजपूत, आपल्या तरवारींच्या जोरावर त्या सहस्रावधी मोंगलांशीं किती वेळ टिकाव धरून राहणार ? त्यांनीं आपल्याकडून हवें तेवढें शौर्य प्रगट केलें, तरी वीरश्री त्यांच्यावर लुब्ध झाली नाहीं. ते नंतर कुंभलमेरच्या किल्याचा आश्रय धरून राहिले.

मोंगल सेनेनें रजपूत सेनेचा पाठलाग केला. सेनापती शहाबाजखां, यानें कुंभलमेरच्या किल्याला वेढा दिला. प्रतापानें स्वसंरक्षणाची आपल्याकडून शिकस्त केली; पण भाग्यदेवता सर्व बाजूंनींच त्याला प्रतिकूळ झालेली होती. ते दिवस उन्हाळ्याचे होते. रजपूत वीर किल्यांत अडकले गेले होते. रसद कमी पोंचत होती. पाण्याचाही आभाव होत चालला होता. उकाड्याच्या दिवसांत पाण्याचा आभाव असहनीय होत असतो. अन्न आणि पाणी यांच्या तुटवड्यामुळें रजपूत वीर हताश होण्याची पाळी आली. कुंभलमेर किल्यांत एक ' निगुण ' नांवाचा कुवा होता. फक्त त्या कुव्याच्या पाण्यावरच रजपूत वीर आपलें कार्य कसेंबसें भागवीत होते. अशा त्या भयंकर प्रसंगीं कुलकलंकी देशोद्रोही रजपुतांचीहि तेथें वाण नव्हती. त्यांतच जे आपलें खरें हित समजत असत, अशांपैकींच एक अबूचा देवर नांवाचा अधिकारी होता.त्या देशद्रोही अबूच्या अधिकाऱ्यानें असें एक निर्घृण आणि कलंकी कृत्य त्यावेळीं केलें कीं, ज्याच्या योगानें रजपूत वीर भराभर मरूं लागले. रजपुतांना भयंकर संकटाशीं साम्ना करण्याची पाळी आली. देशद्रोह करण्यास अबूच्या अधिकाऱ्यास जेव्हां कोणचाच मार्ग संप-

डेना, तेव्हां त्यानें मोंगलांस त्या किल्यांतल्या कुव्याच्या पाण्याची हकीकत सांगितली. मोंगलांनीं कोणच्याना कोणच्या तरी युक्तीनें, त्या कुव्याचें पाणीं विषारी करून टाकलें. कुव्याचें पाणी विषारी झाल्यामुळें, प्रताप व त्याचे लोक यांस अत्यन्त कष्टदायक स्थिति प्राप्त झाली. आतां प्रतापाला तो किल्ला, आपल्या लोकांसह सोडून जाण्याव्यतिरिक्त दुसरा कोणचाच इलाज राहिला नाहीं. त्यानें तो किल्ला शोणिगुरूच्या ताब्यांत दिला आणि आपण आपल्या वीरांसह, तो तेथून निघून चौंद नांवाच्या पहाडी किल्याच्या आश्रयाला गेला.

शोणिगुरूनें अभूतपूर्व असा मोंगलांशीं साम्ना केला. मोंगल सेना चौदपर्यंत जाऊन पोचूं न देण्यासाठीं, त्यानें खूप मेहनत घेतली; परंतु ते त्याचे सारे श्रम व्यर्थ गेले. तो त्या युद्धांत धारातीर्थीं पतन पावला. शोणिगुरूच्या मरणानें मेवाडचा एक महान पंडित कवि नाहींसा झाला. त्याच्या कवित्वानें मेवाडच्या स्त्रियांतहि देशसेवेच्या विद्युच्छक्तीचा प्रादुर्भाव झाला होता. त्याची कविता ऐकून, स्त्रिया व मुलें यांच्या अंगांत स्वदेशसेवेचें वारें फारच जोमानें वाहूं लागत असे. असा तो महाकवि बेहद्द लढून आपल्या देशवासीयांना सोडून गेला, हा केवढा त्या रजपुतांवर शोकाचा प्रसंग उद्भवला! पण तशा त्या शोकाच्या प्रसंगींहि मेवाडच्या वीरमंडळांतला उत्साह कमी झाला नाहीं. रजपुतांचें प्रधान आश्रयस्थान जो कुंभलमेरचा किल्ला, तो जरी

यवनांच्या ताब्यांत गेला होता, तरी धीरवीर प्रतापसिंह आश्रयहीन झाला होता असें नाहीं. तो आपल्या व्रतापासून यत्किंचितहि ढळला नाहीं.

प्रतापाची अशी प्रतिज्ञा होती की 'जीव जावो अथवा राहो, मोंगल सम्राट अकबरापुढें मान म्हणून वांकवायची नाहीं !' अकबरानेंहि अशी कठोर प्रतिज्ञा केली होती की, 'काय वाटेल तें नुकसान झालें, तरी प्रतापसिंहाला आपल्यापुढें शरण आणल्याशिवाय राहायचें नाहीं.' ही आपली प्रतिज्ञा पुरी करण्यासाठीं, अकबर अनेक सेनापतींच्या हातांखालीं मोठमोठीं सैनिकांचीं पथकें देऊन, त्यांना एकामागून एक अशीं प्रतापावर रवाना करूं लागला. मोंगली सैन्य मेवाडभर सर्वत्र पसरलें. पहिल्याच युद्धांत प्रतापाचें धनबल आणि मनुष्यबल हीं जरी नष्ट झालीं होतीं, तरी प्रताप आपली प्रतिज्ञा विसराल नव्हता. तो आपल्या मूठभर अनुयायांसह मोंगली सेनेशीं टक्कर देतच होता. प्रताप एका जागेचें रक्षण करूं लागला कीं, दुसरें स्थळ मोंगल जिंकून घेत. मोंगलांकडील राजा मानसिंहानें घरमेती आणि गोलकुंडा हे दोन किल्ले सर केले. मुहबतखां उदयपुर राजधानी काबीज करून बसला. प्रतापावर एकामागून एक वरचढ अशा आपत्ति येऊन कोसळूं लागल्या. अमीशाह[१] नांवाच्या व्यक्तीनें—चौंद आणि अगुण पानेर येथील भिल्ल

---

१ कोणी इतिहासकार ह्या अमीशहाला मुसलमान होता असें म्हणतात व कोणी तो रजपूत होता असेंहि म्हणतात.

आणि प्रताप यांचा जो संबंध होता तो तोडून टाकला. तेंथून प्रतापाला जी रसद पोंचत होती तीहि आतां बंद झाली. अशा त्या संकटसमयीं करीमखां नांवाच्या एका सेनानायकानें, चंपनवर आक्रमण करून दक्षिण बाजूनें तो चौंदवर चाल करून निघाला. प्रतापाला आतां तेंहि स्थान सोडणें प्राप्त झालें. मानसिंह, मोहबतखां, शहाबाजखां वगैरे प्रधान सेनानायकांनीं मेवाडला चारी बाजूंनीं वेढिलें.

अशा तऱ्हेनें चारी बाजूंनीं वेढिला गेल्यामुळें, प्रताप सर्वस्वी निःसहाय झाला. त्याला त्याच्या मेवाडांत आतां स्वतंत्रपणें वाटेल तिकडे फिरण्याची पंचाईत पडली. तो एक प्रकारचा बंदिवानच झाला. मेवाडेश्वर प्रतापाची दशा—दीनहीनमलिन भिकाऱ्यापेक्षांहि केविलवाणी झाली! त्याचें एकाच स्थळीं फार वेळ निश्चिंतपणें राहणें अशक्य झालें. तो आपल्या सैन्यासह नित्य एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं भटकत फिरूं लागला. त्या वेळीं त्याचा परिवार भिल्लांच्या रक्षणाखालीं होता. केवढा हा कठिण प्रसंग! महाराण्याची महाराणी आणि तिचें संतान यांचें पोषण आणि संरक्षण—यांचा भार भिल्लांवर येऊन पडला. त्यांच्या भोजनाची सामग्री भिल्ल आणून देत असत. मोंगलांच्या हातीं तो राजपरिवार लागूं नये म्हणून, त्याचें संरक्षण भिल्ल लोक डोळ्यांत तेल घालून, रात्रंदिवस करीत असत. दुष्मानांच्या भीतीनें, भिल्ललोक त्या महाराण्याच्या परिवाराला डोल्यांतून घालून, या गुंफेंतून त्या गुंफेंत वारंवार अदलाबदलीनें नेत असत. केव्हां केव्हां तर, आठ-

आठ दिवस महाराणा व त्याचा परिवार यांची भेटहि होत नसे. अशा स्थितींतहि प्रतापसिंह आपल्या प्रतिज्ञेपासून लवमात्रहि ढळला नाहीं. प्रतापाची अशी स्थिति पाहून, मोंगली सेनेच्या आनंदाला पारावार उरला नाहीं.

अशा तऱ्हेचीं अनेक संकटें प्राप्त झालीं, तरीं प्रतापसिंह विव्हल झाला नव्हता. त्याच्या सैनिकांना वेळ मिळाल्याबरोबर, ते मोंगल सैन्यावर तुटून पडत असत. मोंगल सेनेची त्यामुळें बरीच हानी होत असे. रजपूत वीर मोंगलांच्या शिबिरावर अचानकपणें छापा मारून, त्यांनां च्छिन्नविच्छिन्न करीत असत. मोंगल सेनेच्या रुधिरानें, रजपूत वीर आपल्या जन्मभूमातेला रंगवून लगेच पर्वतांच्या कंदरांत जाऊन लपून बसत असत. त्यामुळें मोंगल सेनेलाहि केव्हां केव्हां आपत्ती भोगाव्या लागत. सेनानायक फरीदखां यानें प्रतापसिंहाला जिवंत पकडण्याची अथवा ठार मारण्याची अल्लाची शपथ घेतली होती; पण म्हण आहे कीं, " चौबे जी छब्बे होने गये थे पर रहे गये दुब्बे. " अशीच स्थिति फरीदखांची झाली. त्याची चूक त्याला मागून समजून आली. नरकेसरी प्रतापसिंहाला पकडणें म्हणजे कांहीं ' उंदरामांजरांचा खेळ ' नव्हे असें त्याला मागाहून समजून आलें. प्रतापसिंहानें मोठ्या कुशलतेनें त्याच्या सेनेसह त्याला पहाडांत अडकावून धरला व रजपूत वीरांनीं त्याची सेना साफ कांपून काढली. फक्त फरीदखां तेवढाच काय तो जिवंत राहिला. त्यावेळीं प्रतापसिंहानें मनांत आणलें

असतें, तर फरीदखांलाहि त्यानें कैद केलें असतें, अथवा ठारहि मारून टाकलें असतें; पण प्रतापानें त्याच्याशीं जें वर्तन केलें, तसें उदार हृदयाचें उदाहरण या जगांत भारतवर्षाचा इतिहास सोडून, अन्य देशांच्या इतिहासांत क्वचितच सांपडेल. थोर हृदयी प्रतापानें त्याचें हत्यार काढून घेऊन त्याला सोडून दिलें.

मोंगल सेना युद्धकौशल्यांत रजपुतांप्रमाणें प्रवीण नसल्यामुळें, रजपुतांशीं सामना देण्यांत ती निस्तेज आणि उत्साहहीन होऊन, तिची चलाखी आणि वीरता, हीं जरी सर्व निष्फळ झालीं तरी पण प्रतापाला तिला गिरफदार करतां आलें नाहीं. इतक्यांत पुन्हां पावसाळा सुरू झाला. नदीनाले दुडुंब भरून वाहूं लागले. मोंगलसेना परतली. पावसाळा सुरू झाल्यामुळें प्रतापाला पुन्हां तयारी करण्यास फुरसत सांपडली.

याप्रमाणें बादशाहा व प्रतापसिंह यांच्यांत युद्ध सुरू झालेलें होतें. दर वर्षी बादशाहाची फौज पावसाळ्यांत मागे परतत असे व वसन्त ऋतूंत पुन्हां नव्या भरतीच्या नव्या दमानें ती प्रतापावर चाल करून येत असे. असें होतें तरी प्रताप आपल्या प्रतिज्ञेंत अढळ पर्वताप्रमाणें कायमच होता. भिल्लांनीं अशा संकटकाळीं आपल्या स्वामीभक्तीची शिकस्त करून दाखवली. एकेकाळीं प्रतापाचा परिवार मोंगलांच्या हातीं जरी पडला होता तरी विश्वासू भिल्लांनीं त्या परिवाराचें रक्षण केलें. त्यावेळीं कावा येथल्या भिल्लांनीं त्या राजपरिवाराला गवताच्या [illegible]ांत बसवून, जावरा येथील दगडांच्या खाणींत नेऊन छपविला

होता. स्वामीभक्त भिल्ल स्वतां उपाशी राहात, पण प्रतापाच्या परिवाराला उपाशी राहूं देत नसत व रात्रंदिवस त्याचें ते संरक्षण करीत असत. या गोष्टीला आज शेंकडों वर्षें होऊन गेलीं आहेत, परंतु त्या स्वामीनिष्ठ भिल्लांनीं, जे राजघराण्यावर उपकार करून ठेवले आहेत, त्यांच्या खुणा अद्यापि त्या जंगलांत मोठमोठ्या वृक्षांवर लोखंडाच्या कड्या व हजारों जबरदस्त खिळे यांच्या रूपानें दृग्गोचर होतात. रानांतील विषारी जीवजंतु व हिंस्रपशु यांपासून रक्षण व्हावें, एतदर्थ ते भिल्ल-लोक राजपरिवाराला रात्रींच्या वेळीं त्या कड्याखिळ्यांना झोले अड-कावून, त्यांवर ठेवीत असत. ज्या राजपरिवाराला राजमहालहि कधीं पसंत पडत नव्हता, त्याच्या दैवीं—अनाथांप्रमाणें—भिल्लांच्या रक्षणा-खालीं आज आपलें आयुष्य व्यतीत करण्याचा प्रसंग यावा, हें केवळ कालाचें जबरदस्त कराल स्वरूप होय! तस्मात् "कर्मणो गहना गतिः" हेंच भगवद्वाक्य खरें होय! अशा तऱ्हेचे राक्षसी प्रसंग आले तरी प्रताप आपल्या प्रतिज्ञेपासून च्युत झाला नाहीं. आपण मोंगल अकबराच्यापुढें कधींहि मान वांकवणार नाहीं ही त्याची प्रतिज्ञा अढळ होती.

अकबरहि शांत नव्हता. तो प्रतापाची मधून मधून परीक्षा घेतच होता. त्याची त्यावेळची तशी ती चमत्कारिक स्थिति ऐकून, अकबर चकित व स्तंभित झाला. अशा तऱ्हेचा असाधारण स्वार्थ-त्याग आणि अत्यन्त कष्टदायक स्थितींतला कालकंठण्याचा प्रतापाचा

क्रम पाहून, अकबराचें हृदय जरासें द्रवूं लागलें. तो आडपडद्यानें प्रतापसिंहाची मूर्तिमंत अवस्था जाणण्याचा प्रयत्न करीत होता. प्रतापाला व त्याच्या सरदारांनां खाण्यापिण्याला कंदफळेंहि पोटभर मिळत नाहींत व जें मिळेल त्यावर तो आपल्या सरदारांसह संतुष्ट मनानें व राजैश्वर्यानें भोजन करतो; इतकेंच नव्हे तर अशा घोर संकटांतहि-सुख-समयीं ज्या मर्यादांचें तो पालन करीत असें त्याचेंहि तो अशा बिकट समयीं योग्य परिपालन करतो व तो देईल त्यावरच त्याचे सरदार संतुष्ट असतात; असें जेव्हां अकबरानें ऐकलें, तेव्हां त्याची प्रतापावर अत्यन्त भक्ति जडली. प्रतापाशीं शत्रुत्व करून, जे रजपूत अकबराचा दरबार शोभवीत होते, तेहि महाराण्याला साह्य करूं लागून, स्वतःच्या वर्तणुकीला धिःकारूं लागले. हिंदूच काय पण अकबराच्या दरबारांतील मुसलमानहि, प्रतापाची प्रशंसा करूं लागले. मोंगल सेनेचा सेनापति मिरजाखां ऊर्फ खानखां यानें प्रतापसिंहाकडे पुढीलप्रमाणें कविता धाडली होतीः—

> ध्रम रहसी रहसी धरा, खिस जासे खुरसाणा ।
> अमर विसम्भर ऊपरे, रखियो नहचो राणा ॥ *

---

* मेवाडच्या राजप्रस्तींत असें लिहिलें आहे कीं, :—बादशाहा जेव्हां मिर्जाखांला गोगुंदा येथें सोडून गेला, तेव्हां कुमार अमरसिंहानें त्याच्या बेगमेला पकडून आणून, महाराणा प्रतापसिंहापुढें उभी

याचा अर्थ असा कीं, " हे राण्या, अमर अशा जगदीश्वरावर भरंवसा ठेव. तुझा धर्म आणि जन्मभूमाता, हीं तुजी कायम राहून बादशहा लज्जित होईल.

केली असतां, महाराण्यानें, तिला मोठ्या प्रतिष्ठापूर्वक मिर्जाखांकडे पोंचती केली. त्यावरूनच प्रसन्न होऊन, मिर्जाखानें वरील कविता माहाराण्याकडे धाडली असल्याचा फार संभव आहे.

परिच्छेद सोळावा.

कठोर परीक्षा !

सहं सबै दुःख नेकुं न अपने प्रण तें भटके ।
राज गयो बन गयो फिरे धन बन में भटके ॥
पै हाय सही जाती नहीं जीवन इन नयन निरख ।
इन दूध पीवते बालक, रोटी हित रोवत बिलख ॥

—श्रीराधाकृष्णदास.

प्रतापसिंहाची स्थिति अत्यंत निकृष्ट अशा साधारण गृहस्थापेक्षांही हीन झालेली होती हें वाचक मागील परिच्छेदांच्या वाचनावरून आपण जाणत आहांतच ! साधारणापेक्षां साधारण गृहस्थापाशींहि जें कांहीं असतें, तेंहि सध्यां प्रतापापाशीं नव्हतें. कोणच्याहि तऱ्हेची विपत्ति आली तरी साधारण गरीबापाशीं जें कांहीं अल्पसें असतें तेंहि क्षुधानिवृत्तीचें साधन, आज प्रतापसिंहापाशीं नव्हते. गृहस्थाला रात्रीं निजण्यास एखादी तरी जागा असते, पण प्रतापापाशीं तीहि राहिली नव्हती ! एखादा भिकारी रात्रीं एखाद्या झाडाच्या बुंध्याखालीं निजून रात्र काढूं शकतो; पण प्रतापाला तसेंहि ठिकाण नव्हतें. कोणच्या वेळीं कुठून शत्रु येईल, हें भय प्रतापाच्या मागें हात धुऊन होतें. मोंगलसैन्य


जेव्हां हताश झालें, तेव्हां प्रतापानें अकबरापुढें नम्र व्हावें म्हणून त्याच्या परिवारापैकीं तरी कोणी हातीं लागलें तर पाहावें, म्हणून आतां मोंगल सेना धडपड करूं लागली होती. अशा तऱ्हेनें प्रतापाचा अपमान करून, आपलें मन शांत करण्याचा यवनसेनेनें आतां उद्योग आरंभाला होता. अशा तऱ्हेचा अवसर सांपडून, प्रतापाचा परिवार गिरफदार करण्याची, मोंगल सेना खटपट करीत असतां, स्वामीसेवादक्ष भिल्लहि तो तिचा कावा ओंळखून, आपल्या धन्याच्या परिवाराचें रक्षण करण्याचा जीवापलीकडे यत्न करीत होते. अशा तऱ्हेनें प्रतापाचीं—प्राणप्रिय पत्नी व लेकरें, यांचें संरक्षण करण्याच्या कामीं भिल्लांना जरी प्राणान्त कष्ट होत होते, तरी ते सर्व ते मुकाट्यानें सोशीत होते. त्यांनीं त्या हालअपेष्टांची प्रभुसेवेंपुढें यत्किंचितहि कधींच पर्वा केली नाहीं.

एके वेळीं प्रतापसिंहाच्या राणीनें पांच वेळ स्वैपाक सिद्ध केला, पण पांचहि वेळ मोंगल सैन्याच्या आक्रमणामुळें उपाशीच पळणें भाग पडलें. एकवेळहि जेवायला अवसर सांपडला नाहीं. त्या दिवशीं कोणच्याना कोणच्या तरी रीतीनें मोंगलांनीं तो राजपरिवार पकडण्याचा जणूं विडाच उचलला होता, असें दिसत होतें. अशाहि स्थितींत प्रतापाची प्रतिज्ञा निश्चल होती.

मनुष्य सर्व कांहीं सहन करतो, पण सन्तानाचे कष्ट सहन करणें अनिवार्य असतें. ओंठांवरचा दुधाचा जारहि न वाळलेल्या

कोमल अर्भकांचा केविलवाणा स्वर ऐकून, कठोर हृदयाच्या व्यक्तीहि नवनीतकोमल हृदयाच्या बनून जातात. आपल्या मुलाबाळांचें दुःख पाहून, ज्यांच्या नेत्रांत अश्रु उभे राहात नाहींत, अशीं कठोर माता-पितरें कितीशीं आढळतील ? अशाच तऱ्हेच्या कठोर परीक्षेचा समय या वेळीं प्रतापावर येऊन पडला होता. कांहीं दिवसांच्या घोर संकटां-नंतर एके दिवशीं महाराणा प्रतापसिंहाची राणी आणि 'मल' नांवाची तिची सून, अशा दोघींजणीं गवतांच्या बियांच्या म्हणजे कुटूच्या पिठाच्या रोट्या करीत बसल्या होत्या. रोट्या तयार झाल्यावर त्यांपैकीं बालबालिकांनां एकएक वाटण्यांत आली. त्या दिवशीं त्या रोट्यांशिवाय त्यांच्यापाशीं दुसरें खाण्यास कांहींच नव्हतें. ज्या ठिकाणीं ते रोट्या वांटण्याचें काम चाललें होतें, तेथेंच पलीकडे प्रतापसिंह आपला हात उशाला घेऊन पडलेला होता. आपली सद्यःस्थिति आणि मेवाडचें भाग्य, यांबद्दलच्या विचारांत तो अगदीं निमग्न होऊन गेला असतां, त्यानें आपल्या लहान मुलीच्या रडण्याचा आवाज ऐकला व तो एक-दम उठून बसला. एका रानटी मुंगसानें त्या मुलीच्या हातांतली रोटी पळवून नेल्यामुळें ती रडते आहे असें त्यानें पाहिल्याबरोबर त्याचें काळीज कळवळून आलें. वीरेंद्र प्रतापाचें हृदय थरथर कांपूं लागलें. ज्या प्रतापसिंहानें प्रसन्न वदनानें हळदीघांटाच्या युद्धांत आपल्या भाऊ-भाईंच्या रक्ताच्या नद्या देशरक्षणार्थ वाहविल्या, ज्या प्रताप नरेंद्रानें प्रसन्न मनानें आपल्या जन्मभूमीच्या वात्सल्यानें तिची कीर्ति कायम

महाराणा प्रतापसिंह.



प्रतापसिंहाच्या कन्येच्या हातांतील भाकरी मुंगूस पळवीत आहे.

[पृष्ठ संख्या—१३६

राखण्यासाठीं आपल्या देशबंधूंना उत्तेजित केलें, तोच प्रताप त्या आपल्या मुलीचें रडणें ऐकून कंपित झाला. ज्यानें आपल्या वीरव्रत-पालनांत मोठ्या संतोषानें राजसिंहासन, धनदौलत वगैरे सर्वांची राष्ट्रीय यज्ञांत पूर्णाहुति दिली, तरी जो यत्किंचितहि विचलित झाला नाहीं, त्याच प्रतापाचें हृदय त्या बालिकेचें रुदन ऐकून फाटूं लागलें. अनेक आपत्ति आल्या तरी जो प्रताप आपल्या कठोर व्रतापासून परांङ्मुख झाला नाहीं, तोच आज आपल्या कन्येचें दीन रुदन ऐकून, प्रतिज्ञाभंग करण्यास तयार झाला. मुलीच्या रडण्याबरोबर त्याच्या नेत्रांतून भयंकर अश्रुप्रवाह वाहूं लागले. प्रशांत सागरांत अशान्तीच्या लाटांचें वादळ उठूं लागलें. भगवान सूर्याची गति बदलली. गिरिराज हिमालय पुलिनाचें रूप धारण करूं लागला. अखेर मनुष्य तो मनुष्यच ठरला ! प्रतापसिंहहि मानवी प्राणीच होता. त्याचें हृदय कोमल बालिकेचें दुःख सहन करूं शकलें नाहीं. " **हाय रे दैवा ! माझ्यामुळें या छोट्या छोट्या अर्भकांवर असे दुःखांचे पर्वत कोसळावेत ना ? तर मग मी ती माझी प्रतिज्ञा घेऊन काय करणार ?** " असें म्हणून पुन्हां तो हताश हृदयानें म्हणाला " बस्स—आतां सहन करवत नाहीं ! झालें तेवढें पुरे ! " इतकें बोलून, तो अकबराशीं सन्धी करण्यास तयार झाला. सरदारांनीं हात जोडून त्याला त्याच्या विचारापासून माघार घेण्याची विनंति केली. राजमहिषीनेंही, त्यानें तो आपला विचार सोडून द्यावा म्हणून अनेक

तऱ्हेनें त्याची प्रार्थना केली; परंतु सर्व व्यर्थ! कोणाचीहि व कोणचीहि युक्ति त्याच्या हृदयसमुद्रास हटविण्यास उपयोगी पडली नाहीं. त्याचे सर्व लोक त्याच्या विरुद्ध असतांहि त्यानें संधी करण्यासाठीं अकबराची प्रार्थना केली. एका दूताबरोबर त्यानें अकबराकडे एक पत्र रवाना केलें.

अनेक विद्वान लोक व विचारशील सज्जन, असें म्हणतील कीं, प्रतापाच्या चरित्रांत ही मोठी दुर्बलता होती! म्हणोत बिचारे! ही घटना मनांत आणून, प्रतापाच्या चरित्रांत या दुर्बलतेच्या कलंकाची प्रस्थापना जरी कोणी केली, तरी आम्ही ती त्याची दुर्बलता होती असें कधींच म्हणणार नाहीं. कारण, तो जरी भयंकर प्रतापी होता तरी मनुष्यच होता ना? तर मग मनुष्य असून, तो मानवी स्वभावाच्या विरुद्ध कसें वर्तन करणार? असें आहे तर मग त्याच्या चरित्रांत दुर्बलता कशी दाखवतां येईल? या मानवी कृतीला कोणी दोष द्यावा? कोणचा मायेचापूत असा आहे कीं, ज्याचें दगडासारखें असणारें अंतःकरणहि अशा प्रसंगीं पाझरणार नाहीं? ज्याचें अंतःकरण अशा प्रसंगीं कळवळणार नाहीं तो मनुष्यच नव्हे! तो मानव, राक्षस किंवा पिशाच्चच होय! अशा प्रसंगीं देवसुद्धां धैर्य व कर्तव्य यांपासून च्युत होतील, असें आमचें मत आहे. मोठेमोठे प्राणसंहारक राक्षसहि मोठमोठीं हत्याकांडें करतांना जरी द्रवले नाहींत, तरी आपल्या संततीला आपत्तींत पडलेली पाहून, त्यांचींसुद्धां अंतःकरणें पाझरल्याचीं उदाहरणें आहेत.

आपल्या सन्ततीच्या दारुण वेदना पाहून, ज्याच्या हृदयांत करुणा उत्पन्न होणार नाहीं, असा कोण आहे ? कठोरता आणि कोमलता हे दोन्ही भाव हृदयसूचकच आहेत. कर्तव्यपालनांत प्रतापाचें हृदय जितकें कठोर होतें, तितकेंच तें दुसऱ्याच्या विपत्तीबद्दल कोमल होतें. मोठमोठ्या संकटांत पडून—अनेक यंत्रणांना झेपून धरूनहि जो प्रताप आपल्या प्रतिज्ञेपासून भ्रष्ट झाला नाहीं, तोच प्रताप एका कोमल बालिकेचें रुदन सहन करूं शकला नाहीं. आपली सर्व शक्ति व आपली सर्व बुद्धि प्रतापाला पारतंत्र्यांत आडकवण्यासाठीं ज्या अकबराची व्यर्थ खर्ची पडली, तोच प्रताप आज आपलें स्वातंत्र्य एका बालिकेचें रडणें असहनीय होऊन—विकण्यास तयार झाला होता. त्याच सरदार, राजमंत्री, आत्मीय जन, प्राणप्रिय युवराज अमरसिंह व प्रियकर भार्या यांनीं किती जरी समजूत पाडली, तरी त्याकडे दुर्लक्ष करून, त्यानें पराधीनता स्वीकारण्याचा केलेला संकल्प सोडला नाहीं ! काय ? जगतात अशी समर्थ शक्ति त्यावेळीं नव्हती काय कीं, जी प्रतापाच्या बुडत असलेल्या नौकेला पैलतीरावर सुरक्षितपणें नेऊन, पोंचवील ? पाहूं या आतां मघल्या धारेला लागलेल्या प्रतापाच्या नौकेचें कोण तारण करतो तें !


परिच्छेद सत्रावा.

पृथ्वीराजाचें पत्र.

चुप रहनहू नाहिं जोग जब देश हित विपत्ति प्रताप पऱ्यो ॥
तासों बचवान प्रियहि अब हम देह निज विक्रय कऱ्यो ॥

—विशाखादत्त.

प्रतापाचें सन्धी करण्यासंबंधाचें पत्र घेऊन त्याचा दूत अकबराच्या दरबारीं जाऊन पोंचला. दूताचें पत्र पाहून अकबराच्या आनंदाला पारावार नाहींसा झाला. ज्या प्रतापामुळें अकबर आज कित्येक वर्षें झगडत राहून ज्याच्या नाकीं दम भरला होता, ज्या प्रतापाला स्वाधीन करून घेण्यासाठीं अकबराला द्रव्यहानी व मनुष्यनाश सहन करावा लागला होता, तोच प्रताप जर आज आपण होऊन बिनादिक्कत अकबराच्या स्वाधीन होऊं पाहातो आहे, तर त्याला आनंद कां बरें न व्हावा! प्रतापाचें सन्धी करण्याबद्दलचें पत्र पाहून, अकबराचा सर्व दरबार आनंदानें डोलूं लागला. साम्राट अकबराचा आनंद तर गगनांत मावेना. अकबराला मेवाडचा राजा, त्याचें राज्य त्याची अगर त्याच्या राजदंडाची किमपीहि अपेक्षा नव्हती. एकवार प्रतापानें आपल्यापुढें आपलें शिर नमवावें ऐवढीच कायती त्याची इच्छा होती. प्रतापाच्या दूताला पाहून,



अकबर पृथ्वीराजाला राणाप्रतापाचें सन्धी-पत्र दाखवीत आहे.

[पृष्ठ संख्या–१४१

अकबराची ती मनीषा तृप्त झाली. प्रतापाचें सन्धीविषयक पत्र आलेलें पाहून, राजधानींत सर्वत्र आनंदोत्सव सुरू झाले; पण अशी कोणाची कल्पना झाली नाहीं कीं, प्रतापानें इतर रजपूत राजांप्रमाणें आपलें शिर अकबरापुढें नम्र करून, सर्व रजपूत जातीची मानखंडना करावी अशी परमेश्वरी इच्छा नव्हती व त्यामुळें हा आनंदोत्सव फार वेळ टिकणें अशक्य होतें. भोंवऱ्यांत सांपडलेली प्रतापाची नौका पैलतीराला सुरक्षित नेऊन पोंचविणारा अकबराच्या राजधानींत किंवा त्याच्या दरबरांत कोणी तरी आहे काय ?

प्रतापाचें पत्र वाचून अकबर फार प्रसन्न झाला. त्यानें तें पत्र अनेकवार आपल्या दरबाऱ्यांनां दाखविलें. बिकानेरच्या राजाच्या धाकट्या भावाला—म्हणजे पृथ्वीराजालाहि तें पत्र अकबरानें दाखविलें. हा पृथ्वीराज अकबरापाशीं राजकैदी या नात्यानें जरी होता, तरी त्यानें आपलें हृदय त्याला विकलें नव्हतें, हें मागें वाचलेलें वाचकांस आठवत असेलच. अकबराच्या दरबारांत त्याच्या इतका स्वदेशभक्त आणि स्वजातिहितैषी असा दुसरा कोणीहि नव्हता. अकबरानें त्याला प्रतापचें पत्र दाखविल्यावर, त्याच्या अंतरांत वेदना होऊं लागल्या. त्याची महाराणा प्रतापसिंहाबद्दल मोठी भक्ति आणि श्रद्धा होती व त्यामुळें त्यानें तें त्याचें पत्र पाहातांच त्याला अत्यंत दुःख झालें. प्रथम तर त्यानें प्रतापसिंहाच्या पत्राचा विश्वासच धरला नाहीं, पण पुढें विश्वास पटल्यावर तो बादशाहाला म्हणाला, " **जहां पनाह, हें पत्र लबाडाचें आहे.**

मी प्रतापाला चांगला ओळखतों. तो पराधीनता स्वीकारणारा वीर खात्रीनें नाहीं. त्याला आपला राजमुगुट जरी आपण देऊं केला, तरी तो आपल्या म्हणण्याप्रमाणें आपश्याशीं तह करण्यास कधींच तयार होणार नाहीं. हें पत्र त्याच्या कोणातरी शत्रूनें धाडलें असावें असा संभव आहे " इतकें बोलून त्यानें अकबराच्या अनुमतीनें प्रतापाला एक पत्र लिहिलें. खरें काय आहे त्याची खरी बातमी आणण्यासाठीं म्हणून एक पत्र धाडण्यास त्यानें बादशहाचा रुकार घेतला होता खरा, पण त्याचा अंतर्यामीचा उद्देश असा होता कीं, कसेंही करून प्रतापानें अकबराचें दास्यत्व स्वीकारूं नये.

पृथ्वीराज जसा देशभक्त होत: :साच तो उत्तम कवीहि होता. त्यानें प्रतापसिंहाकडे मोठ्या ओजस्वी भाषेंत—नसानसांतून देशसेवेचें व्रत उत्पन्न करणारें जें—एक कवितारूपानें पत्र धाडलें, त्याच्या ज्या

---

१ पृथ्वीराजाच्या पत्राची अस्सल प्रत अद्यापी उपलब्ध झालेली नाहीं. कांहीं ग्रंथकारांनीं त्याबद्दल बराच उद्योग केला होता, परंतु कोणालाच यश आलें नाहीं. जे यशरूप पत्र दोन प्रकारांनीं प्रचलित आहे, त्याची नक्कल पुढील प्रमाणें आहे:—

पत्राची पहिली नक्कल.

सोरठा—अकबर घोर अंधार उंघाण हिंदू अबर,
जागे जगदातार पोहरे राणा प्रताप सी ॥ १ ॥

दोन अर्धवट प्रति उपलब्ध झाल्या आहेत, त्यांपैकीं एकांत आठ व दुसरींत बारा सोरठ आहेत. त्यांचा आशय असा होता कीं, " हिंदूंची आशा, त्यांचा भरंवसा वगैरे सर्व कांहीं हिंदूजातीवरच

अकबारिये हणवार दागिल की सारीं दूनी
अण दागिल असबार चेतक राणा प्रताप सी ॥ २ ॥
अकबर समद अथाह सूरायण भरियो सुजल ।
मेवाडो तिणमाह पोयण फूल प्रताप सी ॥ ३ ॥
आइहो अकबरयाहि तेजो तिहारो तुरकड़ा ।
नमि नमि नसिरयाह राण बिना सहराजवी ॥ ४ ॥
चौथो चौथो डाह बांटो बाजंती तणू ।
दीसे मेवाडाह मोशिर राणा प्रताप सी ॥ ५ ॥
दोहा—जननी सुत अहाडा जणे जहडों राणा प्रताप ।
अकबर सूती ही औधके जागा शिराण साप ॥ ६ ॥
सोरटा—पाताल पाध प्रमाण साची सांगा हरतणी ।
रही अभोगत राण अकबर सू नाभी अणी ॥ ७ ॥
सोवै सह संसार असुर पलोले ऊपरे ।
जागे तू तिणवार पीहरे राणा प्रताप सी ॥ ८ ॥

पत्राचा दुसरी नक्कल

अकबर समद अथाह, सूरपण भरियो सुजल ।
मेवाडों तिणमाह, पोयण फूल प्रताप सी ॥ १ ॥

असून, महाराणा यावेळीं त्या सर्वांचा त्याग करतो आहे. रजपूत जात आज रसातळाला जाऊन पोंचली आहे, आम्हां रजपुतांत आज

अकबिरिये :इण बार, दागिलकी सारी दुणी ।
अण दागिल असवार, रहियो राण प्रताप सी ॥ २ ॥
अकबर घोर अंधार ऊँघाणा हिंन्दू अवर ।
जागे जगदातार, पोहरे राण प्रताप सी ॥ ३ ॥
हिन्दूपति परताप, पत राखो हिन्दूआणरी ।
सहो विपत् सन्ताप, सत्य सपथ करि आपणी ॥ ४ ॥
चौथो चीतोडाह, बांटो बाजंती तणू ।
दीसै मेवाडाह, तो सिर राण प्रताप सी ॥ ५ ॥
चम्पो चीतोडाह, पोरस तणू प्रताप सी ।
सोरभ अकबरशाह, अलियल आभडिया नहीं ॥ ६ ॥
पातल खाग प्रमाण, सांची, सांगा हर तणी ।
रही सदा लग राण, अकबरसूं ऊभी अणी ॥ ७ ॥
माई जण अहाडा जणे, जहडा राण प्रताप ।
अकबर सूतो ओझको, जाण सिराणे सांप ॥ ८ ॥
राओ अकबरीयाह, तेज तिहरो तुरकडा ।
नम नम नीसरियाह, राण बिना सहरावजी ॥ ९ ॥
सह गावडिये साथ, येकण बाडे बाडिया ।
राण न मानी नाथ, तांणै राण प्रताप सी ॥ १० ॥

शौर्याचा आभाव झालेला आहे. आमच्या गृहलक्ष्मी पतिव्रता स्त्रियांतलें सतीत्व नष्ट झालेलें आहे. रजपूत जातीचा सर्व सन्मान सध्यां समाप्त झाला आहे. आज तर प्रताप हयात नसता, तर अकबरानें

सोयो सो संसार, असुर पलो ले ऊपरे।
जागे जगदातार, पोहरे राण प्रताप सी ॥ ११ ॥
धर बांकी दिन पांधरा, मरदन मूके माण ।
घणे नरिन्दा घेरिया, रहे गिरन्दा राण ॥ १२ ॥

हें वरील बारा सोरठांचें पत्र बाबू महाशय गंगाप्रसाद गुप्त यांनीं प्रसिद्ध केलें असून, या पत्राच्या बाबतींत ते असें म्हणतात कीं, " पृथ्वीराजाच्या मूळ पत्राची पुरी प्रत सांपडत नाहीं. कांहीं सोरठे व दोहे दोन स्वतंत्र पुस्तकांतून प्रसिद्ध झालेलें वाचायला सांपडतात. कूंवर हनुमन्तसिंहजी व ठाकूर पूर्णसिंहजी यांनीं जो 'मेवाडचा इतिहास' लिहिला आहे त्याच्या १७३ पृष्ठांत व बाबू राधाकृष्णदास यांनीं लिहिलेल्या ' महाराणा प्रतापसिंह " या नांवाच्या नाटकाच्या १०३ पृष्ठाच्या पादटिणींत अशीं जीं दोन पत्रें थोड्या पाठ भेदानें लिहिलेलीं वाचायाला सांपडतात, त्यांतील पहिल्या ग्रंथकाराला, सोरठ दोहे श्रीमान् राजा विजयसिंहजी यांजपासून प्राप्त झाले असें त्यानें म्हटलें आहे. दुसरे नाटककार जे राधाकृष्णदास ते तर या बाबतींत असें स्पष्ट म्हणतात कीं, " पृथ्वीराजाच्या पत्राची मूळ प्रत आम्हांला कोठेंच मिळत नाहीं व

१०

गूळ व तूप हीं एका भावानेंच खरीद केलीं असतीं. आज प्रताप नसता, तर अकबरानें सर्वांना एकाच रस्त्यांतले पथिक बनवून टाकलें असतें. अकबर हा आमच्या जातींतला एक व्यापारी आहे. त्यानें सर्वांना खरीद केलें आहे. केवळ अमूल्य रत्न उदयकुमार (प्रताप-सिंह) बाकी राहिला आहे. अकबरानें केवळ उदयसिंहाच्या शूरवीर पुत्राचें मूल्य अद्यापि दिलेलें नाहीं. मेवाडांतून प्रतापासारखा शूरवीर पुत्र नाहींसा झाल्यावर, अकबराच्या कुटिल राजनीतीनें सर्व रजपूत एकाच किंमतीचे ठरणार आहेत. आज सर्वांनीं हार खाऊन नौरोजाच्या[१] बाजारांत आपला अपमान सहन केला आहे. केवळ हम्मी-रच्या वंशजालाच हा अपमान आजपर्यंत सहन करण्याचा प्रसंग जरी आलेला नाहीं. काय ? हम्मीरचा वंशजहि आपल्या कुलाच मान तशा

खुद्द उदेपूरनेंही ह्या बाबतींत आम्हांला पूर्ण निराश केलें. बाबू गोकर्ण सिंहाजींकडून फक्त आठ सोरठ व एक दोहा असे काय ते मिळाले." आम्हांलाही आवश्यक खऱ्या पत्राच्या नकलेच्या अभावीं, प्राप्त झालेल्या वरील दोन नकलाच सध्यां प्रसिद्ध कराव्या लागत आहेत त्याला आमचा नाइलाज आहे. संपादक.

१ नौरोजाचें रहस्य नवव्या परिच्छेदांत वाचल्याचें आठवत असेलच तेथें पृथ्वीराजाच्या पत्नीची आत्मिक बलाची हकीकत वाच-लेली वाचकांनां स्मरत असेलच.

बाजारांत आतां विकणार ? राण्याचें राज्य राजधानीपर्यंत जरी सर्व नष्ट झालेलें आहे, तरी पण त्याच्यापाशीं एक अमूल्य रत्न अवशिष्ट राहिलेलें आहे. तें अमूल्य रत्न म्हणजे त्याच्या जातीचा मान व स्वधर्म होय. जगत् असें विचारतें आहे कीं, प्रतापापाशीं धर्मरक्षणाचें कोणचें बल आहे ? '**पुरुषार्थ आणि समशेर**' असें त्याचें उत्तर मिळेल असा कोणाचा भरंसा आहे ? महाराणा केवळ आपल्या तरवारीच्या जोरावर क्षत्रियत्वाचें रक्षण करीत आहे. बाजारचा हा खरीददार कांहीं नेहमींचा जगणारा नाहीं. या जाती खरीद करणाराला अवश्य ऐखादे दिवशीं बाजारांत ठोकर खावी लागणार आहे. तो ज्या एके दिवशीं या लोकांकडून खात्रीनें ठकला जाईल, अशा त्या दिवशीं, जन्मभूमीला मुक-लेले सर्व लोक स्वातंत्र्याचें बीज वाढविण्यासाठीं महाराण्यापाशीं येऊन पोंचतील ! त्याच वेळीं त्या बीजाचें संरक्षण होईल व त्याच वेळीं रज-पुतांची वीरता उज्वल होईल ! यास्तव महाराण्याच्या कर्तबगारीवर सर्वांची दृष्टी लागून राहिली आहे."

वरील आशयाची कविता पृथ्वीराजाकडून प्रतापसिंहाकडे गेल्या वर विद्युल्लते प्रमाणें तिनें प्रतापसिंच्या मनांत व त्याच्या साथीदारांस उत्साह उत्पन्न केला. बादशाहाला सन्धी करण्याच्या बाबतींत प्रतापानें पत्र लिहिलें होतें खरें, पण त्यामुळें मागाहून त्याच्या हृदयांत तीव्र वेदना होऊं लागल्या होत्या. पृथ्वीराजाच्या पत्रानें त्या वेदना दूर झाल्या. तो पुन्हा वीरव्रतपालन करण्यास उद्युक्त झाला. पृथ्वीराजाच्या पत्रानें,

भोंवऱ्यांत सांपडलेली प्रतापसिंहाची मनोनौका कांठाला लागली. ज्या देशांत पृथ्वीराजासारखे कवि निपजतात, तो देश धन्य होय! पृथ्वीराज जर त्या वेळीं नसता, तर महाराणा प्रतापसिंहाची काय स्थिति झाली असती, ती परमेश्वराला माहीत! भारतवर्षाच्या राष्ट्रीय इतिहासांत पृथ्वीराजाचें पत्र सदैव संस्मरणीय राहील यांत संशय नाहीं. ज्या कविताकामिनीनें प्रतापसिंहासारख्या वीरेन्द्राच्या हृदयाला सान्त्वन आणि शान्ति यांची जोड करून दिली, ती कविताकामिनी, भरतखंडाच्या इतिहासांत सदैव संस्मरणीय राहाणार नाहीं, असें कोण म्हणेल? पृथ्वीराजासारख्या कवीचें जीवन सदैव सफल होय! जो कवि आपल्या बुडत्या किंवा बुडालेल्या राष्ट्राला सजीव करून, त्याचा उद्धार करणारी कविता निर्माण करीत नाहीं, तो कवि कसला? इंग्लंचा प्रसिद्ध कवि कार्लाईल, यानें आपल्या '**हीरो ऍंड वर्शिप** (वीर व वीरपूजा) ग्रंथांत असें स्पष्टपणें म्हणावें लागलें आहे कीं, **रशियापाशीं जरी कोस्याक स्वार असले, तरी रशियापेक्षां इटालीच " डान्टेकवि निर्माण झाल्यानेंच, सदा सौभाग्यशाली होय."** ज्या एका कवितेंत सेनेपेक्षां अधिक बल असेल, तीच खरी होय! नाहीं तर इतर कविता कवडीमोल होत! वाचकाहो, ध्यानांत असूं द्या! इंग्रजी एक दोन पुस्तकांचीं भाषांतरें केल्यानें अंगीं कवित्व येत नसतें जेथें हृदय आहे तेथें कवित्व आहे. आज आपल्याला किती तरी कवि सर्वत्र दिसताहेत! पण त्यांनां हृदय आहे काय? ह्यांना

आमचें असें म्हणणें आहे कीं, त्यांनीं एकवार ग्रीक कवि होमर याच्याकडे दृष्टी फेंकावी. तो कवि अंधळा होता, तरी त्याचें हृदयकपाट उघडल्यावर तो अंधळा असतांही त्यानें आपली कविता घेऊन, आपल्या राष्ट्रांत घरोघर हिंडून राष्ट्रजागृतीचें चैतन्य उत्पन्न केलें ! सांगा तर मग असे किती कवि तुमच्यांत आहेत ते ? प्रतिध्वनी असें विचारते आहे कीं, "**आज भारतवर्षांत होमरसारखे किती कवि आहेत? एक तरी आहे का? कोणीच खरा कवि नाहीं, म्हणून भारतराष्ट्र अधोगतीला गेलें आहे !**"

परिच्छेद आठरावा.

स्वामिभक्त भामासाह !

रण कंकन को बांध हाथ में, कूदो रन में ले तलवार ।
भारत के सब वीर शिरोमणि, खाये धर्म हेतु अति मार ॥
उज्वल क्षत्री वीर वंश के, तुम सब अद्भुत वीर महान ।
जननी जन्मभूमि के कारण, सबको देनी चाहिये जान ॥१॥

—नवजीवन.

पृथ्वीराजाचें पत्र वाचून प्रतापसिंहाचा उत्साह द्विगुणित झाला. त्यानें आपली प्रतिज्ञा कायम करण्याचें ठरविलें. त्यानें जरी साम्राट अकराचें स्वामित्व न पतकरण्याची पुन्हां प्रतिज्ञा केली, तरी ती यथासांग पार पाडण्यास लागणाऱ्या सामुग्री पैकीं, त्याच्याजवळ शिल्लक असें काय राहिलें होतें? एकसारखें अठरा वर्षं युद्ध केल्यानें—धनबल व जनबल या दोहोंत तो अगदीं कफल्लक झालेला होता. प्रबलशत्रू साम्राट अकबराशीं लढण्यांत त्याची खरी शक्ति नष्ट झाली होती. अकबराची ही ह्या अठरा वर्षांच्या युद्धांत थोडी फार हानी झाली होती, तरी अकबराचें बल फार मोठें होतें. त्याचें राज्य धनधान्यांनीं परिप्लुत होतें. त्याच्या राज्यकोशांत, द्रव्याभाव नव्हता. चितोडवर स्वारी करण्यास जाऊन पोंच-

ज्यांत अकबराच्या सेनेला जी हानी सोसावी लागत होती, ती दिल्लीला परत आल्यावर भरून निघत असे; पण यांपैकीं प्रतापसिंहाजवळ काय होतें ? अकबर आणि प्रतापसिंह यांच्या स्थितींत हा असा इतका फरक होता. मेवाडचा राजराजेश्वर नरनाथ प्रतापसिंह दीनहीन मलिन भिकारी होऊन गेलेला होता. त्याला दोन वेळां केलेली भाकरी व रहाण्याला जागाही उरली नव्हती. त्याचे बरेचसे अनुयायी मेवाडच्या रक्षणासाठीं रणांगणांत अक्षय निद्रा घेत पडलेले होते. बरेच सैनिक त्याचा आश्रय सोडून चालते झाले होते. त्याच्या जवळ फक्त मोजकें जें सैन्य कायम होतें, त्या सैन्यानें महाराण्याप्रमाणेंच चितोडच्या संरक्षणाची कठोर प्रतिज्ञा केली होती. धनहीन व जनक्षीण असा प्रताप आपल्या वैऱ्याचा मुकाबला कसा करणार ?

आपल्या जन्मभूमीच्या दुर्दशेनें महाराणा दुःखी होऊन, त्यानें पुष्कळ विचार केला व नंतर त्यानें असा निश्चय केला कीं, जर आपण राजधानी-चितोडचा-परित्याग केला आहे तर आतां मेरपर्यंत मेवाडचाहि त्याग करावा हेंच बरें ! आरवली पर्वताचा त्याग करून सिंधुनदाच्या कांठच्या सोगदी राज्याच्या आश्रयाला जाऊन राहण्याचा त्यानें बेत केला. तेथें मेवाडचा झेंडा रोंवण्याचा त्याचा बेत ठरला. या निश्चयाप्रमाणें त्यानें आपल्या सरदारांत गुप्त हेरांकडून आपली मनीषा कळविली. ही बातमी समजतांच त्याचे दूरदूरचे सरदार त्याच्या रक्तवर्ण झेंड्याखालीं येऊन जमूं लागले. यात्रेला आवश्यक अशी सर्व तयारी झाली. मातृभूमीला अखेरचा प्रणिपात करण्याचा समय प्राप्त झाला.

प्रतापसिंह—आपली स्त्री, पुत्र, मुली, कांहीं सरदार व अनुयायी यांसह अरवली पर्वताच्या शिखरप्रांतीं चढून गेला. तेथून त्यानें आपल्या आवडत्या चितोडचें दर्शन घेतलें. दर्शन होतांच त्याच्या मनांत अनेक तऱ्हांच्या भावना प्रादुर्भूत झाल्या. हृदयांत शोकरस उत्पन्न झाल्यामुळें तो दीर्घश्वास सोडूं लागला. त्या वेळीं त्याच्या हृदयांत निराशेचे अपरंपार तरंग उठत होते. या जन्मांत आपल्या हातून आतां मेवाडचा उद्धार होणें अशक्य आहे असें वाटून तो अत्यंन्त दुःखी झाला. निराशा आणि चिन्ता यांनीं त्याचें हृदय व्यथित झाल्यामुळें, तो अरवली पर्वत उतरून जाऊन, मारवाडांत जाऊन पोंचला आणि त्यानें आपल्या जन्मभूमीला आखेचा प्रणाम केला; पण ईश्वरी माया निराळीच होती. त्याच्या आपरंपार मायेचा थांग कोणाला लागणार ? त्याच्या मायेची परिक्षा कोण करणार ? प्रतापाला जें कांहीं दुःख होतें, तें मेवाडच्या प्रजेबद्दलचें होतें. परमात्म्याच्याच मनांत आपली मातृभूमी स्वातंत्र्यांत असूं नये असें आहे अशा भावनेवर त्यानें मातृभूमीचा त्याग करण्याचें मनांत आणलें होतें. मातृभूमी कोणाला प्यारी नसेल ? ज्या छोट्याशा बनास नदीनें आपल्या हास्यलास्याच्या हंस गतीनें अरवली पर्वताची जशी शोभा वाढविली होती, तशीच आत्मोत्सर्गाच्या पवित्र रुधिर क्षीरधारेनेंही मेवाडच्या वीरांच्या कठोर व्रताला अमृतमय बनवून सोडलें होतें. मेवाडच्या इतिहासांत अत्मोत्सर्ग करणाऱ्या ज्या महापुरुषांची नांवें येतात. त्यांत भामासाह यांचेंही नांव यावें, यांत नवल तें कोणचे ? भामासाह हा प्रतापाचा जुना मुख्य मंत्री होता.

ज्यावेळीं प्रताप आपल्या परिजनांसह निघाला, त्यावेळीं मेवाडचा प्राचीन मंत्री जो भामासाह तो त्याला भेटायाला आला होता. त्यावेळीं प्रतापाला अत्यंत दीनावस्थेंत देशत्याग करीत असलेला पाहून, भामासाह याचें हृदय भरून आलें. आपल्या स्वामीची हीनावस्था पाहून त्याच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. त्यानें त्यावेळीं आपल्या धन्याला पुन्हां मेवाडच्या सिंहासनावर बसविण्याचा अलौकिक आत्मोत्सर्ग केला. त्यानें त्यावेळीं स्वतां कमावलेलेंच द्रव्य नव्हे, तर त्याच्या वाडवडिलांनींहि संचित केलेलें सर्व द्रव्य मेवाडेश्वराच्या पदपंकजांवर अर्पण केलें, व विनंती केली कीं, या देशाचा उद्धार करावा—हा देश सोडून आपण जाऊं नये. भामासाह याचें हें कृत्य पाहून सर्व लोक चकित व स्तंभित झाले. प्रतापासह त्याच्या साथीदारांची उदास मुख कमलें प्रफुल्लित झालीं. प्रतापाच्या शिबिरांतून "जय भामासह की जय" या ध्वनीनें चारी दिशा भरून गेल्या. त्या दिवसापासून भामासाह हा मेवाडचा उद्धारकर्ता या नांवानें संबोधला जाऊं लागला.

भविष्यत् काळीं काय घडणार असतें याचें खरें ज्ञान परमेश्वरावांचून कोणासही नसतें. आपल्या स्वीकृत व्रतापासून पराङ्मुख होऊन, राणा प्रताप अकबराचें स्वामित्व स्वीकारण्यासाठीं त्याला पत्र लिहील असें कोणाच्या स्वप्नीं तरी आलें होतें काय ! त्याचप्रमाणें प्रतापानें दाखविलेल्या दुर्बलतेचें परावर्तन पृथ्वीराजाचें पत्र देशोद्धाराच्या कामीं करील हेंही कोणाला समजलेलें नव्हतें. पृथ्वीराजाच्या

पत्रानें, मृत होऊं पाहाणाऱ्या प्रतापाच्या उत्साहाला सञ्जीवन दिलें व तो पुन्हां युद्धक्षेत्रांत—रणमस्तीच्या आखाड्यांत जो खम ठोकून वीरवृत्तीनें उभा राहिला—याचेंच नांव दैवयोग—हीच भवितव्यता! अशक्य अशा मानवी बुद्धीला वाटणाऱ्या गोष्टी केव्हां केव्हां अशाच विधिघटना घडवून आणीत असते. प्रतापसिंहाचे बाहु पुन्हां, स्वदेश, स्वराज्य, स्वबान्धव आणि स्वधर्म या चौकडीच्या रक्षणार्थ, स्फुरण पावूं लागले, वीरदर्पानें त्याचें मस्तक फुलून गेलें व विपत्तीशीं साम्ना बांधून वरील चौकडीचें स्वातंत्र्य कायम राखण्यासाठीं तो आपल्या परिजनांसह रणक्षेत्रांत उडी घेण्यास तत्पर झाला.

चितोडला अखेरचा प्रणिपात करण्यासाठीं म्हणून, जेव्हां प्रतापसिंह पर्वतशिखरावर जाऊन उभा राहिला, तेव्हां त्याची मनःस्थिति कशी झाली असेल याची कल्पना जरी बरोबर करतां येणें शक्य नाहीं, तरी त्याच्या हृदयांत असा एक विचार उत्पन्न झालाच असला पाहिजे होता कीं, " **ज्या देशासाठीं आपण सर्व कांहीं सहन केलें, ज्या देशाकरितां आपण कल्पनातीत दगदग भोगली, ज्या देशासाठीं आपण आपलीं मुलें व प्रजा यांना उदरज्वालेंत तडफडत होती ज्या देशासाठीं स्वबांधवांची हजारों शिरकमलें शत्रूकडून आपण कांपविण्यास कारणीभूत झालों व या सर्वांपेक्षांहि अधिक म्हणजे ज्या देशासाठीं आपल्याला सर्वस्वाची होळी करून आपल्याला**

सन्यासी व्हावें लागेल—त्या देशाला आपल्याला अखेरचा प्रणाम करावा लागतो आहेना ! " हर हर !! यापेक्षां हृदयविदारक आणि कष्टकर अशा कोणच्या वेदना असूं शकतील ? कसलेहि कष्ट सहन करण्यास प्रतापसिंह केव्हांहि माघार घेणार नव्हता आणि त्यामुळेंच त्यानें वरील प्रसंगाशीं टक्कर मारण्यासाठींच त्यानें आपल्या चिरस्मरणीया व मातृतुल्य मेवाडभूमीची रचना सिंन्धुनदीच्या कांठच्या सोगदी राज्याच्या आश्रयास राहून करायची. याच इच्छेनें तो अरवली पर्वताच्या सर्वोच्च शिखरावर चढून जाऊन आपल्या आवडत्या मेवाडला अखेरचा प्रणाम करण्यास तयार झाला होता.

खरोखर, मेवाडचा इतिहास मोठा अद्वितीय आहे. त्याच्यासारखा तो एकच ! स्वदेशवात्सल्य, वीर्य, स्वामीसेवा वगैरे सग्दुणांनीं मंडित असा त्याच्यासारखा भूप्रदेश कोणाचाहि असेल असें वाटत नाहीं ! बनास नदीनें ज्याप्रमाणें तो प्रांत कानाकोंपऱ्यांतूनहि आपल्या शुचिर्भूत प्रवाहानें पवित्र करून सोडला आहे, तद्वतच तेथील रजपूत वीरांनीं आपल्या आत्मोत्सर्गानें त्या भूप्रदेशाला पवित्र केलेला आहे. अशा त्या पवित्र भूमीची ज्यानें जमीनीला मस्तक टेंकेंपर्यंत सेवा केली होती, तो पलित केश झालेला व स्मशानयात्रेच्या अगदीं सन्निध जाऊन ठेपलेला भामासाह, प्रतापसिंहाची हीनदीनास्थिति ऐकून, मागें वर्णन केल्याप्रमाणें अरवली पर्वत प्रदेशांत प्राप्त झाला होता.

भामाहानें प्रतापसिंहापुढें येऊन त्याच्या पायांवर लोटांगण घातलें व म्हटलें, " महाराणा, देशत्याग करण्याचें कारण नाहीं. आपण इथून निघून गेल्यावर मेवाडचें रक्षण कोण करील ? त्याचें स्वातंत्र्य कोण रक्षण करील ? छे: छे: ! आपण देशत्याग करणें योग्य नाहीं. "

" मीं देशत्याग न करावा तर कोणचा उपाय योजावा ? " प्रतापसिंहानें प्रश्न केला.

" महाराज, मी कमावलेलें व माझें वडिलार्जित विपुल धन आपलेंच आहे. त्याचा सदुपयोग तरी कधीं व्हावा ? " भामासाह स्वामीभक्तीनें प्रेरीत होऊन बोलला.

अशा तऱ्हेची भामासाहाची राजभक्ति पाहून, प्रताप सद्गदित झाला. त्याच्या नेत्रांत आनन्दाश्रु उभे राहिले. त्यानें भामासाहाला प्रेमालिंगन दिलें. त्याच दिवसापासून " मेवाडचा उद्धारकर्ता " या नांवानें भामासाह हा प्रसिद्ध पुरुष झाला.

वास्तविक खरें निःपक्षपातानें बोलावयाचें तर भामासाहाचें तें त्या प्रसंगींचें स्वार्थत्यागाचें उदाहरण अवर्णनीयच होतें. अकबरासारख्या धनाढ्य आणि सर्वशक्तिमान यवनराजानें प्रतापाच्या सर्वस्वाची होळी करून, त्याला देशोधडी लाविला हें उघड्या डोळ्यांनीं पहात असतां, आपलेंही सर्वस्व त्या होळींत भस्मसात् करण्यास भामासाहावांचून आज-पर्यंत कोणीही दुसरा राजभक्त तयार झाल्याचें उदाहरण इतिहासांत सांपडत नाहीं; यामुळें तो जो अतुल राजभक्त म्हणून नांवाजला गेला

आहे. तें योग्यच आहे. त्याच्या या विलक्षण स्वार्थत्यागानेंच त्याचें नांव इतिहासांत अजरामर होऊन, मेवाडभूमी त्याची सदोदीतची चिरऋणि झालेली आहे.

खरी कर्तव्यनिष्ठा मोठी कठीण आहे. भामासाहप्रमाणें ज्यावेळी ज्या देशांत प्रत्येक व्यक्ति स्वार्थत्यागपूर्वक पुढें सरसावते व आपल्यां सर्वस्वासह देशमातेच्या सेवेसाठीं कंबर बांधून, देशशत्रूच्या पुढें छाती काढून, पवित्र्यावर उभी राहते, त्याच वेळीं, पारतंत्र्यांत सांपडलेल्या देशाला स्वातंत्र्यलाभ होत असतो व नंतरच त्याला इतर स्वतंत्र राष्ट्रांच्या मांडीला मांडी भिडवून बसण्याची योग्यता येते, हें पारतंत्र्यगर्तेंतून पार होऊं इच्छिणाऱ्यांनीं पक्कें लक्षांत ठेवावें.

भामासाहनें स्वकृतीनें जें परजित राष्ट्रापुढें उदाहरण ठेविलें, त्यानें जी स्वदेशप्रीति दाखविली व त्यानें स्वामीसेवेचा जो उत्कृष्ट धडा शिकवला, त्यानेंच मेवाडांत नवजीवन उत्पन्न केलें. प्रसन्नतेनेंच हृदयबल द्विगुणित होत असतें. भामासाहाची अतुल देशभक्ति, अप्रतिम स्वामिभक्ति आणि त्यांतूनहि श्रेष्ठ जो स्वार्थत्याग—त्या गोष्टी पाहून प्रतापाचा देह पुलकित झाला. त्याचें हृदय द्विगुणित बलवान् झालें. तो चिंतेच्या जाळ्यांतून निघून गेला व तो पूर्ववत् प्रतापसिंह बनला. त्यानें त्यावेळीं असे उद्गार काढले कीं, “ ज्या या देशांत अजून, असे स्वामीभक्त, देशभक्त आणि स्वार्थत्यागी वीरवर अद्यापि पुढें सरसावत आहेत, तो देश मी कदापि सोडणार नाहीं. माझ्या पुरातन मंत्र्यानें मला आपलें धन अर्पण केलें आहे तेवढें पुरें आहे. तेवढ्याच्याच जोरावर मी पुन्हां सैन्यसंग्रह करून देशोद्धार करीन ! ”

पृथ्वीराजाचें पत्र व भामासाह याचा अलौकिक आत्मोत्सर्ग यांनीं मृत झालेल्या रजपूत जातीवर संजीवनीचें कार्य केलें. जे रजपूत निराश झाले होते त्यांच्या हृदयांत आशेचा झरा वाहूं लागला. वीरेंद्र प्रतापाचें धैर्य द्विगुणित झालें. भामासाह याचें द्रव्य इतकें होतें म्हणून सांगतात कीं, त्यावर पंचवीस हाजार वीरांचें पोषण बारावर्षेंपर्यंत अव्याहत झालें असतें. भामासाहाकडून द्रव्याचें साह्य मिळाल्यावर, प्रताप पुन्हां आपल्या प्रतिज्ञेची पूर्ती करण्याच्या कामास लागला. धनाभावानें ज्या वीरांना रजा देण्यांत आली होती, त्यांना पुन्हां परत बोलावण्यांत आलें. युद्धासाठीं हत्यारापात्यारांची जय्यत तयारी करण्यांत आली. रजपूत सेनेसाठीं नंवे घोडे खरेदी करण्यांत आले. ही सैन्याची तयारी इतकी गुप्तपणें करण्यांत आली होती कीं, मोंगल साम्राट अकबर अथवा त्याचें सैनिक यांपैकीं कोणालाही त्याची यत्किंचितही खबर लागली नाहीं.

परिच्छेद एकोणीसावा.

मेवाडचा विजय.

चलौ चलौ सब वीर आजु मेवार उबारै ।
अहो आज या पुण्य भूमिसे शत्रु निकारे ॥
चिर स्वतंत्र यह भूमि यवन करसों उद्धारैं ॥
हिन्दु नामहिं थापि धर्म अरिगनहिं पच्छारे ॥
नभ भेदि अजु मेवाड पै उडै शिसोदिया कुलध्वजा ॥
जा शीतल छाया तरे रहै सदा सुख सों प्रजा ॥

—श्रीराधाकृष्णदास.

अखिल ब्रह्मांडच जर परिवर्तनशील आहे, तर राणाप्रतापर जो भयंकर आणि दुःखद प्रसंग येऊन गुदरला होता, त्याचेंहि परिवर्तन होणें सह्याजिकच आहे ! प्रतापानें, आपल्या मतें ठरविल्याप्रमाणें, देश-त्याग करण्यास जरी आपलें पाऊल पुढें टाकण्याचा संकल्प केला होता, तरी सर्व ब्रह्मांडाच्या पसाऱ्याचा संसाररथ हांकणारा जो जगदीश, त्याची इच्छा कांहीं निराळीच होती. प्रतापानें आपल्या शत्रूचा विध्वंस करून, आपलें नांव चिरस्मरणीय करून ठेवावें, अशी कृति त्याच्या हातून घडवून आणण्याची जी विधिघटना, भविष्यत् काळाच्या अकल्प-नीय उदरांत सांठविलेली होती, ती प्रतापाला काय ठाऊक होती !

असतें, तद्वत् रणशूर रजपूत वीरांचा रणोत्साह—त्या वेळीं आंवरून धरणें मुष्कील झालें होतें. रजपूत सेनेनें अवचित हल्ला केलेला पाहतांच, मोंगल सेना घाबरून गेली. तिनें सांवरा—सांवर करण्याचा महत् प्रयत्न केला. पण व्यर्थ ! ती सेना प्रतापाच्या सैन्यानें पार उधळून लावून तिचा फन्ना उडविला. मोंगली सेनेनें प्रतापाच्या रणझुंजारांशीं मुकाबला करण्याची बरीच खटपट केली; पण ती निरर्थक झाली. मोंगलसेना पळूं लागली. रजपूत वीरांनीं त्या पळपुट्या मोंगली फौजेचा पाठलाग अपाईनपर्यंत केला. त्या स्थलीं जो कुम्भलमेर (कमलमीर) चा किल्ला होता, त्याचा संरक्षक आब्दुल्ला नांवाचा गडकरी होता. त्याला प्रतापानें स्वत: आपल्या समशेरीनें कांपून काढून, त्या किल्ल्यावर आपला राष्ट्रध्वज फडकावला ! रजपूत वीरांच्या प्रबल आणि भीषण खड्गाघातांनीं यवनी फौज कचाकच कांपली गेली ! उद्योगसाफल्य हें मानवी हृदयस्फूर्ति दुप्पट जोरानें वाढवितें ! सफलता ही उद्योगाची दासी बनते ! जो आपलें साह्य आपण करतो, त्याला परमात्मा साह्य करतो ! राणा प्रतापानें बेहद्द उद्योग केला व त्यामुळेंच त्याला त्याच्या उद्योगाचें साफल्य मिळालें ! प्रतापाच्या सैनिकांनां जसजसें एका मागून एक विजय प्राप्त होत गेले तसतसें त्यांचें साहस वर्धमान होत जाऊन, त्यांचें बलहि वृद्धि पावूं लागलें.

कमलमीरचा किल्लेदार अब्दुल्ला ज्या वेळीं वीरवर प्रतापाशीं झुंज देण्यास पुढें सरसावला, त्या वेळीं, रजपूत वीरांनीं मोठ्या शौर्या-

त्साहानें त्याची फौज, रानगवताप्रमाणें सपासप कांपून काढिली ! त्यावेळीं रजपुतांच्या अंत:करणांतील सूडाची भीषण रौद्रदेवता थैमान करते आहे असेंच दिसत होतें ! पूर्वी एक वेळीं प्रतापवीरानें ज्याप्रमाणें मेवाडला श्मशानस्वरूप करून सोडलें होतें, त्याप्रमाणेंच त्यानें या प्रसंगीं मेवाडला पूर्वस्वरूप आणून देण्यासाठीं मोंगल सैन्याच्या रुधिरधारांचा अभिषेक, आपल्या संतप्त मातृभूमीवर चालविला होता. अशा त्या हाणामारींतच पूर्वी शत्रूनें काबीज केलेला प्रतापाचा गोगुंण्डा[1] नांवाचा किल्ला प्रतापवीराच्या हस्तगत झाला. याप्रमाणें थोड्याच दिवसांत, प्रतापानें मोंगलांपासून आपले एकंदर बत्तीस किल्ले एका मागून एक जिंकून हस्तगत करून घेतले. हे सर्व किल्ले त्यानें अवघ्या एक वर्षांत, म्हणजे सम्वत् १६४२ (सन १५८६) मध्यें आपल्या राष्ट्रध्वजाखालीं आणिले होते.

---

१ ह्या गोगुण्डालाच गोधून्धा असेंही म्हणतात.

परिच्छेद विसावा.

यवन—पराजय.

पूरब से रजपूत और पश्चिम से, यवन बहादुर आय।
जुटे घनघोर घटा सम नेजा, तीर सेल हर्षाय ॥
... ... ।
... ... ॥ १ ॥

—पं० केशवदेव.

चितोड, जयपूर आणि मण्डलगड या तीन ठिकाणांशिवाय सर्व मेवाड प्रतापानें, मागील परिच्छेदाच्या अखेरीस सांगितलेल्या वर्षी म्हणजे सन १५६६ मध्येंच जयपूरचें (आम्बेर) व्यापाराचें आद्य पीठ जें मालपूर, तेंही लुटून त्याचा प्रतिस्पर्धी जो फितुर मानसिंह त्यालाहि त्यानें योग्य शिक्षा केली. एके काळीं प्रतापानें चितोडच्या उद्धारांचें वीर कंकण हातीं बान्धून, जशी आपल्या वीर रजपूत बान्धवांची वस्ति उजाड करून टाकिली होती, तद्वतच ह्या दुसऱ्या प्रसंगीं, शत्रूंच्या अमंगल रुधिरानें त्यानें आपली समशेर लालभडक रंगाची करून, मेवाडची हताश झालेली वीर रणभूमि अरिरक्त सिञ्चनानें शान्त करण्याचें अचाट व अद्वितीय कर्म केलें.

वर सांगितलेला विजय प्राप्त होण्याच्या पूर्वी प्रतापसिंह जेव्हां अगदीं—हताश, कष्टी, जर्जर, गृहत्यागी आणि जन्मभूमाता विन्मुख होऊन, सिंधुतटाकाकडे निघून जाण्यास तयार झाला होता, त्यावेळीं त्याचा प्रतिस्पर्धि जो मानसिंह, त्यानें त्याची ती अवस्था ऐकून मोठ्या प्रसन्न हृदयानें आपल्या भाग्यश्रीला शाबासकी दिली होती. असें जरी होतें व त्याचा आणि प्रतापसिंहाचा कोणच्याही युद्धक्षेत्रांत जरी अद्यापि मुकाबला कधींच झालेला नव्हता, तरी त्याच्या हृदयांतून धास्ती निघून गेलेली नव्हती. प्रतापसिंहाचा सूड घेण्याची प्रबल आकांक्षा, मानसिंहाच्या हृदयांत अहोरात्र मोठ्या भीषणतेनें जागृत होती !

जयपूरचें व्यापाराचें मुख्य ठिकाण जें मालपूर तें, प्रतापसिंहानें आपल्या कराल खड्गाच्या भीषण पराक्रमावर काबीज केल्यावर, रजपूत वीरांच्या साहसी पराक्रमानें घाबरून जाऊन, मोंगल सेनेनें जयपूर सोडून घूम ठोकल्यामुळें, उदयपूरहि प्रतापरवीच्या प्रसन्न अशा राष्ट्रध्वजाच्या प्रकाशांत अचानक येऊन पडलें. अशा त्या प्रसंगीं मोंगल सेना कांपलीं जाऊन तिचा भयंकर पराजय झाल्यामुळें, अवशेष सेनेला पळ काढण्यावांचून गत्यंतरच उरलें नव्हतें. जयपूरांत जरी अकबराची प्रचंड सेना होती तरी प्रतापसिंह एकामागून एक जागा जिंकीत चालल्या कारणानें, मोंगली सेनेच्या हांतून जयपूरचा बचाव होणें अगदींच असंभवनीय होतें. उत्साही आणि विजयी रजपूत सेनेला पुढें

चाल करून येतांना पाहूनच, वर सांगितल्याप्रमाणें, यवनी सेनेनें जयपूरचा त्याग केला होता व त्यामुळेंच अनायासें उदयपूर प्रतापाच्या ताब्यांत आलें होतें.

याप्रमाणें प्रतापसिंहानें पुन्हां मेवाडचा लुप्त झालेला स्वातंत्र्य-गौरव जरी हस्तगत केला, तरी त्यानें त्याची शान्ती झाली नव्हती. सर्व श्रेष्ठ असें एक मोठें कार्य अद्यापि त्याला करायचें होतें. मेवाडांतील बत्तीस किल्ले, जयपूर आणि नवी राजधानी उदयपूर–हीं ठिकाणें जरी त्यानें काबीज केलीं होतीं, तरी जों पर्यंत चितोडच्या तटावरचा यावनी झेण्डा उतरून त्याच्या जागीं रजपुतांचा झेंडा रोंवला गेला नव्हता, तों पर्यंत मेवाडचा पूर्ण उद्धार झालेला नसल्यानें, प्रतापसिंह निश्चिंत होणें शक्य नव्हतें. त्यानें जरी उदयपूरांत आपली नवी राजधानी स्थापन केली, तरी त्याची जुनी राजधानी जी चितोडगड, ती त्याच्या हस्तगत होईपर्यंत, तो स्वस्थांतःकरणानें राहणें अशक्य होतें.

वास्तविक पाहिलें असता, चितोगड हा मेवाडचा प्राण होता. चितोड हेंच रजपूत वीरांचें खरें लीलास्थान होतें. चितोडच्याच अभेद्य अशा पहाडी किल्ल्याच्या बलावर रजपुत वीर, सदां पराक्रमी विजय संपादन करणारें होतें. चितोड हीच प्रतापाच्या पूर्वजांनीं प्रस्थापित केलेली मेवाडची खरी राजधानी असून, खरें पाहिलें असतां, जोंपर्यंत त्या राजधानीवर परकीय सत्तेचें निशाण फडकत होतें, तोंपर्यंत सर्व

रजपूतगण अपदस्थ आणि हतश्रीनें लांछन आणिलेले असे पराजित गणले जात होते. प्राचीनकाळीं अगणित रजपूत वीर व त्यांच्या रमणी यांनीं त्या गडाच्या रक्षणासाठीं रणमखांतील यज्ञकुंडांत आत्मबलिदान केलें होतें. जयमल, पत्ता, लक्ष्मणसिंह, याचे बारा वीरराजकुमार आणि असंख्य वीरवर यांनीं चितोडच्या संरक्षणासाठींच पूर्वी आपल्या प्राणाच्या आहुत्या रणयज्ञांत दिल्या होत्या. अगणित स्त्रियांनीं जिवंतपणींच चिताशरण करण्याचें कारण तरी, चितोडचें संरक्षण करणें हेंच होतें. तेंच चितोड अद्यापि यवनांच्या ताब्यांत होतें. त्याच चितोडच्या उद्धारासाठीं जर प्रतापसिंहानें—देशसेवक वीरवर प्रतापरवीनें संन्याश वेष धारण केला होता, तर त्याचा उद्धर होईपर्यंत त्याचें हृदय स्वस्थ कसें होणार ? ज्या चितोडचा उद्धार करण्याची प्रतिज्ञा प्रतापानें केली होती त्या उद्धराचा प्रताप जोंपर्यंत त्यानें जगाला दाखविला नव्हता, तोंपर्यंत “ आपण प्रताप या नांवाला कलंकीभूत आहोंत ” असेंच समजून, “ आपण आपल्या प्रतिज्ञेच्या व्रतांतून मुक्त झालों नाहीं. ” असें जें तो मानीत होता, तें त्याचें मानणें अयथार्थ होतें असें कोणता समंजस माणूस म्हणेल ?

प्रतापानें चितोडचा उद्धार करीपर्यंत आपल्या मस्तकस्थ कचकलापांना तैलमर्दन केलें नाहीं, त्यानें सुवर्णपात्रांत भोजन केलें नाहीं व उदयपूरांत जरी आपली राजधानी केली होती, तरी तो तेथें राहण्यास गेला नाहीं. त्यानें उदयपूर राजधानीचें शहर बनविलें; पण तेथें

राजप्रासाद बांधला नाहीं. पिशोला सरोवरच्या तटाकावर त्यानें जी आपल्यासाठीं पर्णकुटी बांधली होती, तींतच राहून तो देश—संन्यासी वीर आपले जीवन व्यतीत करीत होता. त्याच पर्णकुटींत त्याच्या सामना-गणांचा दरबार भरत होता. तेथेंच त्याचा परिवार व राजकर्मचारी एकत्रित होत असत. त्याच स्थलीं राजकीय विषयांची मंत्रणा चालून, अनेक राजकारणासंबन्धी विचारविनिमय चालत असत. ती कुटी विलाससामुग्री विरहित असल्यानें, पवित्र साधूच्या उटजाप्रमाणेंच पवित्र दिसत असे. तेथें निरर्थक शोभेचें अवडम्बर नसल्यानें, ते स्थळ परम पवित्र अनुकरणीय झालें होतें. त्या पवित्र उटजांत उच्च हृदय-भावना आणि पवित्र विचार नांदत होते. त्यांच्या विरुद्ध—दिल्ली व आग्रा येथींल सुवर्णमंडित राजप्रासदांतून अत्यन्त गर्हणीय, अमानुष आणि पातकी गोष्टी मनसोक्त वावरत होत्या.

यामप्रमाणें राजाकज चालू असतां, मोंगली सेना मेवाडच्या भिन्न भिन्न स्थलांतून आपले पाय काढून मोंगली राज्यप्रदेशांत जाऊं लागलें होती. त्या सैन्यानें फक्त—चितोड, अजमीर आणि मण्डलगड या स्थानांचा त्याग न करण्याचा दृढनिश्चय केलेला होता. भामासाहाचें द्रव्यहि या वेळीं प्रतापच्या तिजोरींत शिल्लक राहिलेलें नव्हतें व त्या मुळें नवें भरती केलेलें सैन्यही कमी करणें प्रतापाला भाग झालें होतें. यामुळें चितोडचा उद्धार करण्याची अशा प्रतापाला सोडून जाण्याची तयारी करूं लागली होती. प्रतापसिंह अगदीं भग्नहृदय व अनुत्साही

बनला होता. एवढा मोठा विजय मिळवूनहि, उद्देश पूर्ण न झाल्यानें, प्रतापानें स्वीकारलेल्या व्रताचें उद्यापन करण्यास तो असमर्थ झालेला होता व त्यामुळेंच मेवाडाला खरें स्वातंत्र्य अद्यापि प्राप्त झालेलें नाहीं, असें जें तो मानीत होता, तें खरें होतें अहर्निश चिन्ता, अहर्निश मनस्ताप आणि अहर्निश कष्टसाहिष्णुता यांनीं प्रतापाच्या अंतरात्म्याला, यामुळेंच सोडलें नव्हतें यांत मोठेंसें आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं.

मेवाड हातचा गेलेला पाहून, अकबराला अत्यन्त दुःख झालें. त्यानें पुन्हां मेवाड काबीज करण्याची आशाच केली नाहीं; कारण, त्याला मेवाडचा पहिलाच विजय फार महाग पडला होता. कांहीं इतिहास लेखकांचें असें म्हणणें आहे कीं, " प्रतापाचें साहस, शौर्य, आणि उद्योग—हीं पाहून, अकबराचें हृदय प्रसन्न झालें व प्रतापावर त्याची भक्ति जडल्यामुळें, त्यानें त्याला पुन्हां त्रास दिला नाहीं. ' अशा लेखकांशीं आमचें सहमत होणें कधींच शक्य नाहीं. हळदी-घांटांत प्रतापाच्या चौदाहजार वीरांचें रक्त उताणखाट नद्यांच्या प्रवाहां-प्रमाणें वाहात असलेलें पाहून, ज्या अकबराचें मन दयेनें पाझरलें नाहीं, त्याचें हृदय अशा या प्रसंगीं द्रवून सुप्रसन्न होणें कधींहि शक्य नव्हतें. कोणीहि विचारी मनुष्य अकबराच्या प्रसन्नतेवर आणि दयार्द्र-तेवर कधींच विश्वास ठेवणार नाहीं. अकबराच्या हृदयप्रन्नतेची गोष्ट बोलणें म्हणजे भंगडाच्या अथवा चंडोलबाजाच्या निर्गल गप्पाच झोडणें होय ! अकबराचें हृदय, थोडा वेळ द्रवलें होतें असें जरी मानिलें, तरी

तें अकबराचें हृदयाद्रवणें[1] म्हणजे, " गेल्या युरोपीय महायुद्धांतील रशियाच्या झारनें, पोलंडला स्वराज्यदान करण्याच्या बाबतींत जी अखेरची अळ्यतेची आत्मश्लाघेची निरुपायानें प्रौढी मारली " त्यापैकींच होय, असेंच स्पष्ट म्हणावें लागतें.

रजपुतांचा इतिहास लेखक कर्नल टॉड म्हणतो कीं, " प्रतापसिंहाच्या शौर्यावर अकबर[1] संतुष्ट झाला होता व त्यामुळेंच आपल्या सेनेला मेवाड सोडण्यास सांगितलें होतें. देवीरच्या युद्धानंतर अकबराला कांहीं राजकारणाप्रित्यर्थ पंजाबांत जाऊन राहणें अगत्याचें झालें होतें, त्याचें मुख्य कारण असें होते कीं, काबूलचा मिर्जा महम्मद हाकीम हा त्याच्या विरुद्ध पक्षाला जाऊन मिळाला होता व त्याची स्वारी हिंदुस्तानावर होण्याची खात्रीलायक बातमी अकबराला मिळाली होती; त्याचमुळें त्यानें आपला तळ पंजाबांत दिला असल्याकारणानें, त्या

---

१ अकबराचें हृदय पाझरणें अगदींच अशक्य होतें. कारण, Badowni Vol. II. P. 240 मध्यें ' तबकत–ए–अबकरी ' आधारें असें लिहिलें आहे कीं, ' त्यावेळीं मानसिंहाच्या सैनापत्याखालीं मोंगल सेना प्रतापाचें राज्य लुटण्याची इच्छा करीत होते, पण मानसिंहानें रुकार दिला नाहीं. यास्तव अकबरानें त्याला आपल्या दरबारांत कांहीं दिवस येण्याची. मनाई केली होती Elliot's History of India Vol. V. 5P 401 मध्यें असें म्हटलें आहे कीं, ' मुसलमान सेनापति असफखां यालाहि मानसिंहाप्रमाणेंच अकबराच्या क्रोधाला पात्र व्हावें लागलें होतें.

भावी स्वारीच्या निरोधार्थ, जय्यत तयारी करण्याच्या कामांत त्याला निमग्न व्हावे लागलें होतें. त्याच वेळीं त्याला बंगाल्यांत सैन्य धाडावें लागलें होतें. यामुळें प्रतापानें आक्रमण केलेल्या मेवाडस्थ जागांवर, त्या परत घेण्यासाठीं अकबरला सैन्य धाडण्यास फुरसत मिळाली नाहीं. " हीच गोष्ट आमच्या मतें विशेष संभवनीय दिसते.

आपली आब्रू व इज्जत हीं कायम राखण्यासाठीं आणि आपल्या हातचें निसटून गेलेलें फळ परत मिळणें असंभवनीय आहे असें खात्रीलायक वाटल्यामुळें, पोकळ औदार्य दाखविणें ओघानेंच प्राप्त होतें. अकबराची ही स्थिति अशीच झाली. इतिहासाच्या निःपक्षपाती विद्यार्थ्यांला असेंच मानणें सहाजिक योग्य आहे कीं, एकसारखें बावीस वर्षें जें मेवाडचें स्वातंत्र्यासाठीं रजपुतांनीं युद्ध केलें, त्यानें अकबराची स्वार्थ दृष्टी, स्वच्छ उघडली जाऊन, मेवाडचें क्षात्रतेज सहजासहजीं निष्प्रभ होणें शक्य नाहीं अशी त्याची बालंबाल खात्री झाल्यानेंच, यापुढें आपली शक्ति व्यर्थ खर्च करणें निरूपयोगी आहे अशी अकबराची दृढभावना झाली होती व म्हणूनच त्यानें मेवाडचा नाद आजीवात सोडून दिला.

या बाबतींत आणखी एक गोष्ट अशी संभवनीय दिसते कीं, खानखान हा प्रतापसिंहाचा भक्त बनलेला असल्यामुळें, प्रतापसिंहाला त्रास देऊन आपलें नुकसान करून घेण्याचें अकबरानें टाळिलें असतें. खानखानाचा अकबरावर प्रभाव पडणें ही कांहीं अश्चर्यकारक गोष्ट

नाहीं. अकबरही कांहीं केवळ पाषाणासारखा शून्यहृदयाचा नव्हता. प्रतापसिंहाची तर गोष्ट अशी होती कीं, स्नेही तर त्याचा गौरव करीतच असत, परंतु त्याचे वैरीहि त्याला आदरपूर्ण दृष्टीनें पहात असत यांत शंका मानण्यास जागा नाहीं राणाप्रतापानें स्वीकारिलेलें कठोर व्रत, त्याचे अंगीं बाणलेली अप्रतिम देशभक्ति. त्याचा पारतंत्र्याशीं झगडण्याचा दृढ व्यवसाय, स्वधर्मरक्षणार्थ आत्मोत्सर्ग करण्याच्या कामीं त्यानें दाखविलेलें उदाहरण वगैरे अनेक गुणसमुच्चयावरून, तो शत्रुमित्रांचा आदरणीय व अनुकरणीय व्हावा यांत आश्चर्य तें कोणचें?

अकबरानें पारतंत्र्यांत गुंगवून ठेविलेल्या बिकानेरच्या पृथ्वीराजाची खरी हकीकत मागें येऊन गेलेली वाचकांनां स्मरत असेलच! उदयसागराच्या कांठीं मानसिंह आणि प्रतापसिंह यांच्यामध्यें जो व्यवहार मागें घडल्याचें, तबकात—इ—अकबरीवरून मागें लिहिलें आहे, त्यावरून मानसिंह जरी प्रतापाचा कट्टा दुष्मान बनलेला दिसतो, तरी तो अखेरीस त्याचा चाहाताच बनलेला होता, असें त्याच्या पुढील इतिहासावरून दिसून येतें. मानसिंह जरी प्रतापाचा शत्रु बनला होता, हळदीघाटांत प्रतापाचा पराजय करण्याच्या कामीं जरी त्यानें अकबराच्या सैन्याला मदत केली होती व पहाडी प्रदेशांतल्या प्रतापाच्या गुप्त ठिकाणांचा छेडा लावून देऊन त्याचा प्राणनाश करण्याचा जरी त्यानें अनेक खटपटी केल्या होत्या, तरी प्रतापसिंहाची अगाध देशभक्ति,

परमश्रेष्ठ स्वराष्ट्रवात्सल्य आणि अमोघ कष्टसहिष्णुता हीं पाहून, मानसिंहाचें हृदय द्रवल्यानें, त्यानें अखेरीस, आपल्या अपमानाचा सूड उगवण्याची आपली नीच लालसा मनांतल्या मनांत दाबून टाकली होती. भामासाहानें जेव्हां दुसऱ्या वेळीं द्रव्यसहाय्य करून प्रतापसिंहाला स्वदेशाचा पुनरुद्धार करण्यास उत्साहित केलें, त्या वेळीं मानसिंहहि पहाडी प्रदेशांत एका ठिकाणीं प्रतापाचें अनुकरण करण्यांत निमग्न झाला होता. त्यावेळीं मानसिंहाच्या सैन्याला रसद न मिळाल्यानें तें इतकें हैराण झालें होतें कीं, त्यांपैकीं बरेच सैन्य भुकेच्या असहनीय तापानें मृत्युमुखीं पडलें. ही हकीकत ऐकून, मानसिंहाला परत दिल्लीस बोलावण्यांत आल्यावर, अकबराला अशी खास खबर मिळाली कीं, मानसिंहानें जाणूनबुजूनच—प्रतापसिंहाला मदत करण्यासाठीं, त्याचें राज्य लुटण्याचा आपल्या हाताखालच्या सैन्याला मोठ्या खुबीनें हुकूम देण्यांत कसूर केली होती व त्याचमुळें त्याला अकबरानें कांहीं दिवस आपल्या दरबारांत येण्याची बन्दी केली होती.

इतकेंच नव्हे, तर तत्कालिन भाटांच्या ग्रंथांतून या बाबतींत असें लिहिलेलें आढळून येतें कीं, प्रतापसिंहाचे सद्‌गुण पाहून, अकबर मुग्ध झाल्यानेंच, त्यानें आपल्या सर्व सेना मेवाडच्या सर्व ठाण्यांतून काढून घेतल्याच व कांहीं दिवसपर्यंत प्रतापसिंहाला शान्तीसुख भोगण्याचा अवसर प्राप्त करून दिला.

अकबर हा प्रतापासंबंधानें विमुग्ध खरोखरीच झाला होता किंवा कसें ? या विषयासंबंधानें विशेष विचार करीत बसण्याचें कारण नाहीं, तरी पण एक गोष्ट अशी स्पष्टपणें निदर्शनाला येते कीं, मेवाडसारख्या पहाडी प्रदेशांत, अकबराला आपलें राज्य अक्षयींचें सुरळीतपणें चालवितां येणें मोठें बिकट काम होतें. विनाकारण रक्तपात करून, दोन्ही बाजूंची मानवी हानि करण्यासारखे—मानवी कसाईखानें व्यर्थ उभारण्यांत अकबराचा यत्किंचितहि फायदा न झाल्यानेंच, त्यानें प्रतापसिंहाला जिंकण्याचा नाद सोडून दिला असला पाहिजे हीच कल्पना बरोबर आहे. अकबरासारख्या मेधावी आणि दूरदर्शी पुरुषानें असेंच मनांत आणिलें असलें पाहिजे कीं, ज्याअर्थी आपली महान् द्रव्य हानि आणि मनुष्य हानि होऊनहि दीर्घ काळाचा व्यय होत असतांहि, मेवाडचें राज्य आपल्याला मिळत नाहीं, त्या अर्थी आतां यापुढें प्रतापाशीं शत्रुत्व सोडून, आपल्या उदार अन्तःकरणाचीच त्याला ओळख करून देणें इष्ट आहे. याच कल्पनेला अनुसरून अकबरानें प्रतापाचें राज्य जिंकण्याचा नाद अखेरीस सोडून दिला असला पाहिजे. असाच जर कोणी याचा निष्कर्ष काढला तर तो कोणास असम्मत होईल असें वाटत नाहीं.

यापुढील सर्व घडामोडींतल्या एकंदर बारा वर्षांच्या इतिहासाची हकीकत अद्यापि उपलब्ध होत नाहीं, हें दुर्दैव होय ! या बाबतींत

इतकीच माहिती मिळते कीं, प्रतापसिंहाच्या हातून, त्याच्या पूर्वजांच्या चितोड राजधानीचा उद्धार न झाल्यानें तो सदासर्वदा चिन्तामग्न आणि विचलित राहून, चितोडला परकीयांच्या अमलांतून सोडविण्याच्या अनंत खटपटी करण्याचे त्यानें आमरणांत श्रम केले, परंतु त्याला यशःप्राप्ति झाली नाहीं. दुःखाचें आणि चिंतेचें एवढेंच काय तें एक कारण त्याच्या हृदयांत त्याच्या मरणसमयीं अवशिष्ट राहिलेलें होतें.

परिच्छेद एकविसावा.

जिवनसंध्या आणि अन्तिम सन्देश!

राम राम कहि, राम राम कहि राम।
राम, राम रामहि रटत, राव गये सुरधाम ॥

—तुलसीदास.

मनुष्याला चिंताराक्षसी झिजवून झिजवून मारते हें म्हणणें खोटें कोण म्हणेल? प्रतापसिंहाची स्थिति अशीच झाली. चिंतेनें आपला पगडा त्याच्यावर पुरा बसविला होता. अकबरानें आपलें सैन्य त्याच्या राज्यांतून माघारें बोलावून, त्याला जरी शान्तिसुखाचा लाभ देण्याचें योजिलें होतें, तरी शान्ती ही वस्तु कोठेंही विकत मिळणारी नसल्यानें—तिचें स्थान—हृदय आणि मस्तिष्क यांच्यांतच असल्यानें व तिनें प्रतापाचीं तीं स्थानें व्यापून राहण्याचें नाकारलें होतें. म्हणून, प्रतापाला अकबराच्या इच्छित शान्तीनें स्वास्थ्य मिळालें नाहीं ज्या प्रतापाच्या नसानसांतून चिन्तेच्या भडाग्नीच्या प्रखर ज्वाला मोठ्या वेगानें पसरत होत्या व ज्याच्या हृदयांत आणि मस्तकांत शान्तीला थारा नव्हता, त्याची स्थिति निश्चिन्त आणि सुखमय असूं शकणार? अभ्यासानें संवय होते हें तत्व जरी खरें असलें, तरी जो प्रताप आपल्या बालपणापासून स्वदेशरक्षणार्थ शत्रूशीं अव्याहत झगडत होता,

अशाला शत्रुकृपेनें प्राप्त होणारी शान्ती जर दुःखदा न व्हावी तर काय व्हावें ? ज्यानें यावज्जन्म शत्रूपुढें आपलें मस्तक कधींहि नम्र केलें नाहीं, त्याला शत्रूच्या कृपाशान्तीनें कसें सुख होणार ! अशा शान्तीला जर प्रतापासारख्या रणनवऱ्यानें पददलित न करावें, तर काय उराशीं प्रेमानें घट्ट आंवळून धरून बसावें ?

चितोडचा उद्धार न झाल्यानें प्रतापाच्या हृदयांत जी भीषण चिन्ता वास करीत होती व त्याचें मस्तक मनस्तापानें भरभरून गेलें होतें, त्याचें वर्णन कोठवर करावें ! याच चिन्तेनें तो श्रमिष्ट होऊन, केव्हां केव्हां उदयपूरच्या प्रचंड व उंच शैलशिखरावर आरूढ होऊन, तेथून मोठ्या विकल हृदयानें आणि निराश दृष्टीनें चितोडावरील उंच स्तंभांचें अवलोकन करीत असे व तें दृश्य पाहतां पाहतां, त्याचें हृदय विदीर्ण होत असे. तो इतका शोकाकुल होऊन, तेथेंच बसून प्रहरचे प्रहर भाविष्य चिन्तनांत आपली कालक्रमणा करी.

मेवाडचा उद्धार झाला व उदयपूर हस्तगत झालें, पण चितोडचा उद्धार झाला नाहीं. ज्या चितोडच्या उद्धारार्थ त्यानें कठोर प्रतिज्ञा केली होती, त्या चितोडगडावरचें मुसलमानी अमलाचें निशाण अद्यापि हाललें नव्हतें. हर ! हर ! जन्मभूमाता चितोड अद्यापि मुसलमानांच्या ताब्यांत असावी ना ! ही दारुण वेदना प्रतापसिंहाच्या हृदयांतून अद्यापि दूर झाली नव्हती. चितोडची दुर्दशा पाहून व त्याचें पूर्ववैभव मनांत

१२

उभे राहून, प्रतापाचें मानसिक कष्ट दूर होण्याच्या ऐवजीं, वाढतच होते. अनेक आपदा आणि विपत्ति यांनीं ग्रासून, चिन्तारूपीं नागिणीनें दंश करण्याचें काम सुरु ठेवलें असल्यानें, प्रतापाची आन्तिम वेळ अगदीं सन्निध येऊन ठेपली. तो संवत् १६५६ मध्यें अकाळीं मृत्युच्या कराल वदनांत पडून चक्काचूर झाला.

चितोडचा उद्धार न झाल्याची एक चिन्ता, वीस हजार रणगाजी वीर रजपुतांच्या रक्ताचे पाट वाहविलें तरी संपूर्ण स्वातंत्र्य प्राप्त झालें नाहीं ही दुसरी चिन्ता, शत्रूच्या दयान्विततेची तिसरी चिन्ता आणि चौथी भविष्यत् काळीं काय होईल ही चिन्ता! अशा चौरंगी चिन्तेनें प्रतापाच्या शरिराला वेढा दिल्यामुळें, तिच्या त्या चारी प्रकारच्या राक्षसी व विषारी ज्वालांत तो रात्रंदिवस होरपळत होता. युवावस्थेंतील आशा व उत्साह हीं क्रमशः त्याला सोडून चाललीं होती व त्यामुळें त्याच्यावर वृद्धावस्थेचा पगडा बसल्याचीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं होतीं. ज्यानें आपल्या आयुष्यांत एक घटकाहि सुखाची लोटली नाहीं, ज्याला क्षणभरहि सर्व आयुष्यांत शांती प्राप्त झाली नाहीं, ज्यानें पळभरहि सुखनिद्रेचा अनुभव घेतला नाहीं, अशानें ऐन तारुण्यांत वृद्ध न व्हावें तर काय व्हावें? प्रतापाच्या सर्व देहाला शस्त्राघातांनीं आलंकृत केलेलें होतें, त्याचें हृदय चिंतानलानें दग्ध झालेलें होतें आणि दिवसानुदिवस त्याच चिंताग्नीच्या भडक्यानें त्याचा सर्व देह करपून चाललेला होता. परकीयांच्या हातांतून आपलें चितोड सोड-

वृत, आपल्या देशाला पूर्ण स्वतंत्र करीन आणि मेवाडचें राज्य अतुल करीन अशी प्रतापला जबरदस्त आशा होती, परंतु एका अर्थी जरी मेवाड स्वतंत्र व अतुल असें झालें होतें, तरी त्याचा उद्देश पूर्णपणें सिद्धीस गेला नव्हता व त्याची चिन्ताहि नष्ट झाली नव्हती. प्राणोत्क्रमणाच्या शेवटच्या श्वासापर्यंत त्यानें चिंतेचा त्याग केला नव्हता.

आरवांली पर्वताच्या उच्च शिखरावर चढून प्रतापसिंह चितोडकडे प्रहरचे प्रहर बघत बसत असे; असें मागें सांगितलें आहे. त्याप्रमाणें तो एके दिवशीं चितोडचें दर्शन घेत असतां त्याच्या हृदयसागरांत एकाएकी चिंता लहरींचें तुफानी वादळ उठलें. त्यावेळीं संध्यासमय झालेला होता. अस्ताचलगामी सूर्यरश्मींचा प्रकाश—वृक्षाग्रांवर, पहाडाच्या उत्तुंग शिखरांवर आणि चितोडच्या उंच उंच स्तंभांच्या मस्तकांवर—पडला असल्यानें त्यांची अपूर्व रमणीय शोभा नयनोल्हादक जरी दिसत होती, तरी त्या मनोहारक देखाव्याकडे प्रतापाचें मूळींच लक्ष नव्हतें. तो निसर्गाची शोभा पाहाण्यांत दंग झालेला नव्हता. त्याचे दोन्ही नेत्र जरी अगदीं उघडे होते व तो निसर्गशोभा पाहाण्यांत अगदीं तल्लिन झाला आहे असें जरी दिसत होते, तरी त्याची ती दृष्टि निराळ्याच एका गोष्टींत निमग्न झाली होती. ती त्याची दृष्टी निसर्गशोभा अवलोकन करण्याच्या ऐवजीं जगदांतर्गत अशा एका विलक्षण व अनोळखी चित्राचें अवलोकन करीत होती. त्यावेळीं प्रतापाला असा भास होत होता कीं, जणूं काय बाप्पारावळानें चितोडचें स्वामित्व

घेऊन, रत्नजडित मुगुट आपल्या मस्तकावर धारण केला आहे. त्याच्या मस्तकावर चितोडचें राजचिन्ह सुशोभित होऊन राहिलें आहे. त्या चित्राचें दृश्य त्याच्या नेत्रांपुढून एकाएकीं अदृश्य होऊन, त्याच्या भागीं त्याला समरसिंह शहाबुद्दीनशीं झुंजत असल्याचा देखावा दिसूं लागला. त्याच्याबरोबर पृथ्वीराजहि त्याला दिसत होता. स्वातंत्र्यरक्षणाच्या त्या युद्धांत समरसिंह आणि पृथ्वीराज हे शहाबुद्दीनशीं मोठ्या निकरानें लढत असल्याचें दृश्य त्याला मोठ्या भयंकर स्वरूपाचें दिसत होतें. यवनांचा सेनासागर सर्वत्र पसरलेला होता. इतक्यांत कित्येक कृष्णवर्ण मेघपंक्तींनीं अस्मानांत उदय पावून, चितोडला ग्रासून टाकल्याचा देखावा त्याला दिसूं लागला. चितोडची अधिष्ठात्री देवता त्या मेघमालेंत असलेली दिसत होती. इतक्यांत एकाएकीं भूकंप होऊन, समस्त मेवाडभूमि कंपित झाल्याचा त्याला भास झाला. त्यानंतर लक्ष्मणसिंहाच्या बारा पुत्रांनीं, मेवाडच्या स्वातंत्र्यासाठीं त्या अधिष्ठात्री देवतेच्या हातांतील नरकपालांत आपल्या शिरकमलांना अर्पण केल्याचें त्याच्या दृष्टोत्पत्तीस आलें. थोड्या वेळानंतर हें दृश्य अधिकच भयंकर असें त्याला दिसूं लागलें. वीरवर बाघाजी, वीर जयमल, पत्ताजी, कित्येक राण्या—सर्वांनीं युद्धक्षेत्रांत येऊन एकामागून एकांनीं परलोक स्वीकारला. त्याच्या सभोंवार बरेंच मोठें मेघावडंबर जमलें. त्याच्या मध्यभागीं लाखों विद्युल्लतांचें तेज धारण करणारी मेवाडची अधिष्ठात्री देवी मोठ्या वेगानें एकदम प्रकाशमान होऊन अंतर्धान पावली. अन्धः-

कार कल्पनातीत पडला! त्यानंतर उदयसिंह चितोडला सोडून पळत असल्याचा देखावा त्याला दिसूं लागला. मोठा हाहाकार उठला! अनेक माणसांचे शोकध्वनि कर्णांना विव्हल करूं लागले. प्रतापाचे चिन्तातरंग इथपर्यंत येऊन एकदम थांबले. तो घाबरल्यासारखा इकडे तिकडे पाहूं लागला. त्यानें वर आस्मानाकडे जों पाहिलें तों त्याला असें आढळून आलें कीं, आकाशमंडप काळ्याकुट्ट मेघाडंबरानें अगदीं व्याप्त होऊन गेला असून, वायुच्या प्रबल वेगानें विद्युल्लता—कडकड आवाज करीत मेघमंडळाच्या उदरांतून इतस्ततः थैमान करीत असुन. उत्तरोत्तर अंधःकार वाढतच चालला होता.

हें दृश्य पाहून, प्रतापच्या हृदयावर वज्राघातच झाला. चिंतातरंगांनीं पूर्वकालच्या स्मृतीनें उदित होऊन त्याच्या मनावर अत्यन्त भीषण व कठोर असा धक्का बसला. प्रताप अस्थिरावस्थेंत उठून उभा राहिला. त्याचे सांथीदार व सहचर यांना वरील हकीकत समजल्यावर त्यांनीं प्रतापाचें सान्त्वन करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण व्यर्थ! प्रतापाचें मन कोणच्यातरी असामान्य पदार्थाचेंच परमेश्वरानें बनविलेलें होतें, म्हणून त्याच्यावर कोणच्याहि प्रकारच्या समाधानाचा पगडा बसला नाहीं. रोगांवर औषधींचा उपचार जसा शोधून काढण्यांत आला आहे; तसा कोणचाच औषधीं—बाह्य उपचार, चिन्तेवर अजूनहि सांपडलेला नाहीं. चिंतेनेंच प्रथम प्रतापला घेरण्यास सुरवात केली व तिनेंच त्याला आतां अंथरुणाला खिळविलें. चिंताव्यग्र चित्त कष्टी

मन आणि क्लेशपूर्ण शरीर यांनीं युक्त होत्साता, प्रतापसिंह पिशोला तलावाच्या कांठीं त्यानेंच बांधलेल्या पर्णकुटिकेंत एका हीन खाटेवर पडून काळाची मार्गप्रतिक्षा करूं लागला.

हलके हलके जीवनसंध्येचा दीपानिर्वाण होण्याची वेळ जवळ जवळ येऊं लागली. दिसांनुदिवस–प्रताप–क्षीण, दुर्बळ आणि निस्तेज दिसूं लागला. त्यानें आपल्या मागें आपल्या गादीचा अधिकारी, आपल्यां सतरा पुत्रांपैकीं जो श्रेष्ठ अमरसिंह त्याला जरी नेमला, तरी तो कर्तृत्ववान् नव्हता, अशी प्रतापाची खात्री होती. अधिकारानें तो ज्येष्ठ असून गुणांनीं कनिष्ट होता अशी प्रतापाची समजूत असल्यानें तो रात्रंदिवस या काळजींत पडला होता कीं, अमरसिंहाकडून आपल्या पूर्वजांप्रमाणें शूरवीर व मुत्सद्दी नसल्यामुळें, त्याच्याकडून कुलगौरवाचें संरक्षण होणें असंभवनीय आहे आणि म्हणूनच स्वदेशरक्षणाच्या कठोर व्रताचें परिपालन, त्याच्या हांतून होणार नसल्यानें, तो स्वातंत्र्य रक्षणास पडणारे कष्ट सहन करण्यास नालायक आहे. दीपनिर्वाण समयींहि या विषम चिंतेनें प्रतापावर आपला पूर्ण प्रभाव पाडला होता. प्रतापाची प्रकृति दिवसेंदिवस अधिक बिघडत चालली. हलके हलके, त्याची इहलोकची यात्रा संपण्याच्या सुमाराचीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं. त्याचे देहकष्ट वाढूं लागले. राहून राहून, त्याच्या श्वासनलिकेंतून उष्ण श्वासाच्या ऐवजीं थंड श्वास वाहूं लागला. त्याच्या

त्याचे सरदार त्याच्या सभोंवार अक्षय आळीपाळीनें बसूं लागले. ते फारच लक्षपूर्वक प्रतापाची बदलत चाललेली प्रकृति मोठ्या बारकाईनें अवलोकन करीत होते.

या जगाची यात्रा संपवण्यापूर्वीं प्रतापाच्या हातून चितोडचा उद्धार झाला नाहीं म्हणून, त्याच्या प्राणोत्क्रमणसमयीं त्याला फार वेदना झाल्या. त्यावेळीं प्रतापराजर्षि तृणशय्येवर पहुडलेला होता व त्याच्या भोंवताली थोर थोर सरदार अगदीं गप्प बसलेले होते. त्यांच्या तोंडून अवाक्षरहि निघालें नव्हतें. सर्वांची अंतःकरणें व्यवस्थित झाली असून, ते राणाजीचें अखेरचें दर्शन घेत होते. महाराण्याचे आन्तिम-कष्ट पाहून, सरदार चंद्रावत् कोमल स्वरांत म्हणाला, " अन्नदाताजी, यावेळीं असा कोणचा आपल्यावर दुःखाचा प्रसंग आहे कीं, ज्याच्या योगानें श्रीमान् सरकाराला आराम वाटत नाहीं ? "

यावर प्रतापनें नेहमींप्रमाणें उत्तर दिलें कीं, " इतउत्तर मेवाड-भूमी मुसलमानांच्या ताब्यांत जाणार नाहीं अशीं प्रतिज्ञा मी ऐकल्या-वर, शान्त चित्तानें प्राणत्याग करीन. " कांहीं वेळ थांबून, पुन्हां प्रताप म्हणाला, " मागें पिछाडीच्या तलावाच्या किनाऱ्यावर विपत्तीच्या वेळीं पावसाळ्यांत व उन्हाळ्यांत कांहीं झोंपड्या बांधण्यांत आल्या होत्या. त्या-पैकीं एका झोंपडींतून अमरसिंह बाहेर पडत असतां त्याची पगडी त्या छपराच्या गवताला अडकून पडली. त्यामुळें तो फार कष्टी झाला होता. तें पाहून, मीं निश्चय केलेला आहे कीं, जन्मभूमीच्या रक्षणासाठीं,

स्वदेशाची कीर्ति आढळ राहावी, म्हणून जे जे कष्ट सहन करावे लाग-तात ते ते अमरसिंहांकडून सहन केले जाणार नाहींत. त्याला राहा-ण्याला मोठाले सुंदर महाल असतील, तर तो सुखी होईल. ज्याला सुखाची इच्छा होते त्याच्या हातून देशरक्षण कसें होणार? ज्या मातृ-भूमीच्या रक्षणार्थ आमच्या सहस्त्रावधि शूर वीर रजपुतांनीं आपल्या रक्ताचे सडे घातले, त्या मातृभूमीचा गौरव तावडतोब विलीन होऊन जाईल--तुम्हीहि सर्व लोक आपली प्रतिज्ञा विसरून सुखोपभोगांत गर्क व्हाल ! तेव्हां माझे प्राण शान्तीपूर्वक मी कसे विसर्जित करूं ? "

इतकें बोलून तो राजर्षि क्रोध आणि आवेश यांना वश होऊन आपल्या तृणशय्येवर उठून बसला. सरदारांनीं त्याला विनयपूर्वक पुन्हां निजविलें व नंतर साळुंबऱ्याचा राव व इतर सरदारांनीं तेथें राजसिं-हासनाची शपथ घेऊन अशी प्रतिज्ञापूर्वक वाणी उच्चारली कीं, " आम्ही मेवाडच्या कीर्तीला कधींहि कलंक लागूं देणार नाहीं. जों पर्यंत सर्व मेवाडचा उद्धार होणार नाहीं, जोंवर चितोगडावर, शिसोदे यांचा ध्वज फडकणार नाहीं तों पर्यंत आम्ही या स्थलांवर कधींहि महाल बांधूं देणार नाहीं. "

बोलतां बोलतां प्रतापाच्या नेत्रकमलांवर कोमेजणाऱ्या कम-लांवरील सायंकालीन दंवबिंदुप्रमाणें अश्रु दिसूं लागले. तो विव्हल होऊन आकाशाकडे पाहूं लागला. त्याच्या देहांत अत्यंत क्षीणता

आल्यामुळें तो नेत्रांत अश्रु आणून जरी कांहीं वेळ स्तब्ध व स्वस्थ पडला होता; तरी पुन्हां क्षीण स्वरांतच बोलूं लागला. " ऐका—सरदारहो, ऐका ! पुढें घडून येणाऱ्या गोष्टींचें भविष्य मला माझ्या नेत्रांपुढें—तें पाहा—स्पष्ट दिसूं लागलें आहे. सरदारहो, इतउत्तर या झोपड्या राहणार नाहींत. यांच्या बदला मोठाल्या सुशोभित अशा हवेल्या व राजप्रसाद उभारले जातील ! ते सुखोपभोगांच्या संपूर्ण सामुग्रींनीं सुसज्ज होतील. आपल्या देशाची वास्तविक अवस्था विसरून, आपल्या आनुवंशिक व्रताचा त्याग करून व स्वातंत्र्योपभोगासाठीं कराव्या लागणाऱ्या कष्टांशी फारकत करून—अमर, त्या राजप्रासादांतून विलासांत काळ काढण्यांत दंग होईल ! ज्या व्रतानें मीं पंचवीस-वर्षें एकसारखें गहन कान्तारांतून परिभ्रमण केलें, ज्या व्रतासाठीं मीं सर्व सुखोपभोगांवर जलाञ्जली दिला, ज्या करितां मीं आपल्या देशाला मरुभूमीचें स्वरूप आणून उजाड करून सोडिला—त्या व्रताचें परिपालन अमरकडून होणें असंभवनीय आहे. सुखोपभोगांत निमग्न होऊन, अमर स्वकर्तव्यपराङ्मुख होईल ! आपणहि सर्व सरदारगण त्याचाच मार्ग धराल यांत काडीचाहि संशय नाहीं. याच चिन्तावन्हीनें माझे पंचप्राण अत्यन्त व्याकुळ व हैराण करून सोडले आहेत ! "

ही प्रतिज्ञा ऐकून प्रतापाच्या मुखारविन्दावर एकदम दिव्य तेज क्षणैक दिसत आहे नाहीं तोंच भूशायी असा एक दिव्य तारा तुटून पडला ! ज्या ताऱ्यानें आपल्या तेजानें, डुइं पाहणाऱ्या स्वातंत्र्य सूर्याचा

उदय केला, ज्याच्या भुजबलदर्पप्रतिभेपुढें मोंगली दरबाराच्या ऐश्वर्याची प्रतिभा हतदर्प झाली, ज्याच्या तेजःसंपन्नतेच्या अमोघ वीर्यानें षंढाच्याहि अंगचें भीरुत्व घालवून त्यांना रणशूर बनविलें व ज्यानें निराशेंत–बल, साहस आणि उत्साह या त्रिमूर्तींचा उदय करून दाखविला–तोच तारा––अवेळीं आणि अकाळीं एकदम अस्तंगत होऊन सर्व दिशा शून्य झाल्या! कराल कालाच्या भक्ष्यस्थानीं––तो तारा अकालीं जाऊन पडला! अशा कुकाळीं तो तारा अस्तंगत झाला कीं, त्यानें जें कार्य हातीं घेतलें होतें, तें त्याच्या पश्चात् कधींच पूर्णपणें तडीस गेलें नाहीं! तें शेवटपर्यंत अपूर्णावस्थेंतच राहिले! व्रतोद्यापन न करतांच, जरी समस्तगणांची प्रतिज्ञा ऐकून, प्रतापसिंहानें चिरकालीन अशी महानिद्रा घेण्यासाठीं शान्तीपूर्वक कालनिद्रेचा स्वीकार केला, तरी मेवाड अखेरीस व्रतोद्यापनहीन असाच अखेपर्यंत राहिला! रजपूत जातीचा गौरव विलीन झाला! हिंदूंचा खरा रक्षक आणि हिंदूंच्या स्वातंत्र्याचा नेता दुनियेंतून अदृश्य झाला! त्याच्या तोडीचा रणपुंगव पुढें अजून–पर्यंत–त्याच्याच वंशांतील महाराष्ट्र राज्यसंस्थापक श्री शिवछत्रपतीच्या वांचून हिंदुस्तानांत कोणीच आजवर उत्पन्न झाला नाहीं! रजपुतांची आशालता प्रतापाच्या दिगंततेनें करपून गेली! हिंदुस्तानाचें सौभाग्यमंगलसूत्र तुटलें आणि चुडे फुटलें! प्रताप गेला––हिंदमातेच्या उदरांतून निघालेला तिचा आलौकिक अलंकार काळानें चोरून नेला! आपला एक स्वातंत्र्यप्रेमी सत्पुत्र भाताधिप दण्डधरनें जबरदस्तीनें आपल्या कर-

पाशांतून अकालींच हिसकावून नेलेला पाहून, हिंदभूमाता आक्रोशविव्हल झाली! भारतभूवरील दिव्य तारा अस्तंगत झाल्यानें सर्व हिंदुस्तान अंधःकारांत विलीन झालें! तसा उज्वल तारा पुन्हां मेवाडांत कधींच पुढें दृग्गोचर झाला नाहीं! ज्याच्या तोडीचा पुन्हां कधीं दृष्टीसही पडणार नाहीं, असा अप्रतिम अलौकिक कण्ठमणि भारतभूमातेच्या कंठ्यांतून अवचित गळून अदृश्य झाल्यानें सर्वत्र हाहाकार झाला! प्रतापाची मृत्युवार्ता ऐकून, सर्वलोक—चकित, विस्मित, स्तब्ध आणि किंकर्तव्यमूढ बनले! रजपूत, भिल्ल, हिन्दु, मुसलमान वगैरे सर्व जाती, सर्व सांप्रदाय ही दुःखदवार्ता ऐकून जरी अश्रु ढाळूं लागले, तरी भारतवर्षाचें असें कोणचेंहि स्थान नव्हतें कीं, जेथें या देशसेवक-सन्याशासाठीं दुःखाश्रु ढाळण्यांत आले नाहींत!

वास्तविक पाहिलें असतां, माघ शुद्ध एकादशी संवत् १६५३ हा दिवस भारतवर्षावर मोठा भयानक असा दुर्दिनच उगवला होता! त्या दिवशीं जो भारतवीर देशसेवक—या भूगोलावरून स्वर्गसोपान चढून गेला—त्याचें चरित्रबल, त्याचें व्रतपालनबल, त्याचें कष्टसहिष्णुताबल, त्याचें मानसिकबल वगैरें ते सर्व श्रेष्ट सद्गुण, ते सर्व जगाला—अनुकरणीय, आदरणीय, श्लाघनीय, आदर्शपूर्ण आणि चिन्तनीय होत यांत लवमात्र शंका घेण्यास जागा नाहीं!

जा—प्रतापरवे, जा! खुशाल अस्ताला जा! पण स्वर्गीतून एक वार तरी पुन्हां आपल्या भरतमातेकडे पहा! म्हणजे ती तुझ्या करतां कसा आक्रोश करीत आहे तो तुला दिसेल!

भीषण कराल काल करील तेवढें थोडेंच असतें! त्याच्या शक्तीपुढें सर्व कांहीं सर्व काहीं परिवर्तित होतें! सर्व कांहीं बदलून जातें! याच न्यायानें प्रतापसिंह त्याच्या दृढ करपाशांत अदृश्य झाला! यांत अश्चर्य मानण्याचें कांहींच कारण नाहीं!

प्रतापसिंह गेला! पण या जगांतल्या प्रत्येक प्राण्यालाहि त्याच्याच प्रमाणें जायचें असतें—तें कधींच चुकत नाहीं! शरीर क्षणभंगुर असतें! आत्मा अविनाशी असतो! ही गोष्ट खरी! पण तो जो प्रताप-देहाला सोडून गेला, तीच गोष्ट प्राधान्येंकरून विचारणीय आहे! प्रतापाच्या चारित्रांत जें महत्व होतें तें त्याच्या बरोबरच जरी या जगांतून अदृश्य झालें, तरी त्या महत्वानें त्याचें नांव, या जगांत अजरामर, प्रातःस्मरणीय, वन्द्य आणि आदर्शपूर्ण असें मागें आम्हांसाठीं राखून ठेविलें आहे. स्वातंत्र्योपासना व तिचें व्रत किती खडतर असतें याची शिकवण प्रतापानें आपल्या कृतीनें आम्हांला दिली आहे! वीर जातीला म्हणतात, ती कशी असते याचें प्रत्यक्ष चित्र जें प्रतापानें स्वेतिहासानें जगापुढें मांडिलें आहे, त्यांत—दुर्बलांवर जबरदस्ती केल्याचा कोठेंच मागमूस नाहीं, शत्रुनाशार्थ कोठेंच कपटप्रयोग केलेला नाहीं, स्त्रियांच्या बाबतींत अत्याचार केलेला नाहीं व सत्यभंगहि कोठेंच बघायला सांपडत नाहीं. जें कांहीं त्याच्या चरित्रांत आहे, तें सर्व—पवित्र, पूजनीय आणि श्लाघ्य आहे! नीति आणि धर्म यांचा यांत कोठेंच अवमान केलेला नाहीं!

प्रतापानें परलोकगमन केल्याला जरी आज चारपांचशें वर्षें होऊन गेलीं आहेत, तरी त्याचे वंशज जे शिसोदेकुलदीपक अजून मेवाडचें राज्य करीत आहेत, त्यांनीं त्याच्या नीतिपथाचें उल्लंघन केलेलें नांहीं. प्रतापाचें सर्व आयुष्य जरी युद्ध करण्यांत गेलें होतें, तरी त्यानें परराज्यापहाराची दृष्टी कधींच ठेवली नव्हती! स्वराज्यरक्षण आणि स्वातंत्र्योद्धार यापेक्षां त्यानें इतर कामांत आपलें आयुष्य खर्च केलें नाहीं. याच कारणानें तो मानवचरिताच्या उच्चतम शिखरावर अद्यापि तळपतो आहे आणि त्याचमुळें तो सर्वांना वन्दनीय झाला आहे !

वीरवर प्रताप, आपली कीर्ति अनंत आहे ! जोंपर्यंत ही पृथ्वी आहे तोंपर्यंत प्रतापकीर्तीचा सौरभ दिगान्त व्यापून राहील ! जननीच्या वियोग दुःखांत अनेक जीव विव्हल झालेले बघण्यांत आले आहेत, परंतु जन्मभूमीसाठीं आपल्यासारखे कष्ट सहन करणारे दुर्मिळ ! आज वीरेंद्र प्रताप या जगांत जरी देहानें हयात नाहीं, तरी तो कीर्तिरूपानें जिवन्तच आहे. अकबर होता, मानसिंह होता व प्रतापहि होता ! पण अकबर आणि मानसिंह यांना आज कोणीहि पुसत नाहीं !

प्रतापाच्या नांवाचाच जप मात्र सर्वत्र ऐकूं येत आहे ! प्रतापाच्या शौर्यासंबंधी अधिक काय लिहावें व अधिक लिहिण्याची ताकत तरी कोणाची आहे ? प्रतापचरित्र हें मातृपूजेचा आदर्श आहे ! स्वदेशभक्तिचा प्रज्वालित दृष्टांन्त आहे ! हिमराज आपली जागा झोडो, सूर्य आपली गति बदलो, भारतवर्षाला महासागर आपल्या उदरांत कोंडून

टाको—प्रतापाची कीर्ति कधींहि नाहींशीं होणार नाही. अरवली पर्वताच्या गुंफा आणि त्यावरील सर्वभाग प्रतापाच्या कर्तव्याची स्मृति देतो आहे ! त्याच्या गौरवाचा तो विजयस्तंभ चिरकालपर्यंत वर छाती काढून, प्रताप व त्याचें अनुयायी वीरगण यांचें स्मारक म्हणून स्मरण दिल्यावांचून राहणार नाहीं ! ज्या ज्ञातींत—महाराणा प्रताप, गुरुगोविंदसिंह, बन्दा बहादुर आणि महाराष्ट्र राज्यरवि शिवराय वगैरे महापुरुष उत्पन्न झाले त्या ज्ञाति व ते वंश कदापी नष्ट व्हावयाची नाहीं !

वीरपूजेवर प्रेम करणाऱ्यांनो, प्रतिवर्षि महाराणा प्रतापसिंह याची छत्रपति शिवरायांप्रमाणेंच जयन्ति करा ! कारण, ते दोघेहि वीरवर एकाच रघुकुल व मुकुटमणि श्रीरामचंद्राच्या सरळ वंशांतलेच आहेत हें तुम्ही जाणतां आहांत ! अशा या वीरश्रेष्ठाचें चरित्र प्रत्यही वाचा, ऐकवा आणि त्याचा निदिध्यास बाळगून त्यावर चर्चा करा ! हीच खऱ्या पुण्यश्लोकाची वीरपूजा होय ! आतां हें चरित्र—हें महान् थोरांचें जीवनवृत्त—

" स जीवति यशो यस्य,
कीर्तिर्यस्य स जीवति । "

हें सर्वमान्य सुभाषित उच्चारून येथें संपवितो.

समाप्त.

॥ ॐ नमः श्रीरामचंद्राय ॥

आर्यमहौषधालय मु. पो. आंजर्ले.

कोंकणप्रांतांतील अगदीं ताज्या व शुद्ध वनस्पतींचीं

जगत्प्रसिद्ध रामबाण औषधें

कंदर्पमंजरी पाक.

या अपूर्व पाकांत मौक्तिक भस्म, प्रवाळ, लोह, माक्षिक, कस्तूरी, अंबर इत्यादि अत्युच्च गुणकारक पदार्थ असून शिवाय बदाम, पिस्ते, अक्रोड, चारोळी, केशर, वेलची, पंजाबी सालंमिश्री, सफेदमुसळी, जायपत्री, गोखरू, शतावरी, आस्कंद, वंशलोचन वगैरे आणखी ८० उपयुक्त वनस्पती घातल्या आहेत. असें असून पाक अमीरउमरावांपासून तों गरीबांपर्यंत सर्वांसहि घेतां यावा म्हणून किंमत माफक ठेविली आहे. यानें पथ्यावांचून गुण येतो. कोणत्याहि कारणांनीं होणारा व कशाहि प्रकारचा शुक्रस्राव, नपुंसकत्व, मूळव्याधी, रक्तदूषणजन्य त्वग्रोग, स्त्रियांचीं धुपणी व गर्भाशयस्थ दोष, हे विकार त्यांच्या एकंदर उपद्रवांसह या पाकानें तत्काल बरे होऊन धातुवृद्धि होते आणि शरीर कणखर व तेजस्वी बनतें. २० तोळे डबा १ रु. एकदम ३ डबे ५ रु. पडतील.

थंडगार नेत्रांजन.

यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच वगैरे डोळ्याचे विकार तावडतोब बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार होते. डबी किंमत १॥ रु.

परम्यावर अपूर्व मिश्रण.

हें कसलाहि नवा किंवा जुना परमा यांच्या सर्व विकारांसह अगदीं जलद बरा करण्याच्या कामीं रामबाण आहे. बा. किं. १ रु.

सूचना—वरील औषधें वगैरे माल पूर्ण खात्रीचा असल्या-मुळें आज चाळीस वर्षांत त्यांचा लक्षावधि लोकांस अप्रतिम उपयोग झाला असून, त्यांचा नेहमीं फारच खप होत आहे. अनुभवानंतर खात्री पटेल. औषधें माहितीचें खर्ड्यासह रोखीनें अगर व्ही० पी० नें पाठवूं. प्याकिंग व टपालखर्च वेगळा. घाऊक घेणारांस कमिशन भरपूर. सर्व औषधांच्या आणि आरोग्यरक्षणाच्या माहितीचें सचित्र मोठें पुस्तक फुकट देऊं. आमचीं औषधें वगैरे माल मागविणें तो खालील बिनचूक पत्त्यावर मागवावा.

कृष्णशास्त्री बिवलकर, वैद्य.

मु. पो. आंजर्ले, ता. दापोली, जि. रत्नागिरी.